महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन

पार्श्वभूमी

१. महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक साखर उत्पादन करणारे राज्य आहे. मुंबई सरकारने (Govt. of Bombay) दिलेल्या सवलतीने आणि संरक्षणाने खाजगी व्यावसायिकांनी १९३० मध्ये राज्यात प्रथम साखर कारखाने स्थापन केले. भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना, ' बागायतदार सहकारी साखर उत्पादक संस्थेने ' १९५० साली अहमदनगर जिल्ह्यात सुरू केला. सहकारी संस्थाना नवीन साखर उत्पादनाच्या आस्थापनाच्या अनुज्ञप्त्या देण्याचे मुंबई सरकारने धोरण अंगीकारले (१९५४).

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (MCS Act) आणि महाराष्ट्र राज्य संस्था नियमावली, १९६१ अंतर्गत महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने (CSF) या प्रक्रिया करणाऱ्या संस्था आहेत. स्थानिक ऊस उत्पादकांकडून ऊस खरेदी करून ते साखर उत्पादन करतात. मळी, प्रेस मड आणि ऊसाची चिपाडे साखर उत्पादनातील दोन्ही उप उत्पादने (by-products) आहेत. यावर प्रक्रिया करून मळीपासून मद्यार्क निर्मिती आणि प्रेसमडाचे कंपोष्ट खत तयार करतात. बगास, हे अन्य उत्पादन, बॉयलरमध्ये इंधन म्हणून आणि पार्टीकल बोर्ड प्रकल्पासाठी कच्चा माल म्हणून वापरतात. काही थोड्या सहकारी साखर कारखान्यांनी सह-उत्पादन (Joint Product) घटक (Unit) आणि बायो गॅस संच स्थापन केलेले आहेत. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला पणन आणि ग्रामीण जनतेला रोजगार संधी उपलब्ध करून दिली आहे. २०२ नोंदणीकृत सहकारी साखर कारखान्यांपैकी ५०४.३२ लाख मे.टन गाळप क्षमता असलेले ११३ सहकारी साखर कारखाने मार्च, २००६ अखेर कार्यरत होते. खरीप आणि रब्बी पिकांच्या क्षेत्रापैकी, ऊस लागवडीखाली एकूण क्षेत्र ३.४७ टक्के (६.२४ लाख हेक्टर) होते त्याच वेळी १९४ लाख शेतकऱ्यांपैकी ८.२५ टक्के (१६ लाख) शेतकरी ऊस लागवड करीत होते.

नवीन सहकारी साखर कारखाने स्थापनेचे कार्यतंत्र (Mechanism)

नवीन साखर कारखाना स्थापन करताना अस्तित्त्वातील कारखान्यांची आवश्यक मागणी पूर्ण होईल इतक्या ऊसाच्या उपलब्धतेची खात्री करावी लागते. इतर गोष्टीबरोबर राज्य शासनाने नवीन कारखान्यांसाठी ऊस घेण्यासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यावर, नवीन साखर कारखाना व्यवस्थापनास दिलेल्या अनुमती पत्राचे औद्योगिक अनुज्ञप्ति रुपांतरण करणे भारत सरकारने आवश्यक ठरविले आहे.

शासनाच्या निर्देशावरुन, बँकेत खाते उघडण्यास व त्यांत सहकारी साखर कारखान्यांच्या सदस्यांचे भाग भांडवल जमा करून बँकेत भरणा करण्यास आयुक्त, मुख्य प्रवर्तकांना (Promoter) आवश्यक परवानगी देतात. मुख्य प्रवर्तकाने अर्जासह गोळा करावयाचे भाग भांडवल, वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी व गाळपासाठी ऊसाच्या पर्याप्ततेच्या अटी पूर्ण केल्याचा पुरावा सादर केल्यानंतर शासन कारखान्याच्या नोंदणीस मंजुरी देते. जमीन विकत घेण्यास, सहकारी साखर कारखान्याचे स्वतःचे भाग भांडवल उभारण्यास आणि वित्तीय संस्थांकडून आवश्यक वित्त व्यवस्था करणे याकरिता पहिल्या व्यवस्थापन समितीची शासन नेमणूक करते. त्यानंतर, शासकीय भांडवल देण्यासाठी, आयुक्त शिफारस करतात आणि सहकारी साखर कारखान्यांसाठी कर्जास हमी देण्याची शिफारस करतात. सहकारी साखर कारखान्याची उभारणी पूर्ण करण्यावर आणि तो करण्यावर साखर आयुक्तांनी संनियंत्रण ठेवायचे असते, संशोधन, प्रशिक्षण निधीसाठी ऊसाच्या किंमतीतून वजावट करणे, गाळप हंगाम सुरू करणे इ. प्रस्तावांना मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समिती मंजुरी देते.

सहकारी साखर कारखान्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संघटनात्मक संरचना

शासन स्तरावर, सहकार आणि पणन विभागाचे सचिव, सहकारी साखर कारखान्यांच्या कामावर नियंत्रण ठेवतात. चार संचालक, चार सह-संचालक आणि सात प्रादेशिक सह संचालक यांच्या सहाय्याने साखर आयुक्त, पुणे योजनांची अंमलबजावणी करतात. सहकारी साखर कारखान्यांचे निबंधक म्हणून, साखर आयुक्त सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी करतात आणि साखर नियंत्रण आदेश, १९६६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि नियमावली, १९६१ नुसार प्रशासन करतात.

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३(१) नुसार अत्यावश्यक वस्तुंच्या यादीत ऊस आणि साखरेचा समावेश करण्यात आला आहे. अधिनियमांतील अधिकारांचा वापर करून साखर नियंत्रण आदेश, १९६६ केंद्र शासनाने जारी केला. केंद्र शासनाच्या १९६६ च्या अधिसूचनेप्रमाणे, साखर नियंत्रण आदेशांतील प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर महाराष्ट्र शासन करू शकते. त्याप्रमाणे, महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षित करणे आणि ऊस गाळप विनियमन आणि ऊस पुरवठा) आदेश, १९८४ राज्य शासनाने पारित केला. साखर कारखान्याला पुरेसा ऊस खरेदी करता यावा म्हणून, या आदेशान्वये, शासनास कोणतेही विनिर्दिष्टीत ऊस पिकविणारे क्षेत्र एखाद्या कारखान्यांसाठी राखीव करण्याचे अधिकार आहेत. परवाना (आयुक्त) शक्ती प्रदान केल्याप्रमाणे, विशिष्ट प्रसंगी आदेशित क्षेत्राबाहेरुन ऊस स्वीकारण्याची सहकारी साखर कारखान्यांच्या हिताशी तडजोड न करता शेतकऱ्यांना ऊसाचे चांगले दर मिळणे सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र राखीव करणे आणि गाळपाचे विनियमन आणि ऊस पुरवठा) (सुधारित) आदेश, १९९७ राज्य शासनाने पारित केला.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७९ अन्वये आयुक्त, निबंधक म्हणून सहकारी साखर कारखान्यांवर कार्याच्या (Performance) दायित्त्वासंबंधी अर्थात अधिनियमांच्या तरतुदीचे, नियमाचे उपविधी (By laws) आणि दोषी कारखान्यांसाठीचे शासनाच्या निर्देशाचे अनुपालन सूचना देऊन सक्तीचे (enforce) करू शकतात. समिती/सहकारी साखर कारखान्याचे सदस्य जे कर्तव्यात कसुर करतात (कलम ७८) त्यांना काढून टाकू शकतात. सांविधिक लेखापरीक्षकांकडून (कलम ८१) सहकारी साखर कारखान्याचे लेखापरीक्षण करून घेऊ शकतात. घटनेविषयी (Constitution) सहकारी साखर कारखान्याची कामे (Working) आणि वित्तिय स्थितीची चौकशी करू शकतात आणि त्यात आवश्यक सुधारणांसाठी पावले उचलू शकतात (कलम ८३ आणि ८४). सहकारी साखर कारखान्यांच्या कामकाजाची वा वित्तीय स्थितीची तपासणी करून व चौकशी संस्थापित करून उणिवांची खात्री करून घेऊ शकतात व त्या सुधारण्यासाठी कारखान्यांना विशिष्ट निर्देश देऊ शकतात (कलम ७९). आयुक्त कोणत्याही कारखान्याचे परिसमापन (liquidate) करू शकतात (कलम १०२). सहकारी साखर कारखान्याच्या व्यापाऱ्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी आणि सदस्यांच्या, धनकोंच्या आणि ठेवीदारांच्या हिताला हानीकारक होऊ नये म्हणून कलम ७९A नुसार शासन निर्देश देऊ शकते.

निवडलेले प्रतिनिधी आणि शासन व त्यांच्या (कारखान्यांच्या) बँकांच्या प्रत्येकी एक प्रतिनिधीचा समावेश असलेल्या व्यवस्थापन समित्यांमार्फत सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन करण्यात येते. कार्यकारी संचालक त्या समित्यांचे सचिव असतात. उप-उत्पादन (By product) घटक (Unit) स्थापन करण्यासाठी अस्तित्त्वातल्या गाळप क्षमतेत वाढ करण्यासाठी अस्तित्त्वातल्या यंत्रसामुग्रीचे आधुनिकीकरण आणि उत्पादन वाढविण्यासाठी आणि ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी १९७५ मध्ये पुणे येथे स्थापन केलेली वसंतदादा साखर संस्था (VSI) साखर कारखान्यांना तांत्रिक मार्गदर्शन करते. साखर कारखान्यांच्या वतीने सहकारी साखर कारखान्यांची शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. (महाराष्ट्र साखर संघ) शासनस्तरावर, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक आणि सुटे यंत्रभाग खरेदीसाठी साखर कारखान्यांना सल्ला सुद्धा संघ देतो आणि त्या वस्तुंसाठी वार्षिक पुरवठा दरपत्रक तयार करतो. यंत्र सामग्रीच्या खरेदीस मंजुरी देण्यासाठी शासन सुद्धा खरेदी समित्या गठित करते.

लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

- सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन कशाप्रकारे आहे हे शासनातर्फे कशाप्रकारे सुनिश्चित करण्यात येते याची तपासणी करणे ही कार्यसिद्धी लेखापरीक्षणाची होती.
- महाराष्ट्र सहकारी साखर अधिनियमांच्या तरतुदीप्रमाणे आणि सर्वमान्य स्वीकृत लेख्यांच्या तत्त्वाप्रमाणे लेखे तयार करण्यात आले होते काय.
- विविध योजनांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सहकार साखर कारखाना आणि ऊस उत्पादकांना वित्तीय सहाय्य दिले होते काय.
- नवीन सहकारी साखर कारखान्याची नोंदणी, सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवल देणे, यंत्रसामग्रीची खरेदी, ऊसाचे प्रापण आणि सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाची देयके देणे, ऊसाची रूपांतरण किंमत, सहकारी साखर कारखान्यांचे मनुष्यबळ, व्यवस्थापन आणि उप उत्पादन घटकांचे कामकाजासंबंधी अधिनियम, नियमावली आणि आदेशाप्रमाणे होते काय.
- सहकारी साखर कारखान्यांची इतर सहकारी संस्थांत गुंतवणूक उत्पादनक्षम होती काय,
- पर्यावरणीय संरक्षणावरील नियमांच्या जबाबदारीच्या सनदेचे (Charter) (CREP) आवश्यकतेप्रमाणे अनुपालन सहकारी साखर कारखान्यांनी केले होते काय
- सहकारी साखर कारखान्यांचे परिसमापन (Liquidation) आणि भाडेपट्टा प्रक्रिया विहित मानकांप्रमाणे होती काय
- आयुक्तांमार्फत सहकारी साखर कारखान्यांच्या कामाचे संनियंत्रण परिणामकारक होते काय

लेखापरीक्षण कसोट्या

कार्यसिद्धी लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षण कसोट्या याप्रमाणे होत्या :—

- सहकारी साखर कारखान्यासाठीच्या नोंदणी आणि शासकीय वित्तीय सहाय्य प्राप्त करून घेण्यासाठीच्या अटी.
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि नियमावली, १९६१ च्या तरतूदी साखर नियंत्रण आदेश, १९६६ महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षित करणे आणि गाळपाचे विनियमन आणि ऊसाचा पुरवठा) आदेश, १९८४ च्या तरतुदी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षित करणे आणि गाळपाचे विनियमन आणि ऊसाचा पुरवठा) (दुरुस्ती) आदेश, १९८४ आणि राज्य शासनाने केंद्र शासनाबरोबर ऑक्टोबर २००२ मध्ये सही केलेले सहमती ज्ञापन (MOU) आणि सहकारी साखर कारखान्याच्या कामांत काटकसर सुनिश्चित करण्यासाठी शासनाने जारी केलेले निर्देश.
- शासनाच्या भाडेपट्टा धोरणाच्या (नोव्हेंबर, २००५) अटी.
- आसवन्यांकडून प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरणीय संरक्षणावरील निगमांच्या जबाबदाऱ्यांच्या (CREP) सनदेच्या आवश्यकता.

लेखापरीक्षणाची व्याप्ति आणि पद्धती

मंत्रालय, आयुक्तालय, प्रादेशिक कार्यालये आणि ३२ सहकारी साखर कारखाने आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या २००१-०६ कालावधीतील अभिलेख्यांची चाचणी तपासणी करून कार्यसिद्धी लेखापरीक्षण (मार्च ते सप्टेंबर, २००७) करण्यात आले. लेखा परिक्षणाची उद्दिष्ट्ये आणि लेखापरीक्षणाच्या कसोट्या, साखर आयुक्तांबरोबर फेब्रुवारी, २००७ मध्ये झालेल्या बैठकीत चर्चिल्या गेल्या. तसेच, लेखापरीक्षणाचे निष्कर्ष आणि शिफारशींची चर्चा प्रधान सचिव, सहकार आणि पणन विभाग आणि साखर आयुक्तांसह डिसेंबर, २००७ मध्ये केली गेली. बैठकीत व्यक्त केलेले शासनाचे अभिप्राय आणि त्यांच्याकडून प्राप्त झालेले भाष्य (जानेवारी, २००८) विचारात घेऊन अहवालाला अंतिम रुप देण्यात आले आहे.

अभिस्वीकृती

सहकार आणि पणन विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसंतदादा साखर संस्था, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. आणि निवडलले सहकारी साखर कारखाने यांच्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन या विषयावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षणाच्या दरम्यान सहकार्याबद्दल प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र कार्यालय अभिस्वीकार (Acknowledge) करते.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन
सहकार, पर्यावरण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

२.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण या अहवालातील परिच्छेद क्र. २.१.२ " बुडीत कर्ज आणि शंकास्पद कर्जाची तरतुद ", परिच्छेद क्रमांक २.२.१ " प्रलंबित दायित्वे ", परिच्छेद क्र. २.२.२ " भागधारकांकडून देय भाग भांडवल वसूल न करणे ", परिच्छेद क्र. २.२.४ " रोकड वही आणि पासबुक शिलकेचा ताळमेळ ", परिच्छेद क्र. ३.२ " रस्ते विकास अनुदान ", परिच्छेद क्र. ३.५.१ " साखर विकास निधीतुन कर्जे ", परिच्छेद क्र. ३.७ " कर्ज उभारण्यासाठी हमी ", परिच्छेद क्र. ३.८ " वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचा वापर ", परिच्छेद क्र. ३.८.१ " हंगामासाठी आणि वाहतूकीसाठी कर्जे ", परिच्छेद क्र. ४.३ " उभारणीसाठी सहकारी साखर कारखान्यांना कार्यन्वयनसाठी शासनाचे भाग भांडवल ", परिच्छेद क्र. ४.४ " अपूर्ण सहकारी साखर कारखाने ", परिच्छेद क्र. ४.१३.१ " सहकारी साखर कारखान्यांनी साखर विक्रीसाठी अनुसरलेली अनियमित पद्धती ", परिच्छेद क्र. ४.१३.३ " बफर साठ्याच्या अर्थसहाय्याचा विनियोग ", परिच्छेद क्र. ४.१६ " सिंचन आणि पाणी पुरवठा योजना ", परिच्छेद क्र. ४.१९ " आवश्यक प्रदूषण नियंत्रणाच्या उपायाचे अनुपालन ", परिच्छेद क्र. ५.१ " सहकारी साखर कारखाने दिवाळखोरीत काढण्यातील विलंब ", परिच्छेद क्र. ५.१.१ " आजारी सहकारी साखर कारखाने दिवाळखोरी प्रक्रियेस आणले नव्हते ", परिच्छेद क्र. ५.२.२ " भाडेपट्टयाने दिलेल्या सहकारी साखर कारखान्यांची मालमत्ता निकाली न काढणे ", परिच्छेद क्र. ६.२ " संविधिक लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करून घेणे ", परिच्छेद क्र. ६.३ " सहकारी साखर कारखान्यांची तपासणी ", परिच्छेद क्र. ६.७.१ " चौकशी अधिकाऱ्यांच्या स्तरावरील विलंब ", परिच्छेद क्र. ६.७.२ " आयुक्त स्तरावरील विलंब " यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

सहकारी साखर कारखान्याचे लेखे

बुडीत कर्ज आणि शंकास्पद कर्जाची तरतुद :——

२.२. २० सहकारी साखर कारखान्यानी रु. ४४.०७ कोटीच्या बुडीत कर्जे आणि शंकास्पद कर्जाची तरतुद केली नव्हती.

कार्यरत सहकारी साखर कारखान्यांनी, शासनाच्या हमीवर साखरेच्या आणि मळीच्या तारणावर वित्तीय संस्थाकडून ११.५० टक्के दराने तारणी कर्जे (secured loans) बिनतारणी कर्जे (insecured loans) घेतली होती. कंत्राटदारांना, पुरवठादारांना लागवडीसाठी (Harvesting) आणि वाहतूक कंत्राटदारांना (H &T) ऊस पुरवठादारांना कर्मचाऱ्यांना आणि इतरांना या कर्जातून तात्पुरते अग्रिम प्रदान केले गेले. ३१ मार्च २००६ अखेरच्या ताळेबंदांनुसार २२ चाचणी तपासणी केलेल्या सहकारी साखर कारखान्यांची प्राप्त व्हायची रक्कम रु.३२२.३५ कोटी (अग्रिमे : रु. १२५.८५ कोटी आणि इतर प्राप्ती : रु. १९६.५० कोटी) होती. आयुक्तांनी जारी केलेल्या (मार्च, २००५) सूचनांनुसार सहकारी साखर कारखान्यांची एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी ५० टक्के आणि तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी १०० टक्के बुडीत कर्जे आणि शंकास्पद कर्जासाठी तरतुद करावयाची होती.

जरी अग्रीमे आणि इतर प्राप्त रकमा एक वर्षांहून अधिक कालावधीसाठी प्रलंबित होती तरीही २२ पैकी २० चांचणी तपासणी केलेल्या कार्यरत सहकारी साखर कारखान्यांची बुडीत आणि शंकास्पद कर्जासाठी रु.४४.०७ कोटीची तरतुद केली नव्हती. या सहकारी साखर कारखान्यांचा यामुळे तोटा कमी दाखविण्यात आला होता. ही अग्रिमे त्याच आर्थिक वर्षात वा गळीत हंगाम संपल्यानंतर त्वरीत समायोजित करावयाची होती. प्राप्त व्हावयाच्या रकमांपैकी अग्रिमे एक ते पांच वर्षापर्यंत चुकती (settle) केली नव्हती.

ज्ञापन :—

२.३. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद करणे सर्वसामान्य स्वीकृत लेखा तत्त्वाप्रमाणे असून सदर तरतूद करण्याबाबत संबंधित सहकारी साखर कारखान्यांना साखर आयुक्त कार्यालयाकडील दि.७.१०.२००४ व दि. १४.६.२००५ च्या पत्राने कळविले आहे. त्यानुसार बऱ्याचशा सहकारी साखर कारखान्यांना बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद त्यांच्या आर्थिक पत्रकात केलेली आहे.तथापि, संबंधित सहकारी साखर कारखाने व विशेष लेखापरिक्षक यांना बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद करण्यात येते किंवा कसे याची खात्री करण्याबाबत संबंधीत लेखापरिक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

मा.साखर आयुक्त यांच्या परिपत्रकीय सूचनेनुसार सर्व सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्याकडील थकीत व येणे रकमांवर संशयित व बुडीत कर्जाची तरतूद करणे बंधनकारक आहे. साखर आयुक्तालयाचे पत्र दि. ७.१०.२००४, २१.३.२००५ व १४.६.२००५ अन्वये सदर निधीची तरतूद करणेबाबत प्रादेशिक सहसंचालक (साखर) व विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (साखर) यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. अशा येणे रक्कमांकरिता एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी २० %, दोन ते तीन वर्षांच्या कालावधीसाठी ५० % आणि तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी

१०० % बुडीत कर्जे आणि संशयित कर्जासाठी तरतूद करावयाची आहे. विशेष लेखापरीक्षकांना सभेत वेळोवेळी सूचना दिलेली आहे. कारखान्यांनी ३१.३.२०११ अखेर पुढील प्रमाणे तरतूद केलेल्या आहेत.

संशयित व बुडीत कर्ज निधी यासंदर्भात दि. ३१.३.२०११ अखेर साखर कारखान्याने केलेल्या तरतूदी संदर्भांतील माहिती प्राप्त झाली आहे **(परिशिष्ट १).**

सहकारी साखर कारखान्यांची वित्तीय स्थिती:-

प्रलंबित दायित्वे :—

२.४. ३१ मार्च,२००६ अखेर २२ सहकारी साखर कारखान्यांची रु.२६५८.६५ कोटीची देणी होती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार सहकारी साखर कारखान्यांनी, वर्ष अखेर होण्यापूर्वी देय देणी वा देणी द्यायची शक्यता असलेली देणी चुकती करावयास पाहीजेत व नक्त नफा परिगणन करण्यापूर्वी त्याची तरतुद वार्षीक लेख्यांत करावयास हवी.

चांचणी तपासणी केलेल्या सर्व कार्यरत २२ सहकारी साखर कारखान्यांच्या २००५-०६ च्या ताळेबंदांवरुन निदर्शनास येते की प्रलंबित सांविधिक देणी एकूण रु. २६५८.६५ कोटी होती. त्यात शासकीय देणी (रु.११६.९५ कोटी) शासकीय कर्जे (रु. २१३.९० कोटी) NCDC कर्जे (रु. ६.९८ कोटी) सभासदांची ऊसाची देय बिले (रु.२६६.२० कोटी) इतर देणी (धनको/पुरवठादार) (रु. ४९७.९६ कोटी) तारणी/बीना तारणी कर्जे (रु. १४१६.४०), SDF कर्जे (रु.६२.९७ कोटी) आणि ऊसाच्या बिलातून वसूल केलेली परंतु वित्तीय संस्थांना संवितरीत न केलेली देणी (रु.६६.२९ कोटी) समाविष्ट होती. दोन ते पांच वर्षांपासून ही देणी प्रलंबित होती.

शासनाने म्हटले (जानेवारी, २००८) की २००१-०६ कालावधीत साखर उद्योगाला विविध अडचणीना तोंड द्यावे लागले आणि सहकारी साखर कारखाने नक्त शिल्लक मिळवू शकले नाहीत. तरीही २००७-०८ मध्ये शासकीय देणी चुकती करण्यासाठी विकलेल्या प्रति क्विंटल साखरेवर रु.२५/- चे टॅगींग (tagging) केल्यामुळे काही अंशी देणी वसूल करता आली.

हे उपाय फक्त एककातिक आणि एकाच हंगामापुरते होते. २००६-०७ मधील ८.३५ कोटी क्विंटल साखरेचे उत्पादन विचारात घेता हमी दिलेल्या कर्जासह टॅगिंग द्वारे शासकीय देण्याच्या वसूलीची टक्केवारी ही फक्त ७.२४ टक्के असू शकेल.

(रु.२५ x ८.३५ कोटी क्विंटल x १०००) रु. २८८३.८७ कोटी (प्रलंबित हमी) = ७.२४%

ज्ञापन

२.५. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

गाळप हंगाम २००२-०३ मध्ये साखरेच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणावर घट झाल्यामुळे सहकारी साखर कारखान्यांच्या माल तारण खात्यावर निर्माण झालेला अपुरा दुरावा तसेच उसावर किडींचा उद्‌भवलेला प्रादुर्भाव व त्यामुळे गाळपासाठी कमी प्रमाणावर उसाची उपलब्धता या कारणामुळे सन २००३-०४, २००४-०५ व २००५-०६ या गाळप हंगामामध्ये सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांकडील देय रकमेची परतफेड करण्यास साखर उद्योगात अडचणी निर्माण झाल्या होत्या. बऱ्याचशा सहकारी साखर कारखान्यांना वरील कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे वाढीव उत्पन्न मिळाले नसल्याने सहकारी साखर कारखान्यांना वाढावा कमविण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे शासकीय रकमेची वसूली करता आली नाही.

पुढील कालावधीत कारखान्यांनी त्यांचेकडील देणी दिलेली आहेत. दिनांक ३१ मार्च, २००६ अखेर २२ सहकारी साखर कारखान्यांची रु. २६५८.६५ कोटीची प्रलंबित देणी पैकी दिनांक ३१.३.२०१२ अखेर रु. ४२१.६६ कोटी देणी बाकी आहे. (परिशिष्ट २ व ३).

मा. मंत्री समितीच्या दि.३०.७.२००७ व दि. २६.८.२००८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सहकारी साखर कारखान्याकडील शासकीय येणे रकमांच्या वसूलीसाठी सन २००७-०८, २००८-०९ या गाळप हंगामात सहकारी कारखान्यांनी उत्पादीत केलेल्या साखरेतून रु.२५/- प्रति क्विंटल याप्रमाणे वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुढे मा. मंत्री समिती सभा दिनांक ०३.०८.२००९, २४.०६.२०१० व दिनांक १८.०८.२०११ रोजीचे सभेमध्ये सुद्धा उपरोक्त प्रमाणे वसूली करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर निर्णयानुसार कार्यवाही चालु आहे.

सहकारी साखर कारखान्याकडील विविध स्वरुपाची कर्जे व अर्थसहाय्य बाबत वेळोवेळी माहिती एकत्रित करणे व सदर बाबत वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने साखर आयुक्तालयाचे स्तरावर दिनांक ४.६.२०११ च्या आदेशान्वये विशेष वसूली आढावा कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर कक्षाद्वारे शासकीय कर्ज व इतर अर्थसहाय्य रकमा वसूलीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

शासकीय वसूलीबाबत संबंधित विशेष लेखापरीक्षण यांच्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येतो. तसेच सदर कर्ज रकमेच्या वसूलीबाबत मासिक बैठकीमध्ये सुद्धा आढावा घेण्यात येतो.

भागधारकांकडून देय भागभांडवल वसूल न करणे:-

२.६. ऊस उत्पादकांना, शासनाकडून, वित्तीय संस्थांकडून आणि नामनिर्देशित सदस्यांकडून सहकारी साखर कारखाने भांडवल उभारतात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम २३ प्रमाणे त्यांच्या परिमंडल आणि कार्यरत क्षेत्रातील प्रत्येक पात्र शेतकरी अर्जदारास सहकारी साखर कारखान्यानी त्यांचे सदस्य म्हणून दाखल करून घेणे बंधनकारक आहे. सहकारी साखर कारखान्यांचे सदस्य होण्यासाठी अर्जदार शेतकऱ्याने प्रत्येक भागास रु. ५००० (प्रत्येक शेतकऱ्यांना भाग भांडवलासाठी कमीत कमी रक्कम जुलै, १९९२ पर्यंत रु.२००० जुलै, १९९२ ते एप्रिल, २००० पर्यंत रु.३००० आणि एप्रिल,२००० नंतर रु. ५०००/-) प्रावस्थीकरण पद्धतीने (अर्जाबरोबर रु. १२५०/- भरायचे असतात, सदस्य नोंदणी झाल्याची सूचना मिळालेल्या तारखेच्या एका महिन्यांच्या आंत रु. २५०० आणि शिल्लक रक्कम नियम वाटप झाल्याच्या एक वर्षांच्या आत भरावयाची असते.) (phased manner) एक वर्षांत भरावयाचे असतात. चांचणी तपासणी केलेल्या कार्यरत २२ सहकारी साखर कारखान्यांनी एकूण रु. १६४.४१ कोटी भाग किंमत भागधारकांकडून वसूल केले नाहीत. स्वतःचे भाग भांडवल उभारले असते तर त्यांचे कर्जावर अवलंबून राहणे कमी झाले असते. शासनाने म्हटले (जानेवारी २००८) की मंत्र्यांच्या समितीने सहकारी साखर कारखान्यांना ऊसाच्या किंमत देयकांतून सक्तीने वजावट करून त्यांचे भाग भांडवल उभारण्यास मुभा देण्याचा निर्णय घेतला (ऑगस्ट २००६) आणखीन नाबार्ड पॅकेज अंतर्गत (एप्रिल २००५) मुदतीच्या कर्जाची पुनर्बांधणी (restructuring) करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्या सदस्यांच्या भाग भांडवलाचा स्तर वाढवावा. नाबार्ड स्तरावरील समिती अनुपालनाचे संनियंत्रण करते. मात्र, हे पुढाकार घेऊनही परिच्छेद ३.५.२ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, सहकारी साखर कारखान्यांनी त्यांचे स्वतःचे भाग भांडवलाचा पाय वाढविला नाही ही वस्तुस्थिती उरते.

मार्च, २००६ अखेर २२ पैकी चांचणी तपासणी केलेल्या कार्यरत १९ सहकारी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना भाग धारक सदस्य म्हणून नोंदवून घेण्यासाठी रु.७२.१५ कोटी गोळा केले. आवश्यक कागदपत्रे सादर केली नाहीत या सबबीखाली त्यांना रक्कम भाग अनामत (निलंबन) म्हणून सहकारी साखर कारखान्यांकडे राहीली. आयुक्तांनी साखर कारखान्यांना हे निलंबन लवकर समायोजित करण्याचे निर्देश दिले नाहीत. सहकारी साखर कारखान्यांनी नफा-तोटा पत्रकांत तोटा दर्शविल्याने, ह्या रकमा सहकारी साखर कारखान्यांनी खर्च केला असण्याची शक्यता आहे जे अनियमित आहे. शासनाने म्हटले (जानेवारी, २००८) ही साखर गिरण्यांना भागांची पूर्ण रक्कम वसूल करून भाग प्रमाण पत्रे देण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत.

ज्ञापन :—

२.७. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहकारी साखर कारखान्याच्या भागाची किंमत रुपये ३००० वरुन रुपये ५००० करण्याचे आदेश शासनाने दि.२६ जानेवारी २००१ रोजी निर्गमित केले आहे. त्यानुसार भागाच्या वाढीव किंमतीतील फरक ही ऊस उत्पादक शेतकऱ्याने गाळपासाठी पुरविलेल्या ऊस किंमतीतून तसेच बिन परतीच्या ठेवीतून वसूल करण्यात येत आहे. मा मंत्री समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सहकारी साखर कारखान्याने नवीन प्रकल्प हाती घेतल्यास त्यासाठी लागणारे जादा भागभांडवल हे भागधारकांच्या परती व बिनपरतीच्या ठेवीतून उभारावयाचे आहे. त्याप्रमाणे, सहकारी साखर कारखाने स्वनिधी उभारत आहेत. सहकारी साखर कारखान्यामध्ये भाग धारकांचा समावेश करणे व त्याअनुषंगाने स्वनिधी जमा करण्यासाठी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालकांना सूचना देण्याबाबत प्रादेशिक सहसंचालक व विशेष लेखापरिक्षक यांच्या सभेत सूचना देण्यात येतात.

रोकडवही आणि पास बुक शिलकेचा ताळमेळ :—

२.८. दोन सहकारी साखर कारखान्यांनी रोकडवही आणि पास बुकातील शिलकेच्या तफावतीचा ताळमेळ केला नव्हता. त्यामुळे रु. १३.२६ कोटीच्या लबाडया झाल्या.

रोकड वहीतील शिलकेचा पास बुकातील शिलकेची ताळमेळ सांविधिक लेखापरीक्षकांनी तपासायचा असतो आणि ताळमेळ झाला नसल्यास त्या मुद्दाचा लेखापरीक्षण अहवालांत समावेश करावयाचा असतो. निफाड आणि कादवा सहकारी साखर कारखान्यांनी रोकड वहीतील शिलकेचा पासबुकातील शिलकेच्या तफावतीच्या ताळमेळ केला नव्हता. आयुक्तांनी ताळमेळ झाल्याचे सुनिश्चित करायचे होते अथवा त्रयस्थांमार्फत ताळमेळ करून घ्यायचा होता आणि त्याचा खर्च अधिनियमाच्या वसूल करायचा होता. यामुळे लबाडीची घटना टाळत आली असता अथवा कमी पुढील परिच्छेदांत चर्चा केल्याप्रमाणे त्याचा लवकर तपास लावण्यास सहाय्य झाले असते.

• आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे (फेब्रुवारी १९८२), सहकारी साखर कारखान्यांनी विकलेल्या साखरेची पूर्ण किंमत मिळाल्यावरच त्याचा पुरवठा (delivery) करायचा असतो. बँकेकडून निफाड सहकारी कारखान्याने त्यांच्या बँकेकडून चेक वटल्याची खातर जमा न करता धनादेशावर साखर विकली (जून २००५) नोव्हेंबर,२००४ ते एप्रिल २००५ कालावधीत रु. १०.१२ कोटीचे व्यापाऱ्यांकडून प्राप्त झालेले धनादेश न वटता परत आले,परंतु हे सत्य सहकारी साखर कारखान्याला समजले नाही कारण रोख आणि बँकेतील रोख शिलकेचे ताळमेळ करण्यांत येत नव्हते. सांविधिक लेखपरीक्षकांने ही लबाडी जुलै २००७ मध्ये शोधून काढली. विहित पद्धतीपासून विचलन (deviate)

झाल्याने आणि रोकड वही आणि बँकेतील शिलकेचा ताळमेळ न केल्यामुळे रु.१०.१२ कोटीची लबाडी वेळेवर शोधता आली नाही आणि प्रलंबित तारण कर्जाच्या रकमेवरील टाळता येण्याजोगा व्याजाचा (रु. ३ कोटी) तोटा सहकार साखर कारखान्याला सहन करावा लगाला.

• बँकेत पैसे भरणा केल्याचा पुष्टयर्थ बनावट रकमा (रु.३.१४ कोटी) चलनाच्या स्थळ प्रतीवर लिहून (२००४-०५) साखर खरेदी करण्यासाठी व्यापाऱ्यांनी कादवा सहकारी साखर कारखान्याच्या साखर (विक्रीच्या उत्पन्नातून तारण केलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी सहकारी साखर कारखान्याने अग्रेसर बँकेत खाते उघडले होते.) विक्री विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तारण ठेवलेली साखर व्यापाऱ्यांना देण्यास सूचना दिल्या रोकड वही आणि पासबुकातील शिलकेचा ताळमेळ सहकारी साखर कारखान्याने केला नसल्याने लबाडीचे सत्य सांविधिक लेखापरीक्षकाने जुलै, २००७ मध्येच उघडकीस आणले.

आयुक्तांनी म्हटले (जानेवारी, २००८) की निफाडच्या संबंधित व्यक्तीविरुद्ध आणि कादवा सहकारी साखर कारखान्याविरुद्ध FIR दाखल केला गेला होता (जुलै, २००७).

• चालू भांडवली कर्जासाठी (तारण कर्ज) सहकारी साखर कारखान्यांची साखर अग्रेसर बँकेस तारण ठेवली होती. साखरेच्या विक्री केलेल्या उत्पन्नातून कर्ज फेड करण्यात येते.

ज्ञापन :—

२.९. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासकीय विशेष लेखापरिक्षक यांनी नाशिक जिल्ह्यातील निफाड व कादवा सहकारी साखर कारखान्यांच्या बँक खात्याची तपासणी करून संबंधित कारखान्यांचा आर्थिक गैरव्यवहार व अफरातफर शोधून काढली असून त्यांच्याविरुद्ध दिनांक ४ जुलै, २००७ व दिनांक २५ जुलै, २००७ रोजी FIR No. अनुक्रमे ७६/२००७, ११०/२०७ असा आहे. याबाबत प्रशासकीय कारवाईसाठी संबंधित लेखापरिक्षकांकडून लेखापरीक्षण अहवाल व विशेष अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची छाननी करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ खाली चौकशी चालू आहे.

निफाड सहकारी साखर कारखान्यामध्ये सन २००४-०५ मध्ये साखर व्यापाऱ्यांनी ९५ चेक रु. १०,१२,१२९ चे कारखान्यास देऊन साखर उचल केली व सदर चेक न वटल्याने कारखान्याची फसवणूक झाल्याप्रकरणी निफाड पोलीस स्टेशनला संबंधित व्यापारी कारखान्याचे संचालक मंडळ अधिकारी कर्मचारी व नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्मचारी यांचे विरुद्ध एफ.आय.आर क्र. ७५/२००७ दाखल केलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

कादवा सहकारी साखर कारखान्यांमधील आर्थिक अनियमितता व अफरातफर विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (साखर) नाशिक यांनी निदर्शनास आणली असून, संबंधितांविरुद्ध पोलीस केस दाखल केलेली आहे. दिनांक ४-७-२००७ व कादवा सहकारी साखर कारखाना अपहार रु. ३,१३,५९,५६०/- रकमेचा एफ.आय.आर क्र. १/११/२००१ दिनांक २५/७/२००७ संबंधित कारखान्यांविरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच सहकार कायद्यातील तरतूदीनुसार वरील दोन्ही कारखान्यांविरुद्ध चौकशीची कार्यवाही चालु आहे. तसेच वरील दोनही केसेस न्यायप्रविष्ठ आहेत.

लेखापरीक्षणाच्या वेळी रोकड वही व पासबुक यांचाताळमेळ घेऊन तपासणी करण्यात यावी व तसे अभिप्राय लेखापरीक्षण अहवालामध्ये नोंदविण्याबाबत विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (साखर) यांना आदेशित केलेले आहे.

रस्ते विकास अनुदान :——

२.१०. गळीत हंगामात वाहतूक सुलभ होणे सुनिश्चित करण्यासाठी ऊस शेतीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याच्या विकासासाठी आयुक्त सहकारी साखर कारखान्यांना रस्ते विकास निधीतून अनुदान देतात. ही अनुदान बँकेत स्वतंत्र खात्यात जमा करावयाची आणि आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी खर्च करायची असतात. अखर्चित शिल्लक आर्थिक वर्षअखेर शासनास भरणा करायची असते. २००१-०६ कालावधीत रु. २३.५० कोटीचे रस्ते अनुदान ४३ सहकारी साखर कारखान्यांना देण्यात आले होते. रु. १५.०६ कोटीची उपयोजन प्रमाणपत्रे २० सहकारी साखर कारखान्यांकडून मार्च, २००६ अखेर प्राप्त झाली नव्हती.

रस्ते विकास अनुदान दिलेल्या आणि चाचणी तपासणी केलेल्या कार्यरत सहकारी साखर कारखान्यांपैकी कोणीही हे अनुदान त्याच आर्थिक वर्षांत पूर्णपणे खर्च केले नव्हते. चार सहकारी साखर कारखान्यांनी (आदिवासी - नंदुरबार, गोदावरी दुधना-परभणी, जय जवान - लातुर, सातपुडा-तापी धुळे) १९९४-२००६ कालावधीत संवितरीत केलेल्या रु. ८६.११ लाखांची उपयोजन प्रमाणपत्रे सादर केली नव्हती. या अनुदानाचा दुर्विनियोग अनधिकृत हेतूसाठी खर्च केला गेला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. आयुक्तांना मंजूर करण्यासाठी सादर केलेले त्यांचे प्रस्ताव अद्यापि मंजूर केले नाही या सबबीवर वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली आणि दौलत सहकारी साखर कारखाना, कोल्हापूर यांनी अनुक्रमे रु. १४ लाख आणि रु. १९ लाख अखर्चित रक्कम १० वर्ष व्यपगत होऊनही परत केली नाही. २००६-०७ पर्यंत मुदतवाढ देऊनही २००५-०६ वर्षांत निफाड सहकारी साखर कारखान्याला दिलेल्या रु. ९७ लाखांपैकी रु.१८ लाख खर्च केले नाही. कन्नड सहकारी साखर कारखाना, औरंगाबादने, मार्च, २००१ मध्ये मंजूर केलेला रु. २.७५ लाखाचा रस्ते विकास निधी शासनाच्या प्रलंबित हमी फी च्या प्रदानासाठी अपवाहित केला.

अशाप्रकारे रु. १.४० कोटीची अखर्चित शिल्लक चाचणी तपासणी केलेल्या आठ जिल्ह्यांत अनधिकृतपणे ठेवण्यात आली होती. सहकारी साखर कारखान्यांना शासनाचा निधी राखून ठेवण्यास मुभा देण्याऐवजी तो आयुक्तांनी वसूल करायला हवा होता. आयुक्तांनी म्हटले (जानेवारी २००८) की सहकारी साखर कारखान्यांना त्वरित उपयोजन प्रमाणपत्रे पाठविण्यास अथवा अखर्चित शिलकेचा परतावा करण्यास सांगण्यात आले. निर्देशाचे अनुपालन सहकारी साखर कारखान्यांनी केले नसल्याने महाराष्ट्र सहकारी साखर संस्था अधिनियमाच्या कलम ७८ प्रमाणे कसूर केलेल्या व्यवस्थापनांवर कारवाई करायला हवी होती.

ज्ञापन

२.११. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१. रस्ते विकास अनुदान वितरित करताना साखर आयुक्त कार्यालयाने विशिष्ट अटी व शर्ती घालून दिल्या आहेत त्यापैकी महत्त्वाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :——

१.१ सहकारी साखर कारखान्यांनी रस्ते विकास निधीची रक्कम स्वतंत्र बँक खात्यात ठेवावी. (सदर अट आता शिथील करण्यात आली आहे. जेणेकरून संबंधित सहकारी साखर कारखान्यांना रस्ते विकास अनुदान निधीचा विनियोग त्यांच्या मर्जीप्रमाणे करता येईल).

१.२ काही वेळा रस्ते विकास अनुदानाची रक्कम आर्थिक वर्षांच्या शेवटच्या तीन महिन्यात वितरित करण्यात येत असल्याने त्या आर्थिक वर्षात खर्च करणे शक्य होत नाही. सदर निधीचा विनियोग वाढीव मुदतीत करण्याची तरतूद निधी मंजूर करण्याच्या आदेशात संलग्न करण्यात आली असून सहकारी साखर कारखान्यांच्या विनंतीवरुन त्या निधीचा उपयोग पुढील आर्थिक वर्षात करण्याची तरतूद आहे.

१.३ संबंधित सहकारी साखर कारखान्यांनी सदर निधीचा विनियोग दाखला सादर करावा अन्यथा सदर अखर्चित निधी शासकीय कोषागारात जमा करावा अशा सूचना साखर आयुक्तालयाने संबंधित सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या आहेत.

सदर लेखापरीक्षण अहवालात सन १९९४-९५ ते २००५-०६ या कालावधीत रु. ४.०३ कोटीचे विनियोग दाखले गोदावरी दुधना, जय जवान जय किसान, आदिवासी आणि सातपुडा सहकारी साखर कारखाना यांच्याकडून प्राप्त झाले नाहीत असे नमूद केले आहे. याबाबत स्पष्टीकरण देण्यात येते की, संबंधित सहकारी साखर कारखान्याकडून रु. ८६.११ लाख एवढ्या रकमेचे विनियोग दाखले येणे बाकी आहे.

कन्नड, वसंतदादा सांगली, दौलत, निफाड व वरील परिच्छेदात नमूद असलेले सहकारी साखर कारखान्याकडील निधी विनियोग दाखल्याबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	कारखान्याचे नाव	वितरित अनुदान	प्राप्त झालेले विनियोग दाखले
१	कन्नड, औरंगाबाद	२.७५	०
२	वसंतदादा, सांगली	१४८.३४	१४८.३४
३	दौलत, कोल्हापूर	४.२६४	२९.१४
४	निफाड, नाशिक	१४८.८६	६७.३
५	गोदावरी, दुधना	१८.६९	८.४३
६	जय जवान	३८.०१	०
७	आदिवासी	०	०
८	सातपुडा	७७.६८	७७.६८
	एकूण	४७६.७९	३३०.८९

साखर आयुक्तालयाने दिनांक ८ जून २००७ च्या पत्राने संबंधित सहकारी साखर कारखान्यांना विनियोग दाखले तात्काळ सादर करणेबाबत कळविले आहे. साखर आयुक्त कार्यालयाकडून अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सहकारी साखर कारखान्यांना शासकीय कर्जे

साखर विकास निधीतून कर्जे :—

२.१२. ज्या तेरा सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादन वाढीसाठीच्या कर्जाच्या पहिल्या हप्त्याच्या (रु. १०.७३ कोटी) कमी वापर केला व दुर्विनियोग केला त्यांना परिसमापनाला सामोरे जावे लागेल.

साखर कारखान्यांच्या विकास कार्यासाठी प्रत्येक क्विंटल साखर उत्पादनावर रु. १४ चा उपकर लादून केंद्र शासनाने साखर विकास निधीची (SDF) स्थापना केली. (१९८२) ऊस उत्पादन वाढविण्यासाठी, आधुनिकीकरण, सहकारी साखर कारखान्यांचा विस्तार आणि सहकारी साखर कारखान्यांनी सह-निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी साखर निधीतून विकास कर्जे उपलब्ध आहेत. पूर्ण छाननी करून, ह्या रक्कमा वापरुन ऊस उत्पादनात वाढ होईल याची स्वतः खात्री करून आयुक्तांनी सहकारी साखर कारखान्यांना कर्जे देण्याच्या प्रस्तावास शिफारस करायची असते.

१९८२-८३ ते २००५-०६ कालावधीत राज्यातील साखर कारखान्यांनी (खाजगी गिरण्यांसहित) रु. १.३१२.६० कोटी निधीस अंशदान केले. २००१-०६ कालावधीत अंशदान केलेल्या रु. ४८८.२५ कोटीचा समावेश होता. २००१-०६ कालावधीत संवितरित केलेले कर्ज रु. १७६.५८ कोटी होते. अशाप्रकारे त्याच कालावधीत निधीत अंशदान केलेल्या रकमेची साखर विकास निधीतून प्राप्त सहाय्याची टक्केवारी फक्त ३६ टक्के होती. मार्च, २००६ अखेर प्रलंबित कर्ज आणि त्यावरील दंडनीय व्याज मिळून रु. ७२५.३६ कोटीचे होते. जानेवारी, २००८ अखेर पाच सहकारी साखर कारखान्यांनी रु. १२.८२ कोटीचे सादर केलेले प्रस्ताव (२००३-०४ ते २००५-०६) केंद्र सरकारच्या छाननी समितीकडे एक ते चार वर्षे कालावधीसाठी प्रलंबित होते.

आयुक्तांनी म्हटले (डिसेंबर, २००७) की काही सहकारी साखर कारखाने साखर विकास निधीचे सहाय्य घेऊ शकले नाहीत कारण प्रस्तावाच्या छाननीत ते सहाय्यासाठी अर्हता प्राप्त करून घेण्यात अपयशी ठरले. शासनानेही म्हटले (जानेवारी २००८) की साखर कारखान्याच्या कर्जाच्या परताव्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

१९८२-८३ ते २००५-०६ पासून केंद्र शासनाने १११ सहकारी साखर कारखान्यांना ऊस विकासासाठी रु. १५३.६८ कोटीचे कर्ज दिले. मात्र १३ सहकारी साखर कारखान्यानी फक्त कर्जाचा पहिला हप्तात घेतला कारण त्यांनी त्याचा विनियोग त्या उद्देशासाठी केला नव्हता. या सहकारी साखर कारखान्यांकडून रु. १०.७३ कोटीची उपयोजना प्रमाणपत्रे प्राप्त झाली नाहीत. मार्च, २००२ ते सप्टेंबर, २००६ कालावधीत त्यांच्या क्षेत्रातील ऊस उत्पादन विकासाअभावी, त्यांचे कार्य अनार्थिक झाल्यामुळे सहकारी साखर कारखान्यांना अखेर परिसमापनाखाली आणावे लागेल. अशाप्रकारे सहकारी साखर कारखान्यांच्या कमी वापरामुळे वा कर्जाच्या दुर्विनियोजनामुळे आणि सुधारणा करण्यासाठी आयुक्तांनी कार्यवाही न केल्यामुळे ऊस उत्पादन विकास रखडला आयुक्तांनी म्हटले (जानेवारी २००८) की निर्धारित सूचीप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीमुळे ऊस विकासाचे कार्यक्रमासाठी सहकारी साखर कारखान्यांनी पुढील हप्ते घेतले नव्हते. त्यांनी म्हटले की, आर्थिक, तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कारणांमुळे त्यांना परिसमापनात जावे लागेल. उत्तर समर्थनीय नाही कारण कर्जासाठी शिफारस करण्यापूर्वी आयुक्तांनी स्वतः उचित छाननी करून हे सुनिश्चित करावयास हवे होते की या कर्जाचा वापर ऊस उत्पादन वाढीस होऊ शकेल.

१९८२-८३ ते २००५-०६ कालावधीत ४४ सहकारी साखर कारखान्यांच्या आधुनिकीकरणासाठी आणि विस्तारासाठी रु. ३२६.३६ कोटी संवितरित केले तरीही बेलगंगा सहकारी साखर कारखाना, जळगांव १९९६ पासून, आंबेजोगाई सहकारी साखर कारखाना, बीड, १९९७ पासून जय भवानी सहकारी साखर कारखाना बीड आणि शिवपूर सहकारी साखर कारखाना, धुळेकडून १९९८ पासून रु. १४.९० कोटीची उपयोजन प्रमाणपत्रे प्राप्त झाली नाहीत.

पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या सह-निर्मिती प्रकल्पांसाठी २००५-०६ मध्ये

रु. ७.१६ कोटी देण्यात आले. त्यापैकी रु. ३.५८ कोटीची उपयोजन प्रमाणपत्रे सादर केली नव्हती.

ज्ञापन :—

२.१३. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाने साखर विकास निधीतून कर्ज मंजूर केलेले प्रस्ताव खालीलप्रमाणे :—

अ.क्र	वर्षे	साखर विकास निधीमधून मंजूर झालेल्या कारखान्यांची संख्या
१	२०००-०१	७
२	२००२-०३	६
३	२००३-०४	२०
४	२००४-०५	१३
५	२००५-०६	१२
६	२००६-०७	७

वरील प्रस्तावाशिवाय खालील ५ सह साखर कारखान्यांचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या छाननी समितीपुढे आहेत :—

(१) पूर्ती शुगर मिल्स नागपूर

(२) श्रीनाथ म्हस्कोबा शुगर मिल्स, पुणे

(३) निनाईदेवी सह साखर कारखाना, म. सांगली,

(४) जयजयवान जय किसान सहकारी साखर कारखाना, म. लातूर

(५) पांडुरंग सहकारी साखर कारखाना, म. सोलापूर

वरील सर्व प्रस्ताव प्रत्येकी रु.२७० लाख एवढ्या रकमेचे असून सदर प्रस्ताव ऊस विकास कार्यक्रम राबवण्यिासाठी साखर विकास निधीतून कर्ज प्राप्त करण्यासाठी आहेत. राज्यातील अनेक सहकारी साखर कारखान्याकडून साखर विकास निधी कर्जे परतफेड न केल्याने थकीत झाली आहेत. कारखान्यांची आर्थिक बिकट परिस्थिती या कारणाने साखर कारखाने कर्जफेड करू शकलेले नाहीत. सदर कर्जफेड करण्याबाबत साखर आयुक्त कार्यालयाकडून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. साखर कारखान्याकडे उपलब्ध होणारा निधी तसेच केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून साखर विकास निधीचे कर्ज भागविली जातात.

साखर विकास निधीतून उपलब्ध होणारे कर्ज हप्त्याने मिळत असल्याने जे कारखाने नियोजित ऊस विकास कार्यक्रम योग्यरितीने अंमलबजावणी करीत नाहीत त्यांना या निधीतून पुढील हप्त्याचे कर्ज उपलब्ध होत नाही.

साखर विकास निधीतून कर्ज घेतले परंतु तद्‌नंतर अवसायनात निघालेल्या सहकारी साखर कारखान्याबाबत सादर करण्यात येते की, सहकारी साखर कारखान्यांना अवसायनात घेताना साखर विकास निधीच्या कर्जाव्यतिरिक्त इतर आर्थिक, तांत्रिक व व्यवस्थापकीय कारणे देखील कारखान्याच्या अवसायनास कारणीभूत ठरतात. साखर विकास निधी कर्जाचा विनियोग संबंधित साखर कारखान्यांच्या लेखापरिक्षकाकडून तपासण्यात येऊन व अभिप्रायासह प्रमाणित करून संबंधित प्रादेशिक सहसंचालक यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात येतो व त्याची योग्य ती छाननी केली जाते.

साखर विकास निधीतून कर्ज मिळण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची योग्य ती छाननी करण्याची काळजी भविष्य काळात घेण्यात येईल.

महाराष्ट्रात सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार रजिस्ट्रारची खात्री झाल्यानंतरच कारखाने अवसायनात घेण्यबाबत कार्यवाही केली जाते. साखर विकास निधीचा विनियोग न केल्याने किंवा दुर्विनियोग या कारणासाठी सहकारी साखर कारखाने अवसायनात घेण्याची कार्यवाही केली जात नाही.

सदर योजनेच्या निधीचा विनियोग न केल्यास अथवा दुर्विनियोग केल्यास संबंधित कारखान्याविरुद्ध कार्यवाही करण्याची तरतूद या योजनेत नमूद केली आहे.

कर्ज उभारण्यासाठी हमी :—

२.१४. हमी फी ची आकारणी आणि वसूलीच्या अटीवर साखर कारखाने उभारण्यासाठी कर्जे उभारण्यास शासनाने हमी दिल्या होत्या. जर सहकारी साखर कारखान्यांना कर्जाची परतफेड करता आली नाही तर बँका हमीचे अपवाहन करतील आणि शासनाला परतफेड करावी लागेल. मार्च, २००६ अखेर १७२ सहकारी साखर कारखान्यांना लुप्त (Defunet) स.सा.का. सह.

रु. ३५५७.०९ कोटीच्या हमी शासनाने दिल्या. त्यापैकी २६ सहकारी साखर कारखान्यांच्या

रु. १४७.४५ कोटीच्या हमी बँकानी अपवाहित केल्या. या २६ सहकारी साखर कारखान्यापैकी फक्त तीन सहकारी साखर कारखान्यांनी दत्त असुर्ले कोल्हापूर, जय भवानी-बीड, नाशिक (पलसे) नाशिक कर्जाची परतफेड शासनास केली.

मार्च, २००६ अखेर सहकारी साखर कारखान्यांकडून प्रलंबित एकूण हमी फी, दंडनीय व्याजासहित नियत व्याज दराच्या दंडनीय व्याजदर २% अधिक रु. ५६३.०२ कोटी होती.

ज्ञापन :—

२.१५. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने २९ सहकारी साखर कारखान्याकडील शासन हमीवरील दिलेल्या थकीत कर्जाची वसूली होण्यासाठी रु. १९७.०० कोटी एवढ्या हमी रकमेचे अवाहन करण्याबाबत प्रस्ताव दिला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक ससाका-२००६/ सीआर-२९२/३-स, दिनांक ३० मार्च २००७ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस रु. ५ कोटी ॲडहॉक तत्त्वावर मंजूर केले आहेत.

वरील २९ सहकारी साखर कारखान्यापैकी पाच सहकारी साखर कारखाने अवसायनात घेण्यात आले असून घृष्णेश्वर सहकारी साखर कारखान्याची अद्यापपर्यंत उभारणी पूर्ण झालेली नाही. उर्वरित सहकारी साखर कारखान्यांकडून कर्जाची रक्कम वसूली करण्यासाठी संबंधित सहकारी साखर कारखान्यांच्या साखर विक्रीतून रक्कम वसूल करणेबाबत बँकेस सूचित करण्यात आले आहे.

२.१६. दिनांक ५ ऑगस्ट २००४ च्या निर्णयानुसार दिनांक ३१ मे २००४ अखेर थकीत हमी शुल्काचे ८ वर्षे कालावधीसाठी (३ वर्षे विलंबावधीसह) बिनव्याजी कर्जात रुपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सन २००७-०८ मध्ये ११ सहकारी साखर कारखान्याच्या रु. २३.९४ कोटी थकीत हमी शुल्काचे व सन २००८-०९ मध्ये १४ सहकारी साखर कारखान्यांच्या रु. ९.९९ कोटी थकीत हमी शुल्काचे बिनव्याजी कर्जात रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक ३१ मार्च २०११ च्या आकडेवारीनुसार शासनाने विविध सहकारी साखर कारखान्यांना कर्ज उभारण्यासाठी रु. २३९३.०४ कोटी रकमेस हमी दिली आहे. यापैकी रु. ९५६.९९ कोटी अधिक व्याज रु. ४७८.४६ कोटी म्हणजेच एकूण १४३३.४५ कोटी कर्जाची परतफेड कारखान्यांद्वारे दिनांक ३१ मार्च २०११ अखेर करण्यात आलेली आहे. तर रु. ८९२.१८ कोटी कर्ज थकीत आहे. तसेच रु. १७१८.६० कोटी येणे बाकी दिसून येते.

हमीशुल्क

२.१७. राज्य शासनाने दिनांक ०५ ऑगस्ट २००४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिनांक ३१ मे २००४ अखेर थकीत असलेल्या हमी शुल्काचे बिनव्याजी कर्जात रुपांतर केले आहे. तसेच दिनांक ३१ मार्च २००८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ११ साखर कारखान्यांकडील रु. २३.९४ कोटी थकीत हमीशुल्काचे रुपांतर करण्यात आले आहे. तसेच दिनांक २५ मार्च २००९ च्या शासन निर्णयाद्वारे ९.९९ कोटी थकीत हमीशुल्काचे बिनव्याजी कर्जात रुपांतर करण्यात आले आहे.

दिनांक ३१ मार्च २०११ अखेर हमी शुल्कापोटी रु. १५२.०९ कोटी येणे बाकी दिसून येते. (हमीशुल्क रु. १०७.५४ कोटी व व्याज रु. २७.४४ कोटी + दंडव्याज रु. १७.११ कोटी) सदर रकमेपैकी रु. २०.७९ कोटीची परतफेड कारखान्यांनी केली असून रु. १३१.३० कोटी थकीत आहे.

वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचा वापर

२.१८. सहकारी साखर कारखान्यांनी घेतलेल्या भाग-भांडवलाच्या आणि संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या निधीचे व्यवस्थापन आणि सनियंत्रण आयुक्त आणि प्रादेशिक सहसंचालकानी करायचे होते. हंगामपूर्व वित्तीय व्यवस्था आणि खेळत्या भांडवलाच्या प्रस्तावांची त्यांनी छाननी करून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला मानकांप्रमाणे शिफारसी करायच्या होत्या. संस्थांच्या व्याजासहित कर्जाच्या हप्त्याचे वसूलीवर सुद्धा त्यांनी लक्ष ठेवायचे होते.

ज्ञापन :—

२.१९. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहकारी साखर कारखाने त्यांच्या आवश्यकतेनुसार विविध कारणांसाठी वित्तीय संस्थांकडून कर्जाची उभारणी करतात. सदर कर्जे ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखाली नियम, १९६१ आणि कारखान्याच्या उपविधीमध्ये निश्चित केलेल्या कर्ज मर्यादेएवढीअसतात. कारखान्याच्या आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कर्ज उभारणी मर्यादा निश्चित करताना साखर आयुक्त कार्यालय स्तरावर खालील बाबीकडे लक्ष दिले जाते.

१. उद्देश व खर्च करण्याची आवश्यकता.

२. नक्त मूल्य, नफा-तोटा व कारखान्याचे स्वभांडवल.

३. पूर्वी दिलेल्या कर्जाचा विनियोग व खर्च करण्यासाठी अंतिम मंजुरी.

४. प्रस्तावांची मान्यताप्राप्त तांत्रिक संस्थेकडील मान्यता.

५. शासन थकहमीवरील कर्जाचा विनियोग.

६. शासन थकहमीवरील पूर्व हंगामी कर्जाचा विनियोग.

७. गैरविनियोग आढळून आल्यास त्यासंबंधी केलेली चौकशी.

८. कारखान्याने घेतलेली तोडणी वाहतूक कर्जे व तोडणी वाहतूक संस्थांना दिलेली थकहमी विचारात घेतली जात नाही.

९. भांडवली खर्चासाठी बाहेरील कर्ज उभारणी विचारात घेतली जाते.

१०. साखर आयुक्तालय व नाबार्डच्या अधिनस्त असलेल्या समितीच्या पूर्व परवानगीशिवाय बँकेने भांडवली खर्चास मान्यता किंवा कर्जाचे वितरण करू नये.

सहकारी साखर कारखान्यांनी घेतलेल्या भागभांडवल आणि वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या व्यवस्थापन व संनियंत्रणाच्या संदर्भात नमूद करण्यात येते, शासनाने सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या भागभांडवलाच्या व कर्जाच्या वसूलीचे कामकाज हे साखर आयुक्तालयाकडून केले जाते. तथापि वित्तीय संस्थांनी दिलेल्या कर्जाचे व्यवस्थापन व वसूली ही संबंधित कर्ज देणाऱ्या संस्थेने करावयाची आहे. विशेषतः महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने त्यांच्या ताब्यात असलेल्या साखरेच्या साठ्यातून त्याची विक्री करतेवेळी बँकेने दिलेल्या कर्जाची वसूली व्याजासह करावयाची आहे. त्यामुळे बँकांनी दिलेल्या कर्जाच्या वसूलीवर शासनाकडून लक्ष ठेवणे अपेक्षित आहे.

हंगामासाठी आणि वाहतुकीसाठी कर्जे :—

२.२०. साखर कारखान्यांना ऊसाची नियमित आवक होण्यासाठी आणि दैनंदिन गळीत क्षमतेचा वापर करण्यासाठी सहकारी साखर कारखाने हंगाम आणि वाहतुकीसाठी सुरूवातीला खर्च करतात आणि नंतर ऊसाच्या देयकांतुन (तो) समायोजित करतात. सहकारी साखर कारखाने त्यांनीच निर्माण केलेल्या नाममात्र न्यासांद्वारे हंगाम आणि ऊसाची वाहतुक करून घेतात. साखर कारखान्याचे या कार्याचे सर्व व्यवहार या न्यासांमार्फत करण्यात येतात आणि न्यासांचे अनुषंगिक खर्च सहकारी साखर कारखाने सोसतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी (DCC) बँकेकडून आणि इतर बँकांकडून कंत्राटदारांकडून हे अग्रिम वसूल करून त्याच गळीत हंगामात समायोजित करायचे असते आणि कर्जावरील व्याज सहकारी साखर कारखान्यांनी सोसायचे असते. सहकारी साखर कारखान्यांच्या मार्च २००६ अखेरच्या ताळेबंदाप्रमाणे कंत्राटदारांकडून प्रलंबित एकूण अग्रिमे रु. २३.३४ कोटी होती. कंत्राटदारांकडून वसूल केलेल्या रकमा आणि बँकांना परतफेड न केलेली रक्कम रु. ९२.७३ कोटी होती.

पर्याप्त प्रतिभूति घेतल्याविना सहकारी साखर कारखान्यांनी (H & T) कंत्राटदारांना अग्रिमे दिली. त्यामुळे कसुरवार कंत्राटदारांकडून अग्रिमांची वसुली करणे दुष्कर झाले. जरी कसुरवार कंत्राटदारांवर कायदेशिर कारवाई करण्यात आली तरी अग्रिमे वसूल होऊ शकली नाहीत आणि सहकारी साखर कारखान्यांना प्रलंबित परतफेड बँकांना करावी लागली.

तीन सहकारी साखर कारखान्यांनी (निफाड, संत तुकाराम आणि वसंतदादा) (H & T) कंत्राटदारांना अग्रिमे देण्यासाठी एप्रिल, २००२ ते एप्रिल, २००४ मध्ये बँकेकडून रु. १८.५१ कोटीचे कर्ज घेतले ज्यावेळी निफाड सहकारी साखर कारखान्याचे त्यांच्या कंत्राटदाराकडून संपूर्ण अग्रिम (रु. ३.५० कोटी) वसूल केला त्याचवेळी संत तुकाराम आणि वसंतदादा सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्या कंत्राटदाराकडून अनुक्रमे ५.४३ कोटी (रु. ८.८० कोटी पैकी) आणि रु. ५.२१ कोटी (रु. ६.२१ कोटी पैकी) वसूल केले. सहकारी साखर कारखान्यांच्या लेख्यावरून उघड होते की बँकेच्या कर्जाचा परतावा करण्याऐवजी त्याचा विनियोग अन्य कारणासाठी केला गेला. निफाड सहकारी साखर कारखान्याने ऑगस्ट, २००७ मध्ये रु. १.४७ कोटीच्या कर्जाचा परतावा केला आणि व्याजासहित रु. ३.९५ कोटी शिल्लक ठेवले. वसंतदादा सहकारी साखर कारखान्याने व्याज आणि मुद्दल मिळून फक्त रु. ६७ लाखाचा परतावा केला होता. वसंतदादा आणि संत तुकाराम सहकारी साखर कारखान्यांविरुद्ध बँकांनी ऋण वसूली न्यायाधिकरणांकडे अनुक्रमे रु. ११.९८ कोटी आणि रु. ११.४२ वसूलीसाठी दावा दाखल केला होता. तरी संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याने बँकेबरोबर समझोता केला असला तरी त्यांनी मार्च, २००७ रोजी त्यांना फक्त रु. १५ लाखांचे प्रदान केलेले आहे.

अशा प्रकारे, कर्जाऊ रक्कम अयोग्यरितीने वापरल्याने, सहकारी साखर कारखान्यांच्या दायित्त्वात वाढ झाली. सहकारी साखर कारखान्यांच्या कारभारावर संनियंत्रण करण्यासाठी आयुक्तांवर जबाबदारी असूनही त्यांनी अनियमितता रोखण्यासाठी यथोचित कारवाई केली नाही. शासनाने म्हटले (जानेवारी २००८) की सहकारी साखर कारखान्यांना (H & T) अग्रिमांच्या प्रदानासाठी बँकेस हमी देऊ नयेत. अशा सूचना जारी करण्यात येतील.

खालील बाबी लेखापरीक्षणात या कार्यालयाच्या निदर्शनास आल्या आहेत :—

अ.क्र.	कारखान्याचे नाव	कर्ज वाटप दिनांक	कर्ज (रक्कम कोटीत)	व्याजदर %	कंत्राटदाराकडून वसूल केलेले कर्ज	कारखान्यांकडे थकीत कर्जे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
						(रक्कम लाखात)
१	निफाड, नाशिक	ऑक्टोबर, २००२	३.५	११.५	३.५	३९४.१२
२	संत तुकाराम पुणे	एप्रिल, २००२	८.८	१६	५.४३	९५०.७१
३	वसंतदादा सांगली	एप्रिल, २००२	६.२१	१६	५.२१	निरंक

संत तुकाराम सहकारी साखर कारखाना म.पुणे यांनी दिलेल्या हमीवर पवना परिसर सेवा संघ कासारभाई जि.पुणे या संस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे या बँकेकडून रु. ८८० लाखाचे कर्ज घेतले आहे. सदर कारखान्याने तोडणी व वाहतूक कंत्राटदारांकडून रु. ५४३.४८ लाख वसूल केले आहेत. तथापि, कारखान्याने वसूल रक्कम बँकेत भरणा केली नाही. संस्थेने देखील कर्जाची रक्कम बँकेस अदा केली

नाही. संत तुकाराम सहकारी साखर कारखाना म.पुणे यांनी संस्थेस मंजूर झालेल्या कर्जास हमी दिल्यामुळे सदर कर्जाचे दायित्त्व संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याकडे वर्ग केले आहे. त्याप्रमाणे, कारखान्याकडे कर्जाचे रु. ८८० लाख मुद्दल व व्याज रु. २६१.९१ लाख थकीत आहे.

सदर कर्जाची वसूली करण्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.पुणे या बँकेने अर्ज क्र. १००/२००४ अन्वये ऋण वसूली न्यायाधिकरणाकडे दावा दाखल केला. ऋण वसूली न्यायाधिकरणाने दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी बँकेस दाखला दिला ज्यात ऋण वसूली न्यायाधिकरणाने सदर कर्जाची परतफेड सहामाही २० हप्त्यात करण्यास परवानगी दिली. कारखान्याने अद्यापपर्यंत फक्त तीन हप्ते दिले आहेत. दिनांक ३० सप्टेंबर २००७ अखेर रु. ९५०.७१ लाख एवढी कर्जाची थकबाकी आहे. कारखान्याने तोडणी व वहातूक कंत्राटदारांविरुद्ध रु. ३३६.५२ लाख व त्यावरील देय व्याज इतक्या रकमेच्या वसूलीसाठी न्यायालयात दावा दाखल केला आहे.

वसंतदादा सहकारी साखर कारखान्याच्या थकहमीवर वसंतदादा सर्वा सेवा संघ मर्या.सांगली यांनी बँक ऑफ इंडिया येथून रु. ६२१.०० लाखाचे कर्ज ऊसतोडणी व वहातुकीसाठी घेतले आहे. सदर कर्जावर व्याजाचा दर १६ टक्के एवढा आहे. कारखान्याने ठेकेदारांकडून रु. ५२१.०० लाख एवढी रक्कम वसूल केली आहे. परंतु वसूल केलेली सर्व रक्कम बँकेत जमा केली आहे. परंतु वसूल केलेली सर्व रक्कम बँकेत जमा केली नाही. कारखान्याने फक्त रु. ०.२८ लाख मुद्दलात व रु. ३९.०० लाख व्याजात भरणा केली आहे.

बँक ऑफ इंडिया, जि. सांगलीने सदर कर्जाच्या वसुलीसाठी वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली यांच्याविरुद्ध कर्ज वसुली लवादाकडे दावा दाखल केला आहे.

याप्रकरणी कारखान्याने बँकेकडे एकरकमी कर्ज वसूलीचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार व्याजाची सर्व रक्कम सोडून देऊन मुद्दलाची रक्कम एक हप्त्यात भरण्यास कारखान्याने संमती दिली आहे त्यानुसार कारखान्याने संपूर्ण मुद्दल कर्जाची रक्कम बँकेस भरणा केली असून कर्ज खाते बंद करण्यात आले आहे.

निफाड सहकारी साखर कारखान्याच्या थकहमीवर बँक ऑफ बडोदा यांनी ऊसतोडणी वाहतूक ठेकेदारांना रु. ४४३.०० लाख एवढे कर्ज मंजूर केले आहे. कारखान्याने सदर कर्जाची संपूर्ण रक्कम ठेकेदारांकडून वसूल केलेली आहे. तथापि, कारखान्याने वसूल रकमेचा भरणा बँकेत केलेला नाही. कारखान्याने रु. ५४.५० लाख मुद्दलात रु. ९२.९५ लाख व्याजाच्या खाती जमा केलेले आहेत. उर्वरीत कर्जाची रक्कम साखर कारखान्याकडून येणे बाकी आहे.

सदर कर्जास कारखान्याने थकहमी दिलेली असल्याने सदर कर्ज कारखान्याच्या नावांवर बँकेने टाकलेले असून बँकेने सदर कर्जास पुर्नबांधणी व मुदतवाढ दिली आहे. कर्जाचा पहिला हप्ता डिसेंबर २००४ मध्ये भरावयाचा होता व शेवटचा हप्ता २००८ मध्ये भरावयाचा होता. मुद्दल व्यतिरिक्त व्याजाची रु. १५५.६२ लाख एवढी रक्कम कारखान्याने भरणा करावयाची आहे. तथापि, आजअखेर कारखान्याने एकही हप्ता भरलेला नाही. याप्रकरणी कारखान्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसलेचे कारखान्यांनी नमूद केले आहे.

उभारणीसाठी सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यान्वयनसाठी शासनाचे भाग भांडवल :—

२.२१. प्रकल्पाची किंमत भागविण्यासाठी (साखर कारखान्याच्या उभारणीसाठी त्यांनी वेळोवेळी निश्चित केलेल्या प्रमाणकाच्या आधारावर) (२५०० TDC साठी १९९६ पासून प्रमाणकानुसारी किंमत रु.३५ कोटी, जी १९९९ मध्ये रु.४० कोटीपर्यंत वाढवली जी आणखीन २००२ मध्ये जी ४८ कोटीपर्यंत वाढवली.) भाग भांडवल (सन १९९५ पर्यंत सहकारी साखर कारखान्याचे स्वतःचे अंशदान शासनाच्या अंशदानाचे गुणोत्तर १:४:३३ त्यानंतर १९९७ मध्ये १:३ त्यांत बदल करण्यात आला. विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील उदयास येणाऱ्या नवीन स.सा.का.साठी एक विशेष पॅकेज १९९७ मध्ये जाहीर करण्यात आले त्यात १:५ गुणोत्तर होते. महिला भागधारकाच्या मालकीच्या स.सा.कारखान्यांचे गुणोत्तर १:९ असे होते.)देऊन आणि त्यांनी उभारलेल्या कर्जास हमी देऊन शासन सहकारी साखर कारखान्यांना वित्त पुरवठा करीत असते. आधी दिलेल्या आर्थिक सहाय्याच्या त्यांच्या लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेल्या उपयोजन प्रमाणपत्राच्या आधारावर शासनाचे भाग भांडवल हप्त्यानी देण्यात येते. उभारण्याचा आणि कार्यान्वयनाचा खर्च प्रमाणकाच्या किंमतीपर्यंत मर्यादित ठेवून अतिरिक्त खर्च असल्यास, सहकारी साखर कारखान्यांनी करावयाचा असतो. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या मार्गदर्शकाप्रमाणे कार्यान्वयन नोंदणी केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांत पूर्ण करायचे असते. सहकारी साखर कारखान्यांनी त्रैमासिक प्रगती अहवाल आयुक्तांना प्राप्त होतात.

असे आढळले की :—

(I) आधीच्या हप्त्यांचा वापर करण्याआधी, शासनाने भाग भांडवलाचे नंतरचे हप्ते रु. ४०.३४ कोटी नऊ सहकारी साखर कारखान्यांना प्रदान केले. (बाणगंगा-उस्मानाबाद, भाऊसाहेब मिराजदार उस्मानाबाद, छत्रपती बीड, घृणेश्वर-औरंगाबाद कुरुमदास-सोलापूर, सागर-जालना, सह्याद्री-कोल्हापूर, शरद-औरंगाबाद आणि शिवशक्ती-उस्मानाबाद)

विहित योग्य तपासणी पद्धत न अनुसरल्याने अधिक भाग भांडवल सहकारी साखर कारखान्यांना देण्यांत आले.

(II) शासनाचे भाग भांडवल मंजूर करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांच्या प्रस्तावांची शिफारस करतांना त्यांच्या भाग धारकांकडून प्रत्यक्ष गोळा केलेल्या भाग भांडवलाची आयुक्तांनी खातरजमा करून घ्यायची असते. तरीही शासकीय भाग भांडवल अधीक दिल्याची उदाहरणे होती कारण प्रस्तावांना मंजुरीची शिफारस करण्याअगोदर आयुक्तांनी आवश्यक तपासणी खाली तपशिलात दर्शविल्याप्रमाणे केली नव्हती.

• शासनाच्या भाग भांडवल प्रस्तावांना मंजुरी करून घेताना घृष्णेश्वर आणि जामनेर साखर कारखान्यांनी प्रमाणानुसार स्वतःच्या हिश्याचे भाग भांडवल गोळा केल्याचे खोटे दावे सादर केले त्यामुळे १९९६ आणि २००३ कालावधी दरम्यान शासनाने रु. ७.७५ कोटीचे जास्त भाग भांडवल या सहकारी साखर कारखान्यांना दिले. भाग भांडवल मंजूर करण्याआधी तपास करण्यांत आला नव्हता कारण सहकारी साखर कारखान्यांचे मंजूर करण्याआधी तपास करण्यात आला नव्हता. कारणे सहकारी साखर कारखान्यांचे सांविधिक लेखापरीक्षणास दोन वर्षांचा विलंब झाला होता. (घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना औरंगाबाद चे २०००-०२ मध्ये जामनेर स.सा.का. जळगावमध्ये १९९९-२००० चे २००१-०२ मध्ये करण्यात आले.)

शासनाच्या २००० सालाच्या आदेशान्वये स्वतःचे भाग भांडवल गोळा केल्याच्या दाव्याची सांविधिक लेखापरिक्षकांकडून तपासणी अनिवार्य आहे. असे असतानाही आवश्यक तपासणी न करता सह्याद्री (सह्याद्री सहकारी साखर कारखान्याने जास्तीचा रु. ९.४८ कोटी पैकी ५.८६ कोटीचा भरणा केला.) सहकारी साखर कारखाना कोल्हापूरला २००१ मध्ये रु. ९.४८ कोटीचे जास्त भाग भांडवल देण्यात आले. पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली (ऑक्टोबर, २००३/एप्रिल, २००६) ती अद्यापही तपासणीत प्रलंबित होती (जानेवारी, २००८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८३ आणि ८८ अंतर्गत घृणेश्वर आणि सह्याद्री सहकारी साखर कारखान्याची सुरू केलेली चौकशी अद्यापही प्रलंबित होती. जामनेर सहकारी साखर कारखान्याबाबत व्यवस्थापनाविरुद्ध नुकसानीची निर्धारणा करण्यासाठी आयुक्तांनी कलम ८८ (१) अंतर्गत नोटीस जारी केली होती. राज्यमंत्री (सहकार) यांनी तो आदेश ऑक्टोंबर २००३ मध्ये रद्दबातल केला.

आवश्यक तपासणी न केल्यामुळे अंबादेवी सहकारी साखर कारखाना अमरावती आणि डी.वाय.पाटील सहकारी साखर कारखाना कोल्हापूर (२००५ पर्यंत) अनुक्रमे रु. ४.२१ कोटी आणि रु.३.३८ कोटीचे जास्त भाग भांडवल शासनाकडून देण्यात आले. दोन्ही प्रकरणात प्रादेशिक सह संचालकांकडून प्राप्त झालेल्या जानेवारी आणि फेब्रुवारी, २००७ च्या अहवालावरुन जास्तीचे प्रदान आयुक्तांच्या निदर्शनास आले.

आयुक्तांनी म्हटले (जानेवारी, २००८) की सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्या सदस्यांकडून गोळा केलेल्या भाग भांडवलाची सांविधिक लेखापरिक्षकांकडून पुष्टी करण्याचा आग्रह धरण्यास सुरूवात केलेली आहे. अमरावती सहकारी साखर कारखान्याबाबत जास्त भाग भांडवलाची वसूली जबाबदार व्यक्तिकडून करण्यात येईल. डी. वाय. पाटील सहकारी साखर कारखान्याने कळविले (डिसेंबर, २००७) की सदस्यांकडून रु. ११.३८ लाखाची वसूली करण्यात आली आणि शिल्लक लवकरात लवकर वसूल करण्यात येईल. भाग भांडवल देण्यापूर्वी शासनाचे हित जपण्यासाठी आयुक्तांकडून आवश्यक तपासणी करण्यात आली नव्हती हे तथ्य मात्र उरलेच.

(III) शासनाच्या वित्त व्यवस्थेच्या विहित आकृतिबंधाप्रमाणे (Patterns) सहकारी साखर कारखान्यांचा वाढीव खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त भाग भांडवल द्यायचे असते. तरीही २५०० TCD क्षमतेच्या प्रमाणाकानुसारच्या प्रकल्प खर्चात सहकारी साखर कारखान्यांना रु. ४० कोटीवरुन रु.४८ कोटी सुधारीत केलेल्या (जून २००२) आधारावर रु.२.७० कोटीचे अतिरिक्त भाग भांडवल मार्च २००४ आणि ऑगस्ट मध्ये वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, बीड ला अनियमितपणे मंजूर केले गेले. सहकारी साखर कारखाना उभारणीचा प्रत्यक्ष खर्च रु.४० कोटी होता आणि तेथे प्रकल्प खर्चात वाढ नव्हती.

शासनाने म्हटले (जानेवारी २००८) की शासनाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे अतिरिक्त भाग भांडवल देण्यात आले. उत्तर समर्थनीय भाग भांडवल देण्यात आले. उत्तर समर्थनीय नव्हते कारण वित्त व्यवस्थेच्या आकृतिबंध शासनाने ठरविल्याप्रमाणे सहकारी साखर कारखान्यास फक्त वाढीव प्रकल्प खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त भाग भांडवल द्यायचे असते.

ज्ञापन :———

२.२२. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना म. औरंगाबाद, जामनेर सहकारी साखर कारखाना म. जामनेर, जि जळगाव, सह्याद्री सहकारी साखर कारखाना धामोड,

जि. कोल्हापूर यांना त्यांनी गोळा केलेल्या भाग भांडवलाच्या प्रमाणात शासकीय भागभांडवल नव्हते. घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना व सह्याद्री सहकारी साखर कारखाना या कारखान्यांना शासकीय भांगभांडवल मंजूर करण्यात साखर आयुक्तालयाची चूक नाही कारण शासकीय भाग भांडवल कारखान्यांच्या जबाबदार व्यक्तींनी दिलेल्या माहितीच्या आधारावर देण्यात आले होते.

६ कारखान्यांनी दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे त्यांना दिलेल्या जास्तीच्या शासकीय भागभांडवलाच्या वसूलीसाठी त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम ८३ व ८८ खाली कारवाई सुरू करण्यात आली आहे.

उभारणीखालील नवीन सहकारी साखर कारखान्यांना भागभांडवलाच्या स्वरुपात अथसहाय्य देते. शासनाच्या धोरणानुसार पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यासाठी १:३ तथा मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी १:५ प्रमाणात भागभांडवल देण्यात येते. याअंतर्गत कारखान्याच्या हिश्याचे भागभांडवल जमा झाल्यानंतर त्याप्रमाणात शासकीय भागभांडवल देण्यात येते. निधी उभारणीचा आकृतीबंधानुसार ६.६७% स्वभांडवल, ३३.३३% राज्यशासनाचे भागभांडवल व ६०% निधी इतर वित्तीय संस्थांकडून कर्जरुपाने उभारण्यात येतो. कारखान्यास देय भागभांडवलाची रक्कम एकरकमी देणे अपेक्षित आहे कारण इतर वित्तीय संस्था कारखान्याने जमा करावयाच्या स्वभांडवलाची रक्कम तसेच शासकीय भागभांडवलाची रक्कम पुर्णपणे जमा झाल्यानंतर कर्ज मंजूर करण्याची प्रक्रिया पूर्ण करतात. कारखान्यास प्राप्त भागभांडवलाचा विनियोग प्रमाणपत्र संबंधित लेखापरीक्षण कागदपत्राची पहाणी करून सादर करण्यात येते. त्यानुसार बाणगंगा, भाऊसाहेब बिराजदार, छत्रपती कुर्मदास, शरद या कारखान्यांनी विनियोग प्रमाणपत्र सादर केले आहेत.

उभारणी खालील सह्याद्री, घृणेश्वर इ. सहकारी साखर कारखान्यांनी आवश्यक ते सभासद भाग भांडवल जमा न करता नियमानुसार देय शासकीय भागभांडवलापेक्षा जास्त शासकीय भाग भांडवल प्राप्त करून घेतले आहे. कारखान्याच्या नियमित लेखापरीक्षणास दोन वर्षांचा विलंब झाल्याने सदर बाब उशिराने निदर्शनास आली. तथापि, लेखापरीक्षणादरम्यान उघडकीस आल्यानुसार सह्याद्री साखर कारखान्याची सहकार कायद्यातील कलम ८८ अन्वये चौकशी करण्यात आली. सदर चौकशी दरम्यान जबाबदारी निश्चित केलेल्या व्यक्तिकडून ज्यादा दिलेल्या भागभांडवलाची रक्कम वसूलीसाठी प्रादेशिक सहसंचालक साखर यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (साखर), कोल्हापूर यांनी कारखान्याच्या अध्यक्ष यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २६/२००६ नोंद केला असून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी यांच्या कोर्टात दावा चालू आहे.

तसेच घृणेश्वर कारखान्यास शासनाच्या धोरणाप्रमाणे कारखान्याने जमा केलेल्या स्वभागभांडवलाच्या प्रमाणात ९४५.५० लाख शासकीय भागभांडवल मिळण्यास पात्र असताना कारखान्याने वसूल भागभांडवलात भाग अनामत रक्कम दर्शवून रु. १३३३.०० लाख शासकीय भागभांडवल प्राप्त करून घेतले आहे. सदर बाब लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आल्यानंतर भादवि कलम ४०९,४२०,४६०,४७१ अन्वये दिनांक ०६ ऑक्टोबर २००३ रोजी गुन्हा क्र. १३०/०३० पोलीस स्टेशन खुलताबाद जिल्हा औरंगाबाद येथे दाखल करण्यात आला असून मा. मुख्य न्यायदंडाधिकारी औरंगाबाद यांचे कोर्टात आर.आर.सी नंबर १९१/२००७ न्यायप्रविष्ट आहे.

डी. वाय. पाटील सहकारी साखर कारखाना वाढीव प्रकल्पाच्या प्रमाणात रु. १४४०.०० लाख शासकीय भागभांडवल मिळणेस पात्र होता. त्यानुसार रु. ४८० लाख सभासद भागभांडवल जमा करणे अपेक्षित होते. सिंधुदुर्ग जिल्हा बँकेने एप्रिल १९९६ मध्ये व नोव्हेंबर २००० मध्ये कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील २१८१ ऊस उत्पादकांना सभासद होण्यासाठी रु. १२७.३३ लाख कर्ज मंजूर केले होते त्यानुसार ३१ मार्च २००७ अखेर कारखान्याचे वसूल भागभांडवल रु. ४९०.३१ होते व ३१ मार्च २०१० अखेर वसूल भागभांडवल रु. ६५८.२८ लाख एवढे आहे.

त्याचप्रमाणे वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या प्रकल्प किंमतीमध्ये रु. ४०.०० कोटी वरुन रु. ४८.०० कोटी वाढ झाली होती. सदर बाब विचारात घेऊन कारखाना उभारणीसाठी लागलेल्या अतिरिक्त खर्चाच्या प्रमाणात शासकीय भाग भांडवल शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आले होते.

अपूर्ण सहकारी साखर कारखाने :— रु.९२.५६ कोटीचा शासनाचा निधि या १२ अपूर्ण सहकारी साखर कारखान्यात अडकला.

२.२३. नोंदणी केलेल्या तारखेपासून तीन वर्षात नवीन सहकारी साखर कारखान्यांनी त्यांची उभारणी पूर्ण करायची असते. तरीही १९९२ ते २००२ कालावधीत नोंदणी झालेल्या १२ (बाणगंगा-उस्मानाबाद, भाऊसाहेब बिराजदार-उस्मानाबाद, छत्रपती-बीड, घृणेश्वर-औरंगाबाद, जामनेर-जळगांव, कुरमादास-सोलापूर, सागर-जालना, सह्याद्रि-कोल्हापूर, शरद-औरंगाबाद, शेतकरी-सांगली, शिवशक्ती -उस्मानाबाद, आणि टोकाई-हिंगोली) सहकारी साखर कारखान्यांनी त्यांची उभारणी आणि कार्यान्वयन डिसेंबर २००७ अखेर पूर्ण केली नव्हती. या सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीतील विलंब तीन ते १२ वर्षांचा होता.

परिशिष्ट **४** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ज्यांच्या उभारणीस बेसुमार विलंब झाला होता अशा सहकारी साखर कारखान्यांत मार्च २००७ अखेर त्यात रु.९२.५६ कोटीचा शासन निधी अडकून पडला होता. या शिवाय २५०० TCD क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्यासाठी रु.३५ कोटीवरुन रु.४८ कोटी आणि १२५० TCD क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्यासाठी रु.२८ कोटीवरुन रु.३५ कोटी प्रमाणकानुसारी (Normative) प्रकल्प किंमत शासनाने जून २००२ पासून वाढविल्याने किंमत वाढीची शक्यता नाकारता येणार नाही.

शासनाने म्हटले (जानेवारी २००८) की यंत्रसामुग्रीच्या किंमतीत वाढ हे मुख्य कारण या साखर कारखान्यांच्या उभारणीच्या विलंबास झाले. काही सहकारी साखर कारखान्यांबाबत निविदा स्वीकृती आणि इतर सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत निविदा स्वीकृती प्रक्रिया प्रगतीपथावर होत्या. तरीही ज्या सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीस गैरवाजवी विलंब झाला त्यांत शासनाचा निधि अडकून पडला ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञापन :—

२.२४. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

एकूण १२ सहकारी साखर कारखाने उभारणीखाली आहेत. पैकी सागर सहकारी साखर कारखाना म. जालना या कारखान्याची उभारणी पूर्ण झाली आहे. ९ कारखान्यांच्या उभारणीचे काम प्रगती पथावर आहे. जामनेर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचे कामकाजाची प्रगती अद्याप दिसून येत नाही. सह्याद्री धामोड सहकारी साखर कारखान्याची उभारणीची बाब न्यायप्रविष्ट आहे. उभारणीखालील कारखान्यांना वेळेवर निधीची उपलब्धता होऊ न शकल्यामुळे उभारणीचे काम अपूर्ण आहे. निधीची उपलब्धता नसणे ही कारखान्यांच्या आवाक्याबाहेरीची बाब आहे. या बाबीमुळे कारखान्यांची उभारणी विनाकरण लांबली आहे असे म्हणता येणार नाही.

१२ कारखान्यांच्या उभारणीबाबतची सद्यःस्थिती कारखानानिहाय खालीलप्रमाणे आहे :—

१. जामनेर सहकारी साखर कारखान्यास रु. ९८९.३९ लाख शासकीय भागभांडवल उपलब्ध झाले आहे. तथापि कारखाना उभारणीमध्ये प्रगती झाली नाही.

२. बाणगंगा व भाऊसाहेब बिराजदार ससाका-९५% उभारणीचे काम पूर्ण झाले असून २०१२-२०१३ गळीत हंगाम घेण्यात येणार आहे.

३. भाऊसाहेब बिराजदार ससाका-९५% उभारणीचे काम पूर्ण झाले असून २०१२-२०१३ गळीत हंगाम घेण्यात येणार आहे.

४. घृणेश्वर ससाका -८० ते ९०% उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. तथापि निधीची कमतरता असल्यामुळे उर्वरित काम पूर्ण होवू शकले नाही. सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी SRFAESO Act, २००२ मधील सेक्शन १३(२) नुसार दिनांक २९.०२.२०१२ अन्वये त्यांचे व्याजासह थकीत कर्ज ९७२.३२ लाख वसूल करण्यासाठी कारखान्यास नोटीस बजावली आहे.

५. कुर्मादास ससाका, सोलापूर उभारणी पूर्ण झाली असून २०१० व २०११ पासून गाळपाखाली आहे.

६. सागर ससाका-जालना २००९-१० पासून गाळपाखाली आहे.

७. शरद ससाका २०११-२०१२ पासून गाळपाखाली आहे.

८. सह्याद्री ससाका-उभारणी कामात काही प्रगती नाही.

९. शेतकरी सांगली - पाईप लाईन मधून वगळण्यात आला.

१०. शिवशक्ती उस्मानाबाद - मार्च, २०१२ अखेर १०% उभारणीचे काम पूर्ण.

११. टोकाई ससाका हिंगोली ८० ते ९०% उभारणीचे काम पूर्ण.

१२. शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली-निधी अभावी सदर कारखान्याची उभारणी होऊ शकली नाही.

सहकारी साखर कारखान्यानी साखर विक्रीसाठी अनुसरलेली अनियमित पद्धती :——

२.२५. सांविधिक लेखापरिक्षकांच्या अहवालात साखर विक्री कमी दराने केल्याने रु.२२ लाखाचा तोटा झाल्याचे उघडकीस आले होते तरी जबाबदारी निश्चित करण्याची / वसुलीची आयुक्तांनी कारवाई केली नव्हती.

सांविधिक लेखापरीक्षकांच्या अहवालात (२००३ -०४) निर्दशित करण्यात आले की नाशिक सहकारी साखर कारखाना नाशिक ने निविदांची विहित पद्धती न अनुसरता कमी दराने साखर विक्री केल्याने विक्री केलेल्या साखरेवर तोटा (रु. २२ लाख) झाला. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये आयुक्तांनी चौकशीचे आदेश जारी केले (फेब्रुवारी २००४) आणि प्रादेशिक सह संचालक अहमदनगर यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली. चौकशी अधिकाऱ्यांनी सहकारी साखर कारखान्याला झालेल्या तोट्यास जानेवारी, २००७ मध्ये पुष्टी दिली. जबाबदारी निश्चित करण्यासाठी आणि वसूलीसाठी आयुक्तांनी कारवाई केली नाही. आयुक्तांनी म्हटले (जानेवारी २००८) की अहवाल छाननीखाली होता. एक वर्षांहून अधिक काळ अहवाल छाननीखाली असल्याने आयुक्तांच्या कारवाईस अवाजवी उशीर झाला.

आणखीन, लेव्ही साखरेच्या किंमतीपेक्षा कमी दराने साखर विकू नये असे आयुक्तांचे निर्देश असतानाही सांविधिक लेखापरीक्षकांच्या २००३-०४ च्या अहवालाने निर्दशित केले की, निफाड सहकारी साखर कारखान्याने १८.१२ लाख कि.ग्रा. साखर त्यांच्या सदस्यांना लेव्ही साखरेच्या रु. ११.५१ दराऐवजी रु ६ प्रति कि.ग्रा दराने आणि सदस्य नसलेल्यांना ५.१६ लाख कि.ग्रा साखर प्रति कि.ग्रा रु.९ दराने साखर विकली. यामुळे त्यांना रु. १.१३ कोटींचा तोटा झाला.

लेखापरीक्षकांच्या अभिक्षणास (observation) डालवून पुन्हा २००४-०५ मध्ये सवलतीच्या दराने साखर विकली आणि रु .१.२५ कोटीचा तोटा ओढवून घेतला. सहकारी साखर कारखान्याने २००५-०६ सालातील विकलेल्या साखरेची तपशीलवार विवरणपत्रे तयार केली नव्हती.

वरील उदाहरणे दर्शवितात की सांविधिक लेखापरीक्षण अहवालात अभिक्षण केल्यावर आयुक्तांनी ना तत्परतेने कारवाई केली ना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७८ प्रमाणे कारवाई केली.

ज्ञापन :—

२.२६. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नाशिक सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाने चूकीची निविदा पद्धती वापरुन कमी किंमतीत साखरेची विक्री केली. सदर बाब विशेष लेखा परिक्षकाने त्यांच्या सन २००३ -०४ च्या लेखा परिक्षण अहवालाद्वारे निदर्शनास आणून दिली. या अहवालाच्या आधारे संबंधित कारखान्याविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कमल ८३ अंतर्गत चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालाची छाननी सुरू आहे.

प्रशासन कार्यासन

नाशिक सहकारी साखर कारखाना नाशिक कलम ८८ च्या चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित सहकारी साखर कारखान्यांच्या जबाबदार व्यक्तींकडून खुलासे मागविण्यात आलेले आहेत. सहकारी साखर कारखान्याने लेव्ही दरापेक्षा कमी दराने सभासद व बिगर सभासदांना साखर विक्री केल्यामुळे झालेल्या रु. १.२५ कोटी तोट्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.

बफर साठ्याच्या अर्थसहाय्याचा विनियोग :——

२.२७. ऊस उत्पादकांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी १७ डिसेंबर,२००३ पर्यंत एका वर्षांसाठी साखर कारखान्यांकडे बफर साठा केंद्र सरकारने तयार केला व तो १७ डिसेंबर,२००४ पर्यंत वाढविला ऊस विकास नियमावली १९८३ अंतर्गत बफर साठ्यात समाविष्ट साठयावरील व्याज, साठवण आणि विमा आकाराची प्रतिपूर्ती हफ्त्याने करायची होती. अर्थ सहाय्याच्या रकमांचा विनियोग उसाच्या थकित किंमतीच्या प्रदान केल्याचे उपयोजन प्रमाणपत्र गिरण्यांनी केंद्र सरकारला सादर केल्यानंतर पुढचे हप्ते द्यायचे होते.

२००३-०६ कालावधीत, १३६ सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारने रु.१८३.५४ कोटीचे बफर साठा अर्थ सहाय्य दिले. रु. ५.८४ कोटीचे बफर साठा अर्थ सहाय्य दिलेल्या १४ (दौलत- कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर- उस्मानाबाद,डॉ.व्ही.व्ही.पाटील-नगर, कृष्णा सातारा,निफाड- नाशिक, निराभिमा पुणे, पांडूरंग-सोलापूर, राजाराम बापू- सांगली, समर्थ- जालना,संत तुकाराम-पुणे, तासगांव- सांगली, वैद्यनाथ-बीड, वसंतदादा- सांगली, आणि वसंत-यवतमाळ) सहकारी साखर कारखान्यांची चाचणी तपासणी करण्यात आली. त्यापैकी सहा (डॉ. बाबासाहेब आंबेडकर-उस्मानाबाद, डॉ. व्ही. व्ही. पाटील-नगर, कृष्णा-सातारा, निराभीमा-पुणे, समर्थ-जालना, तासगाव-सांगली) सहकारी साखर कारखान्यांनी रु. १.६३ कोटीची उपयोजन प्रमाणपत्रे डिसेंबर २००७ अखेर केंद्र सरकारला सादर केली नव्हती. त्यामुळे पुढील हफ्ते देण्यांत आले नाहीत आणि या सहकारी साखर कारखान्यांच्या मार्च २००६ अखेरच्या ताळेबंद पत्रकाप्रमाणे रु ९३.२३ कोटीची ऊस थकबाकी प्रलंबित होती.

ज्ञापन :——

२.२८. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

बफर स्टॉकच्या अनुदानाचा वापर साखरेच्या जलद विल्हेवाटीसाठी बफर स्टॉकच्या नमूद कालावधीनंतरचे क्लेमदेखील शासनाने स्विकारले.

गाळप हंगाम २००६-२००७ मध्ये एस.एम.पी. प्रमाणे खालील कारखान्यांनी ऊस दर देयबाकीची रक्कम अदा केल्याचे दिसून येते. सद्यःस्थितीत पुढील कारखान्यांकडे ऊस दराची देय बाकी नाही.

१. कृष्णा-सातारा

२. दौलत-कोल्हापूर

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर- उस्मानाबाद

४. निराभिमा- पुणे

५. निफाड - नाशिक

६. पांडूरंग- सोलापूर

७. रा.बा.पाटील- सांगली

८. समर्थ- जालना

९. संत तुकाराम - पुणे

१०. तासगांव- सांगली

११. वैद्यनाथ- बीड

१२. वसंतदादा- सांगली

१३. वसंत- यवतमाळ

१४. व्ही.व्ही. पाटील- अहमदनगर

सिंचन आणि पाणी पुरवठा योजना.—सिंचन योजना सहकारी साखर कारखान्याच्या मालकीच्या होत्या आणि चालवित असलेल्यांचा मार्च, २००६ अखेरचा संचयी तोटा रु. २८.७५ कोटी होता.

२.२९. साखर उत्पादनांत पाणी ही मुख्य निविष्ट (input) असते. म्हणून सहकारी साखर कारखान्यानी त्यांच्या कार्य क्षेत्रांतील ऊस उत्पादन वाढावे म्हणून सिचंनाच्या योजना हाती घेतल्या.साखर कारखान्यांनाही कारखाना चालविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. दोन चांचणी तपासणी केलेल्या कारखान्यांची सिंचन आणि पाणी पुरवठा योजनेत केलेली गुंतवणुक, खाली चर्चा केल्याप्रमाणे अविवेकी (injudicious) सिद्ध झाली.

● त्यांच्या कार्यक्षेत्रांत ऊसाच्या उत्पादन वाढीसाठी २५ वसंत बंधारे (साठवण टाक्या) आणि २५ उपसा सिंचन योजनेत वसंतदादा सहकारी साखर कारखान्याने रु. ३२.१७ कोटी गुंतविले (१९९०-९५) या त्यांनी सदस्यांच्या ताब्यात (१९७२-९०) घेतलेल्या ११ सिंचन योजनांच्या अतिरिक्त होत्या. या योजना चालविण्यासाठी वार्षिक खर्च रु. ५ कोटी होता आणि पाणी आकाराचा महसूल रु.२ कोटी होता. मार्च २००६ अखेर पाणी आकाराची प्रलंबित रक्कम रु. ८.७८ कोटी इतकी होती आणि संचयी तोटा रु. २८.७५ कोटी होता. शासनाने म्हटले (जानेवारी, २००८) की सहकारी साखर कारखान्याने लाभधारक सदस्यांकडून प्रलंबित देणी वसूल करणार असे वचन दिले तरीही गुंतवणूक विवेकी नव्हती आणि सहकारी साखर कारखान्यांना वित्त व्यवस्थेवर वहन होते हे सिद्ध झाले ही वस्तुस्थिती आहे.

● शिवशक्ती आदिवासी आणि मागासवर्गीय सहकारी साखर कारखाना, बुलढाणा ते पाईप हाऊस, जॅक विहिर पंम्पस, भुमिगत पाण्याचा जलाशय उपरी टाकी आणि १५ कि.मी. पाईप टाकून पूर्णा नदीतून पाणी उपसा करण्यासाठी पाण्याची सर्विस टाकी यांचा समावेश असलेल्या रु. १.२२ कोटी अंदाजित किंमत असलेल्या पाणी पुरवठा योजनेत गुंतवणूक केली (१९९६-२०००) सहकारी साखर कारखान्यांकडून १९९६-२००२ कालावधीत रु. ६१ लाख खर्च करण्यात आले. तरीही ही योजना पूर्ण करण्यात आली नव्हती. अद्यापी वापरात आणली नव्हती (जानेवारी, २००८) त्यामुळे गुंतवणूक वायफळ ठरली. मार्च, २००२ मध्ये कार्यान्वित झालेला सहकारी साखर कारखाना फक्त दोन दिवस कार्यरत होता. शासनाने म्हटले (जानेवारी, २००८) की बुलढाणा नागरी पतसंस्थेस सहकारी साखर कारखाना २००९-१० कालावधीपर्यंत पाच वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यात आला आणि अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत त्यांच्या मत्तांची विल्हेवाट लावण्यात येईल. उत्तर स्वीकार्य नाही कारण पाणी पुरवठा योजना अपूर्ण होती आणि पूर्ण करावयास हवी होती. आणि सहकारी साखर कारखान्याने वापरावयास हवी होती.

ज्ञापन :

२.३०. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वसंतदादा सहकारी साखर कारखान्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन वाढीसाठी ५१ वसंत बंधाऱ्यांमध्ये रु.१.७४ कोटी गुंतविले नसून रु. १.५१ कोटी गुंतविले आहेत. ४५ पाणी पुरवठा योजनेत रु. ३०.४३ कोटी गुंतविले. हे खरे नाही कारखान्यांने त्यांच्या कार्यक्षेत्रात ऊसाच्या उत्पादन वाढीसाठी ५१ वसंत बंधाऱ्यांमध्ये फक्त रु.३.६४ कोटी गुंतविले आहेत. सदस्यांच्या ११ सिंचन योजना देखील २२,००० एकर ऊसाच्या कार्यक्षेत्रात वाढ होईल असा अंदाज होता. पहिल्या ३ वर्षांमध्ये ऊसाचे उपेक्षित उत्पन्न मिळाले. तथापि, तद्‌नंतर दुष्काळी परिस्थितीमुळे आणि क्षारयुक्त जमिनीमुळे कारखान्याच्या ऊस लागवड क्षेत्रावर बंधन आले.

या कारणांमुळे जी कारखान्याच्या नियंत्रण बाहेर आहेत, कारखाना अपेक्षित ध्येय गाठू शकला नाही या उपसा सिंचन योजनेत सदर निधी गुंतवताना पुरेसा ऊस उपलब्ध करणे हा मुख्य उद्देश होता. तथापि, पुरेशा ऊस पुरवठ्यास विजेच्या अनियमित पुरवठ्याचा अडसर आला. वसंत बंधाऱ्याच्या बांधकामाचा दुसरा उद्देश सामाजिक होता त्यामुळे, गावांना पिण्याचे पाणी मिळते. कारखान्याने महाराष्ट्र शासनाकडून २५ सिंचन योजना विकत घेतल्या आहेत. या योजना विकत घेतल्यानंतर कारखान्याने स्वतःचा निधी सदर योजना नियमित चालविण्यासाठी गुंतविला आहे.

सध्या कारखान्याकडे जवळ-जवळ ५१ उपसा सिंचन योजना आहेत. ६५००० एकर सिंचन कार्यक्षेत्र आहे. सदर योजना राबविण्यासाठी व देखभालीसाठी २९५ कामगार नियुक्त करणे आवश्यक आहे. तथापि, कामगार कमी करण्यासाठी कारखाना प्रयत्न करत आहे असे कारखान्याने कळविले आहे.

जेव्हा तेथे पुरेसा पाऊस होईल आणि सदस्य कारखान्यास ऊस पुरवठा करतील तेव्हाच कारखाना त्यांच्या ऊस बिलातून पाणीपट्टी आकारणी कपात करतील. कारखान्याने लाभधारक शेतकऱ्यांकडून प्रलंबित देणी वसूल करणार असल्याचे कळविले आहे.

वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि.जिल्हा सांगली या कारखान्याने सिंचन योजनांवर मार्च २००६ अखेर केलेल्या खर्चामुळे रु. २८.७५ कोटी तोटा झाला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

(१) कारखान्याने महाराष्ट्र शासनाच्या २५ योजना १९८५ साली विकत घेतल्या, सदर योजना तोट्यात होत्या परंतु या योजना बंद झाल्या असत्या तर कारखाना कार्यक्षेत्रात ऊसाची मोठ्या प्रमाणात लागवड होऊन ऊस गाळपासाठी उपलब्ध झाला नसता. तसेच कारखाना बंद ठेवावा लागला असता. त्यामुळे कारखान्यास मोठ्या प्रमाणावर तोटा झाला असता, कारखान्याने सदर योजना चालु ठेवण्यासाठी आणि ऊस पिकाला नियमित पाणी पुरवठा उपलब्ध होण्यासाठी निधीची गुंतवणूक केली.

(२) कारखान्याने पुरस्कृत केलेल्या ४५ योजना आहेत आणि त्यांची मालकी ही सभासद शेतकऱ्यांची आहे. त्यासाठी कारखान्याने गुंतवणूक केली आहे.

(३) ११ योजना ह्या सहकारी उपसा सिंचन योजना असून त्या सहकारी संस्थांद्वारे चालविल्या जातात. कारखान्याने केलेल्या गुंतवणुकीवर व्याज आकारणी केलेली आहे, त्या व्याजाच्या रकमामुळे संस्था नफ्यामध्ये येवू शकत नाहीत. त्यामध्ये रक्कम रुपये ८.७४ कोटी थकीत आहे. सदर रकमा व्याजाच्या आहेत. कारखाना पाणीपट्टी नियमितपणे वसूल करतो.

(४) राज्य शासनाकडून विकत घेतलेल्या २५ योजनांची १९८५ मधील किंमत रु. ६.५० कोटी आहे. कारखान्याने सन २०१०-२०११ मध्ये रु. ७१.४९ लाख पाणीपट्टी वसूल केली आहे. कारखान्याने ऊस विकास कार्यक्रम अंतर्गत वरील सर्व योजनांमध्ये गुंतवणुक केली आहे. त्यामुळे कारखान्यासाठी ऊस उपलब्धतेमध्ये ५.०० लाख मे.टन वाढ झाली आहे.

(५) कारखान्याचे वरील उपसा जलसिंचन योजनांमुळे ६५००० एकर ऊसाचे क्षेत्र नव्याने विकसीत झाले आहे. त्यासाठी २९५ कर्मचारी नियुक्त केले आहेत. कारखान्याची संपूर्ण गुंतवणूक सुरक्षित असून त्याचे अंदाजे मूल्यांकन रु. १००.०० कोटी आहे.

(६) कारखान्यास अपुऱ्या पर्जन्यमानामुळे गाळप हंगाम २००३-०४, २००४-०५ व २००८-०९ मध्ये कमी ऊस गाळपासाठी उपलब्ध झाला. त्यावेळी कारखान्याने राबविलेल्या उपसा जलसिंचन योजनांमुळे कारखाना गाळप हंगाम घेऊ शकला. ऊस उपलब्ध झाला. त्यामुळे वरील योजनांमधील केलेली गुंतवणुक कारखान्याच्या फायद्याची आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०११ रोजीच्या आदेशाप्रमाणे ज्या उपसा सिंचन योजनांमध्ये साखर कारखान्याने गुंतवणूक केलेली आहे. त्या कारखान्याच्या जलसिंचन योजनांच्या सभासदांनी साखर कारखान्यास ऊस पुरविल्यास जी पाणीपट्टी आकारली जाते त्याच्या दिडपट पाणीपट्टी ऊस न पुरविणाऱ्या सभासदांकडून आकारली जाते. त्यामुळे पाणीपट्टीच्या वसूलीत लक्षणीय वाढ होणार असून थकबाकीची रक्कम कमी होणार आहे.

शिवशक्ती आदिवासी मागासवर्गीय सहकारी साखर कारखाना लिमिटेड जिल्हा बुलढाणा हा कारखाना सेक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई या बँकेने ताब्यात घेतला आहे.

आवश्यक प्रदूषण नियंत्रणाच्या उपायाचे अनुपालन :—

२.३१. पर्यावरणीय संरक्षणाच्या नियमाच्या जबाबदाऱ्या या सनदीच्या आवश्यकतांचे सहकारी साखर कारखान्यांच्या अनुपालनाचे नियंत्रण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करीत असते. मार्च, २००३ मध्ये सह्या केलेली ही सनद, मळीवर आधारीत आसवन्यांची पर्यावरणीय मानके आणि प्रदूषकांचे विसर्जन वातावरणात शून्यावर आणण्यासाठी डिसेंबर, २००५ पर्यंत आणि त्यानंतर डिसेंबर, २००७ पर्यंत वाढविलेल्या मुदतीत कालबद्ध कार्यवाहीने साध्य करण्यासंबंधी आहे. सनदीच्या तपशीलवार आवश्यकता परिशिष्ट **५** मध्ये दिलेल्या आहेत.

• प्रत्येकात आसवनी असलेल्या सात (डॉ.व्ही.व्ही. पाटील-नगर, जय भवानी-बीड, निफाड-नाशिक, राजाराम बापू-सांगली, समर्थ-जालना, श्रीराम-सातारा, सिद्धेश्वर-सोलापूर, वैद्यनाथ-बीड) सहकारी साखर कारखाने असावन्या निसृत/विसर्जीत करीत असलेले स्पेन्ट वॉश अभेद्य सपाटीवर करावयाचे असताना थेट जमिनीवर सोडून कंपोस्ट करीत होते.

• आसवन्या घटक असलेल्या पाच (डॉ.व्ही.व्ही. पाटील-नगर, श्रीराम-सातारा, निफाड-नाशिक, राजाराम बापू-सांगली, सिद्धेश्वर-सोलापूर) कार्यरत सहकारी साखर कारखाने आवश्यक प्रेसमडच्या अनुपलब्धतेमुळे निर्माण झालेल्या संपूर्ण स्पेन्ट वॉशचे कंपोस्ट रुपांतरण करू शकले नाहीत. वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगलीने कंपोस्टींगच्या सुविधांची तरतूद जानेवारी, २००८ पर्यंत केली नव्हती.

• लगूनमध्ये अनलाईन्ड स्पेन्ट वॉश साठा केल्यामुळे त्यांच्या झिरपण्याने भूजलाच्या प्रदूषणाचे संनियंत्रण करण्यासाठी नऊ (दौलत-कोल्हापूर, डॉ.व्ही.व्ही. पाटील-नगर, श्रीराम-सातारा, निफाड-नाशिक, जय भवानी- बीड, सिद्धेश्वर-सोलापूर, राजाराम बापू-सांगली, वैद्यनाथ-बीड, वसंतनगर-सांगली) सहकारी साखर कारखान्यांनी तपासणी विहिरींची तरतूद केली नव्हती. डॉ.व्ही.व्ही. पाटील सहकारी साखर कारखाना अहमदनगरच्या अनलाईड लगूनमध्ये स्पेन्ट वॉशच्या साठ्यामुळे भूजलाच्या प्रदूषणाची जुलै, २००६ मध्ये नोंद घेण्यात आली. सहकारी साखर कारखान्याने अभेद्य लगून २००७ मध्ये बांधले.

• प्रदूषण नियंत्रण मानकांचे अनुपालन न केल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आसवन्या बंद करण्यासाठी नोटीसा जारी केल्या (जानेवारी ते मार्च २००७) CREP च्या अटींचे अनुपालन डिसेंबर, २००७ पर्यंत करण्याची विनिर्दिष्टित आश्वासने दिल्याने अनुपालनाच्या स्वरूपाप्रमाणे रु. ५०, ००० ते ५ लाख दरम्यानच्या बँक गॅरंटी होऊन सहकारी साखर कारखान्यांना आसवन्या कार्यरत राहण्यास मुभा दिली (मार्च २००७).

• अशाप्रकारे CREP अटींची पूर्तता सहकारी साखर कारखान्यांनी आजतागायत केली नाही ज्यामुळे जलस्त्रोत आणि जमिनीचे प्रदूषण वाढतच आहे.

• ज्या सहकारी साखर कारखान्यांची मत्ता नक्त किंमत नकारार्थी आहे त्यांनी वित्त व्यवस्थेच्या अडचणी तपासून CREP मानकांचे अनुसरण करण्यासाठी त्या सहकारी साखर कारखान्यांना मत्ता खर्च करण्यासाठी शासनाने विशेष परवानगी दिली असे प्रतिपादन आयुक्तांनी केले (जानेवारी २००८). त्याप्रमाणे प्रशासकीय आणि सशर्त वित्तिय मंजूरी ४२ सहकारी साखर कारखान्यांना देण्यात आली. रि-बॉयलरची उभारणी आणि बाष्प पद्धतीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसंतदादा साखर संस्था, MITCON आणि आयुक्तांच्या समितीने सहकारी साखर कारखान्यांना उपाय सुचविले. जानेवारी २००८ अखेर कोणत्याही सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारीत केलेल्या अंतिम मुदतीचे अनुपालन केले नव्हते.

ज्ञापन :——

२.३२. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

MDCD व CPCB यांनी निश्चित केलेल्या CREP च्या नियमांचे तंतोतंत पालन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ३१ डिसेंबर ही तारीख सर्व कारखान्यांना दिली होती. उणे नक्त मूल्य असलेल्या सहकारी साखर कारखान्यांनी CREP च्या निकषांचे तंतोतंत पालन करण्यासाठी शासनाने खास सवलत दिनांक १६ ऑक्टोबर २००७ रोजी दिली होती.

वरील कार्यवाहीसाठी साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून सदर समितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व मिटकॉन यांचा समिती-सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. CREP च्या मानकांनुसार करून कारखान्यांच्या आसवणी प्रकल्पांच्या प्रस्तावांची छाननी करून समितीने कारखान्याच्या आसवनी प्रकल्पांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता काही अटीस अधीन राहून दिली आहे.

आसवनीमधून तयार होणाऱ्या स्पेंटवॉशचे प्रमाण कमी होण्यासाठी प्रेसमडमध्ये मिसळून कंपोस्ट करण्यासाठी बाष्पीभवन पद्धत सहकारी साखर कारखान्यांमध्ये अवलंबिली जाते.

साखर कारखान्याकडील मळीवर आधारित आसवनी प्रकल्पांसाठी CPCB व MPCB यांनी निश्चित केलेल्या मानकांची व CREP NORM च्या निकषांप्रमाणे आसवनी प्रकल्पाची शून्य पातळी राखण्याच्या दृष्टीने साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एमपीसीबी, व्हीएसआय व मिटकॉन यांचे प्रतिनिधीची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने मंजूर केलेल्या खर्चाच्या निकषाप्रमाणे CREP च्या मानांकनानुसार कारखान्याच्या आसवनी प्रकल्पाच्या प्रस्तावाची छाननी करून आसवनी प्रकल्पांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता काही अटीस राहून दिली आहे. याअंतर्गत रिबॉयलर्स व बाष्पीभवन प्रणाली इत्यादीचा अवलंब करून स्पेंट वॉश चे प्रमाण कमी करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे कंपोस्ट यार्डचे कॉंक्रीटीकरण करणे अपेक्षित होते. त्यानुसार गाळप हंगाम २००७-२००८ नंतर प्रदूषण कमी करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची कारखानानिहाय माहिती खालीलप्रमाणे :——

१. विठ्ठलराव विखे पाटील कारखाना लि. कारखान्याने २००७-०८ मध्ये स्पेंट वॉश साठवणूकीसाठी Leakprof concreting केलेले १ महिना साठवणूक क्षमतेचे पक्के लगून तयार केलेले आहे. तसेच कंपोस्टिंगसाठी २.५ एकराचे कॉंक्रीटीकरण केलेले कंपोस्ट यार्ड तयार केले आहे. त्याचप्रमाणे स्पेंट वॉश पासून होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी Evaporator बसविण्याचा विचार आहे.

२. जयभवानी सहकारी साखर कारखाना लि., बीड-कारखान्याने २००९ साली १.८८ लाख खर्च करून एक महिन्याची स्पेंट वॉश साठवणूक क्षमता असलेले पक्के लगून तयार केले आहे. तसेच ६ एकर कॉंक्रीटीकरण केलेले कंपोस्ट यार्ड तयार केले आहे.

३. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लि., सांगली :— कारखान्याकडे एक महिना कालावधीच्या स्पेंट वॉश साठवणूकीसाठी आवश्यक ६ कच्चे व १ पक्के (लगून) साठवणूक टँक आहेत. तसेच कारखान्याने २०१०-११ मध्ये १३ एकर कंपोस्ट यार्ड तयार केले असून सर्व यार्डचे काँक्रीटीकरण झालेले आहे.

४. समर्थ सहकारी साखर कारखाना लि., जालना :— कारखान्याकडे १९९५-९६ साली ९० दिवसांकरिता साठवणूक करता येतील असे २ पक्के लगून आहेत. तसेच कारखान्याने सन २००९-१० मध्ये १० एकर काँक्रीटीकरण केलेले कंपोस्ट यार्ड तयार केले आहे.

५. श्रीराम सहकारी साखर कारखाना लि., फलटण :— कारखान्याने २००७-०८ मध्ये लिकप्रुफ काँक्रीटीकरण केलेले पक्के लगून तयार केले आहेत. तसेच काँक्रीटीकरण केलेले ८ एकरांचे कंपोस्ट यार्ड २०१० मध्ये पूर्ण केले आहे.

६. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोलापूर :— कारखान्याने ३० दिवसांकरिता साठविण्यासाठी आवश्यक पक्के लगून ऑगस्ट २०१२ मध्ये पूर्ण केले आहे. तसेच ६ एकराचे काँक्रीटीकरण झाले कंपोस्ट यार्ड २०१२ मध्ये कारखान्याने तयार केले आहे.

७. वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना लि., बीड :—

८. वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि., सांगली :— सदर कारखान्याची डिस्टीलरी २००९-१० पासून बंद आहे. तथापि, ६ एकर कंपोस्ट यार्डचे (काँक्रीटीकरणासह) तसेच स्पेंट वॉशचे काम कारखान्याने हाती घेतले आहे.

९. दौलत सहकारी साखर कारखाना लि., कोल्हापूर :— कारखान्याने सन २००७-०८ मध्ये ६० दिवस स्पेंट वॉश साठवणुकीसाठी (Impervious surfacing) केलेले पक्के लगून तयार केले आहेत. तसेच ७ एकर कॉक्रीटीकरण केलेले कंपोस्ट यार्ड कारखान्याने तयार केले आहे.

Crepe Norm च्या निकषांचा पूर्ततेचा एक भाग म्हणून बहुतांश साखर कारखान्याने कच्चे पाठ तसेच लगूनमध्ये मळी साठवणूक न करता त्यासाठी स्वतंत्र स्टील टँकची उभारणी केली आहे.

सद्यःस्थितीत Multi-pressure पद्धतीचे आधुनिक आसवनी प्रकल्प हाती घेण्यात येत असल्यामुळे स्पेंट वॉशची कमी प्रमाणात निर्मिती होत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगांव सहकारी साखर कारखान्यामार्फत आसवनीचे आधुनिकीकरण करून झिरो डिस्चार्ज मिळवण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

सहकारी साखर कारखाने दिवाळखोरीत काढण्यातील विलंब :—

२.३३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार दिवाळखोरीची कार्यवाही आयुक्तांकडून परिसमापकाने एखाद्या सहकारी साखर कारखान्यांची मालमत्ता ताब्यात घेतलेल्या तारखेपासून दहा वर्षांमध्ये संपवावयाची असते. दिवाळखोरी प्रक्रियेमध्ये असलेल्या ३१ सहकारी साखर कारखान्यांपैकी नऊ सहकारी साखर कारखान्यांच्या दिवाळखोरी प्रक्रियेची छाननी केली असता पुढील गोष्टी उघड झाल्या :—

- चार (गिरना-नाशिक, परशुराम-रत्नागिरी, संजय-धुळे आणि सासवड -सोलापूर) सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत दीवाळखोरी प्रक्रिया दहा वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही पूर्ण झालेली नव्हती.
- पाच सहकारी साखर कारखान्यांची ४२.८३ कोटी इतक्या किंमतीची यंत्रसामग्री १९८०-८१ पासून २००५-०६ पर्यंत वेगवेगळ्या कालावधीसाठी रिकामी पडून होती.
- दिवाळखोरी प्रक्रियेतील अनुसूचित दिरंगाईमुळे संजय सहकारी साखर कारखाना, धुळे यांचेकडील रु. ३.५० कोटी इतक्या रकमेची मालमत्ता राखण व पहारा व्यवस्थेअभावी चोरीस गेली होती.
- दिवाळखोरी प्रक्रियेतील आठ (गिरना-नाशिक, जिजामाता-बुलढाणा, कोंडेश्वर -अमरावती, परशुराम-रत्नागिरी, संजय-धुळे आणि शंकर -नांदेड, विनायक-अमरावती आणि यशवंत- सांगली) सहकारी साखर कारखान्यांकडून शासनास देय असलेले रु. ८१.६१ कोटी इतक्या किंमतीचे दायित्त्व प्रलंबित होते.

परिसमापकाने लेखे तयार करून आयुक्तांस सादर न केल्यामुळे कोणत्याही सहकारी साखर कारखान्यांच्या परिसमापकांच्या लेख्याचे सासवड माळी सहकारी साखर कारखाना सोडल्यास लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आले नव्हते (जून, २००७). आयुक्तांनी परिसमापकांकडून सहकारी साखर कारखान्यांचे तिमाही दिवाळखोरी प्रगती अहवाल मिळविले नव्हते.

आयुक्तांनी याबाबतीत असे म्हटले की (जानेवारी २००८), तीन (गिरना -नाशिक, परशुराम-रत्नागिरी, सासवड-सोलापूर) सहकारी साखर कारखान्यांनी मालमत्ता परिसमापकास आयएफसीआय आणि आयडीबीआय यांचेकडून त्यांचे मालमत्तेवर टांच आणल्यामुळे आणि ऋण वसूली न्यायाधिकरणाने न्यायालयीन व्यवस्थापकांची नेमणूक केल्यामुळे निकाली काढण्यात येणे शक्य झाले नव्हते. परशुराम सहकारी साखर कारखान्यांचे प्रकरण उच्च न्यायालयात तर सासवड माळी सहकारी साखर कारखाना, सोलापूर यांच्या मागण्या केंद्र शासनाकडे प्रलंबित होत्या. शासनाने याबाबत असे म्हटले की (जानेवारी २००८) संजय सहकारी साखर कारखाना आणि त्याची यंत्रसामग्री ह्या बाबी निकाली काढण्यात आल्या होत्या. निर्गम परिषदेमध्ये प्रधान सचिव यांनी असे म्हटले की, प्रतिभुतीकरण कायद्याच्या प्रचलनामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या अंतर्गत सहकारी साखर कारखान्याच्या मालमत्तेची दिवाळखोरीमार्फत विल्हेवाट लावण्यास बँकाना मनाई होती. उच्च न्यायालयानेसुद्धा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून दाखल केलेल्या रिट विनंती अर्जावर निकाल देताना दिवाळखोरी प्रक्रियेस स्थगिती दिली (१५ ऑक्टोबर २००४) होती. जी जानेवारी २००८ पर्यंत उठविण्यात आली नव्हती. तरीसुद्धा संजय साखर सहकारी कारखाना, धुळे यांच्या यंत्र सामग्रीचा अपवाद वगळता इतर सहकारी साखर कारखान्यांच्या मालमत्ता जानेवारी, २००८ पर्यंत निकाली काढण्यात आल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञापन :—

२.३४. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सहकारी साखर कारखाने अवसायनात घेण्याबाबत निश्चित स्वरूपाची तरतूद आहे या तरतुदीनुसार जर निबंधकाची खालील बाबींवर खात्री झाल्यास,—

(अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये केलेल्या चौकशीचे काम किंवा कलम ८४ अन्वये केलेल्या तपासणीचे काम संपल्यावर किंवा संस्थेचे हिशेब तपासणीचे प्रतिवृत्त मिळाल्यावर ; किंवा

(ब) त्या कारणासाठी बोलविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेस हजर असलेल्या संस्थेच्या दोन तृतीयांश सदस्यांपैकी इतक्या सदस्यांनी ठराव संमत केल्यानंतर करण्यात आलेला अर्ज मिळाल्यावर ; किंवा

(क) ज्या कोणत्याही संस्थेने

(i) काम सुरू केले नाही ; किंवा

(ii) काम करण्याचे बंद केले आहे ; किंवा

(iii) ५०० रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या किमतीचे शेअर्स किंवा सदस्यांच्या अनामत रकमा अशा संस्थेच्या ताब्यात आहेत ; किंवा

(iv) या अधिनियमातील किंवा नियमातील किंवा उपविधितील नोंदणी किंवा व्यवस्था याबाबतच्या कोणत्याही शर्तीचे पालन करणे बंद केले आहे अशा संस्थेच्या बाबतीत स्वतःचे असे वाटत असेल की, संस्थेचे व्यवहार बंद करण्यात आले पाहिजेत. तर त्यास अंतरिम आदेश देऊन व्यवहार बंद केले आहे अशा संस्थेच्या बाबतीत स्वतःच असे वाटत असेल की, संस्थेचे व्यवहार बंद करण्यात आले पाहिजेत. तर त्यास अंतरिम आदेश देऊन व्यवहार बंद करण्याविषयी अशा संस्थेस निर्देश देण्याचा अधिकार निबंधकास आहेत.

१. परशुराम सहकारी साखर कारखाना, म. रत्नागिरी.

२. गिरणा सहकारी साखर कारखाना, म. नाशिक.

३. कोंडेश्वर सहकारी साखर कारखाना, म. अमरावती.

४. विनायक सहकारी साखर कारखाना, म. औरंगाबाद.

५. जिजामाता सहकारी साखर कारखाना, म. बुलढाणा.

या कारखान्याच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस निरनिराळ्या न्यायालयामध्ये आव्हाने देऊन स्थगिती आदेश देण्यात आले असल्याकारणाने ही कार्यवाही पूर्ण करता आली नाही. तसेच ज्या कारखान्यांचा अवसायन कालावधी १० वर्षांपेक्षा जास्त आहे त्याप्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५७ अंतर्गत सदर कालावधीतून सूट देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत.

आजारी सहकारी साखर कारखाने दिवाळखोरी प्रक्रियेत आणले नव्हते :—

२.३५. तीन सहकारी साखर कारखाने कार्यरत नसतानासुद्धा दिवाळखोरी प्रक्रियेत आणले नव्हते.

नागपूर विभागातील तीन (आर.जी.गडकरी-नागपूर, श्रीराम-नागपूर, वैनगंगा-भंडारा) सहकारी साखर कारखाने २००२-०३ ते २००६-०७ या कालावधीमध्ये कार्यरत नव्हते. त्यांनी मार्च, २००५ अखेर एकूण रु.१०७.७८ कोटी इतका निव्वळ तोटा नोंदविला होता. हे सरकारी साखर कारखाने नाबार्ड कार्यक्रमांतर्गत सहाय्य घेण्यास पात्र नव्हते. असे असूनसुद्धा आयुक्तांनी त्यांना दिवाळखोरी प्रक्रियेत आणले नव्हते. आयुक्तांनी ह्या गोष्टीचा स्वीकार केला होता की (जानेवारी २००८) श्रीराम व वैनगंगा सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गत कारवाई करण्याची गरज होती. तथापि आर.जी.गडकरी सहकारी साखर कारखाना बहु राज्य सहकारी साखर कारखाना असल्यामुळे त्याबाबतीत केंद्र शासनाने कार्यवाही सुरू करावयास हवी होती.

ज्ञापन :—

२.३६. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

श्रीराम सहकारी साखर कारखाना म. नागपूर, वैनगंगा सहकारी साखर कारखाना म. भंडारा व राम गणेश गडकरी सहकारी साखर कारखाना म. नागपूर हे कारखाने मागील पाच वर्षांपासून कार्यरत नाहीत. सदर कारखान्याचा समावेश नाबार्ड पॅकेजमध्ये नाही. मात्र सदर कारखान्यांची मालमत्ता वित्तीय संस्थेने सिक्युरीटायझेशन कायद्यान्वये ताब्यात घेतली आहे. सदर कारखान्यांविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

सहकारी साखर कारखाने भाडे पट्ट्याने देणे

भाडेपट्टयाने दिलेल्या सहकारी साखर कारखान्याची मालमत्ता निकाली न काढणे :—

२.३७. गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना, परभणी (संस्थापक, अध्यक्ष-श्री.श्यामराव कदम) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, बीड यांना डिसेंबर, २००२ पासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता वर्षभरामध्ये गाळप केलेल्या ऊसाच्या एकूण राशीवर आधारित निश्चित केलेल्या कमीतकमी रु.१.५० कोटी इतक्या रकमेच्या अधीन राहून भाड्याने भाडेपट्टयावर दिला होता. पहिल्या दोन वर्षांमध्ये रु.३ कोटी इतके भाडे मिळाले होते. सहकारी साखर कारखान्याची मालमत्ता निकाली काढण्यासाठी शासनाने निविदा मागविल्यानंतर भाडेपट्टा करार रद्द करण्यात आला. निविदेमध्ये आलेली सगळयात मोठ्या रकमेचा प्रस्ताव (रु. २२.७५ कोटी) मंत्र्यांच्या समितीकडून फेब्रुवारी, २००४ मध्ये स्वीकारण्यात आला जो जून, २००६ मध्ये मुख्य धनको. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांनी उच्च न्यायालयाकडून जैसे थे परिस्थिती ठेवण्यासाठी स्थगिती आणल्यावर (जुलै, २००४) जून २००६ मध्ये फेटाळण्यात आला. जानेवारी, २००८ पर्यंत सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ होते. स्थगिती हटविण्यासाठी शासनाने न्यायालयात अर्ज दाखल करावयास हवा होता किंवा त्यांच्याच विभागाचा भाग असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेबरोबर चर्चा करून मार्ग काढावयास हवा होता. परंतु तशी कारवाई करण्यात आली नाही. याचा परिणाम म्हणून भाडेपट्टयाने दिलेल्या सहकारी साखर कारखान्याची मालमत्ता निकाली निघाली नाही.

ज्ञापन :—

२.३८. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार गोदावरी दुधना सहकारी साखर कारखान्याची मालमत्ता सर्वोच्च देकारी निविदाधारकास रु.२३.७५ कोटी एवढ्या रकमेस विक्री केली आहे.

सांविधिक लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करून घेणे :—

२.३९. आयुक्तांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८१ अंतर्गत सहकारी साखर कारखान्यांवर नियंत्रण ठेवण्याकरिता सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण हे एक महत्त्वाचे साधन प्राप्त झाले आहे. लेखापरीक्षा अहवाल आयुक्तांना अधिनियमांतर्गत व्यवस्थापनाविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यासाठी तसेच वारंवार होणाऱ्या अनियमितता टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाची माहिती पुरवितात. आयुक्तांना प्रत्येक वर्षी मार्चअखेर लेखापरीक्षकांकडून झालेल्या लेखापरीक्षणाची विवरणे प्रादेशिक सह संचालक यांचेकडून मिळतात. प्रादेशिक सहसंचालक यांच्या अधिपत्याखाली असलेले उप संचालक (साखर) सहकारी कारखान्यांच्या लेखापरीक्षण अहवालाच्या छाननीकरिता आणि त्यावरील योग्य अशा कारवाईकरिता जबाबदार असतात त्यांनी कारखान्यागणिक लेखापरीक्षण अहवालामध्ये लक्षात आणून दिलेल्या गंभीर आणि चिंताजनक अनियमितता नोंदविण्यासाठी आणि त्यावरील अनुपालनासाठी रजिस्टर्स ठेवणे आवश्यक असते. आयुक्त कोणताही वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रम तयार करीत नव्हते. त्याऐवजी, शासनाने नेमलेल्या सांविधिक लेखापरीक्षकांना प्रत्येक वर्षी पाच ते सहा सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण देण्यात आले होते. मार्च, २००७ अखेर ३५ मंजूर पदांपैकी आठ विशेष लेखापरीक्षकांची कमतरता होती तर सात पदे दोन वर्षांकरिता रिकामी होती.

६१ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण १ ते १५ वर्षे मर्यादेत या वेगवेगळया कालावधी करिता थकीत होते. यापैकी आठ सहकारी साखर कारखान्यांचे लेखे जे दिवाळखोरी प्रक्रियेत होते १० वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता थकीत होते. ६१ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण १५ वर्षांच्या मर्यादेपर्यंत वेगवेगळया कालावधीकरिता थकीत होते. याबाबत आयुक्तांनी असे म्हटले की (जानेवारी २००८) ६१ सहकारी कारखान्यांपैकी २९ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण तीन वर्षापेखा अधिक कालावधीकरिता थकीत होते. सदर लेखापरीक्षण मुख्यतः सहकारी साखर कारखान्यांमधील मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे आर्थिक विवरणपत्रे तयार न झाल्यामुळे थकीत राहिले होते.

लेखापरीक्षण अहवालीतील परिच्छेदावर त्यांचे अनुपालनाकरिता प्रादेशिक सह सचिवांकडून प्रलंबित परिच्छेदांकरिता रजिस्टर्स न ठेवल्यामुळे लक्ष ठेवण्यात आले नव्हते. २२ चाचणी परीक्षा झालेल्या सहकारी साखर कारखान्यांपैकी नऊ कारखान्यांनी त्यांच्या लेखापरीक्षण अहवालासाठी तीन महिन्यांच्या विहीत मुदतीमध्ये अनुपालन अहवाल सादर केलेला नव्हता.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या नियम ७४ मधील तरतुदीनुसार आकारले गेलेले रु २.५२ कोटीचे लेखापरीक्षण शुल्क मार्च, २००७ अखेर ३५ सहकारी साखर कारखान्यांकडून येणे बाकी होते. थकित लेखापरीक्षण शुल्क असलेले सर्वात आधीचे वर्ष १९९२-९३ होते. शासनाने याबाबतीत असे म्हटले की, (जानेवारी २००८) सहकारी साखर कारखान्यांच्या आजारपणामुळे लेखापरीक्षण शुल्क वसूल करणे शक्य झाले नव्हते. तथापि, मंत्र्यांच्या समितीकडून असा निर्णय घेण्यात आला होता की, (जुलै २००७) वर्ष २००७-०८ मध्ये उत्पादित झालेल्या प्रत्येक साखरेच्या गोणीमागे रु २५ शासकीय देणे चुकते करण्यासाठी बाजूला ठेवावेत. अगोदर म्हटल्याप्रमाणे एकूण शासकीय देण्याचे प्रमाण पहाता एक वर्षाकरिता बाजूला ठेवला जाणार वसूल निधी फक्त एकूण देण्याच्या ७.२४% असेल.

ज्ञापन :—

२.४०. उपरोक्त परिच्छेदाच्यासंदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

६१ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण १५ वर्षांच्या मर्यादेपर्यत वेगवेगळया कालावधीकारिता थकीत होते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१ आणि ८२ च्या तरतुदीनुसार सहकारी साखर कारखान्यांचे वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकारी निबंधकास आहेत.

लेखापरीक्षणात आढळून आलेले गंभीर दोष, त्रुटी, उणिवा, अनियमितता व गैरव्यवहार लेखापरिक्षक त्यांच्या लेखापरीक्षण अहवालात नोंदवितात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८२ मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण अहवालातील निदर्शनास आलेल्या दोषांची दुरुस्ती सहकारी साखर कारखान्यांनी तीन महिन्यांच्या आंत करणे आवश्यक आहे. सहकारी साखर कारखान्यांचे नियमीत लेखापरीक्षणात आढळून आलेले गंभीर आणि चिंताजनक दोषाबाबत त्त्वरित कारवाईसाठी लेखापरिक्षक निबंधकास विशेष अहवाल सादर करतात.

दिनांक ३१ मार्च २००७ अखेर ६१ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण थकीत होते. सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण थकीत राहण्याची प्रमुख कारणे प्रत्येक कारखान्यांची वेगवेगळी आहेत. यामध्ये प्रामुख्याने लेखापरीक्षणासाठी अवसायनातील संस्थांचे, रेकॉर्ड उपलब्ध न होणे, सहकारी साखर कारखान्यांचे रेकॉर्ड पूर्ण नसणे आणि कारखान्याकडे रेकॉर्ड पूर्ण करण्यासाठी पूरेसे मनुष्यबळ नसणे ही कारणे आहेत. प्रामुख्याने सहकारी साखर कारखान्यांचे रेकॉर्ड पूर्ण नसणे हे मोठै कारण आहे. अशाबाबतीत कारखान्यांचे रेकॉर्ड पूर्ण करणे संबंधी व ते पूर्ण करणेसाठी या कार्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो.

६१ सहकारी साखर कारखान्यांपैकी ४४ सहकारी साखर कारखान्यांचे थकीत लेखापरीक्षण पूर्ण करणेत आले असून उर्वरित १७ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहेत. या १७ सहकारी साखर कारखान्यांपैकी ८ सहकारी साखर कारखाने अवसायनात आहेत. एक सहकारी साखर कारखाना उभारणी खाली आहे व एका सहकारी साखर कारखान्यांचे रेकॉर्ड पोलीस कस्टडीत आणि उर्वरित ७ सहकारी साखर कारखान्यांचे रेकॉर्ड पूर्ण नाही. त्यामुळे सदर कारखान्याचे लेखापरीक्षण विहीत कालावधीत पूर्ण करता आले नाही.

सहकारी साखर कारखान्यांची तपासणी :—

२.४१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात निर्देशित केल्यानुसार आयुक्त किंवा प्रादेशिक सहसंचालक यांनी केव्हाही कारखान्यांचे पर्यवेक्षण केले नव्हते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८९अ अंतर्गत सहकारी साखर कारखाने अधिनियम, नियम अणि उपविधिच्या तरतुदींचे पालन करतात. योग्य त्या प्रकल्पामध्ये त्यांच्याकडून लेखे व लेखे पुस्तिका ठेवल्या जातात आणि त्यांच्याकडून सहकाराची तत्त्वे व शासनाकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होते ह्या बाबींची खात्री करून घेण्यासाठी आयुक्तांना त्यांचे निरीक्षण /तपासणी करावी लागते. सहकारी साखर कारखान्यांच्या पर्यवेक्षणाच्या हेतूने आयुक्तांना त्यांच्या लेखे व लेखे पुस्तिकांपर्यंत पोहोचता येते.

तथापि, आयुक्त किंवा प्रादेशिक सहसंचालक ह्यांनी सहकारी साखर कारखान्यांचे केव्हांही पर्यवेक्षण केले नव्हते. प्रादेशिक सहसंचालक अहमदनगर यांनी असे म्हटले की, लेखापरीक्षण करण्याच्या कालावधीमध्ये कर्मचारी वर्गाची कमतरता असल्यामुळे पर्यवेक्षण करण्यात आले नव्हते. शासनाने यावर असे म्हटले (जानेवारी, २००८) की, सहकारी साखर कारखान्यांचे पर्यवेक्षण केले जाईल.

ज्ञापन :—

२.४२. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात निर्देशित केल्यानुसार आयुक्त किंवा प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी केव्हाही कारखान्याचे पर्यवेक्षण केले नव्हते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९ अन्वये संस्थेची तपासणी करण्याची तरतूद आहे. याबाबत भविष्यात सहकारी साखर कारखान्यांची तपासणी करणेबाबत काळजी घेण्यात येईल.

सहकारी साखर कारखान्याच्या विरोधात दाखल केलेल्या चौकशी प्रकरणांना दिलेले अंतिम स्वरुप

चौकशी अधिकाऱ्याच्या स्तरावरील विलंब :—

२.४३. ५४ सहकारी साखर कारखाने गुंतले आहेत अशा निबंधकाने दाखल केलेल्या ७५ चौकशी प्रकरणांपैकी फेब्रुवारी, २००१ आणि सप्टेंबर २००६ या कालावधीत सुरू केलेल्या रु.१०५.३१ कोटी इतकी रक्कम गुंतलेल्या २६ प्रकरणांवर डिसेंबर, २००६ पर्यंत परिपूर्ण प्रक्रिया झाली नव्हती. ही प्रकरणे चौकशी अधिकाऱ्यांकडे वेगवेगळया कारणांसाठी प्रलंबित होती. जसे की, परिसमापक आणि सहकारी साखर कारखान्यांकडे चार (बागेश्वरी-जालना, शेतकरी -लातूर, शिवशक्ती-उस्मानाबाद आणि विनायक-औरंगाबाद) प्रकरणांसंबंधात चौकशी अधिकाऱ्यांकडे अभिलेखे सादर न करणे, ११ (अजिंक्यतारा-सातारा, बागेश्वरी-जालना, बेलगंगा-जळगांव, गोदावरी-परभणी, कादा-बीड, नाशिक-पाल्से, पारझरकणा-नाशिक, संत दामाजी-सोलापूर, सह्याद्री-कोल्हापूर आणि वसंतदादा-सांगली) प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांची बदली, १० (बालाघाट-लातूर, गंगापूर-औरंगाबाद, इंदिरा-हिंगोली, दंदि-कोल्हापूर, जयभवानी-बीड, कडा-बीड, निफाड-नाशिक, शेतकरी-लातूर, तासगांव-सांगली आणि वसंतदादा-सांगली) प्रकरणे निबंधकाने वारंवार चौकशी कालावधी वाढवून दिल्याने चौकशी अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आणि एका (गंगापूर-औरंगाबाद) प्रकरणी उच्च न्यायालयाने पुनःचौकशीचे आदेश दिल्याने इ. डिसेंबर, १९९९ मध्ये कलम ८३ अंतर्गत वसंत सहकारी साखर कारखान्याविरोधात त्यांनी खरेदी विहीत पद्धतीने न केल्यामुळे चौकशी सुरू करण्यात आली होती. ज्याचा परिणाम रु.२० लाखाचे नुकसान होण्यात झाला. निबंधकाकडून (अमरावती) ती चौकशी डिसेंबर, १९९९ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून आलेल्या आदेशानुसार थांबविण्यात आली. विधानसभेमध्ये याबाबतीत प्रश्न उपस्थित झाल्यामुळे या प्रकरणी सप्टेंबर, २००० मध्ये पुनःचौकशी सुरू करण्यात आली जी अनुसरलेली कार्यपद्धती निश्चितपणे संशयास्पद आणि पुढील संशोधनाची आवश्यकता असल्याचे शिक्कामोर्तब करून फेब्रुवारी, २००१ मध्ये संपविण्यात आली. तथापि, जानेवारी, २००८ पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अंतर्गत १९९८-९९ या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालात तासगांव सहकारी साखर कारखाना, सांगली यांचे संबंधात समाविष्ट केलेल्या काही महत्त्वाच्या लेखापरीक्षण निष्कर्षाच्या बाबतीत जसे की, उसाची किंमत न देणे, प्रलंबित अग्रिम वसूली न करणे शासकीय हमीवर घेतलेल्या पूर्व हंगामी कर्जाचा दुरुपयोग करणे आणि क्षेत्रीय विकास निधी दुसरीकडे वळविणे, एक चौकशी जानेवारी, २००२ मध्ये सुरू करण्यात आली जी जून, २००७ मध्ये संपुष्टात आली. आयुक्तांनी याबाबतीत तीन स्मरणपत्रे चौकशी अधिकाऱ्यास दिली होती. परंतु नियम ७१ (३) अंतर्गत चौकशी त्यांचेकडून चौकशी पूर्ण करण्यात आलेल्या अपयशाची कारणे विचारण्यात आली नव्हती किंवा ते काम काढून घेऊन स्वतःकडे घेण्याची किंवा एखाद्या दुसऱ्या व्यक्तिस ते काम सोपविण्याची कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती.

याबाबतीत शासनाने अस म्हटले की (जानेवारी २००८), कार्यरत नसलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या आणि त्यांच्या कर्मचारीवर्गांच्या संबंधातील अभिलेखे/कागद पत्रे उपलब्ध करून दिले गेले नव्हते. त्यामुळे त्या चौकशा प्रलंबित होत्या. हीच अडचण दिवाळखोरी प्रक्रियेत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत ही होती. मनुष्यबळाची उपलब्धता हा मुख्य प्रश्न असल्यामुळे आयुक्तांनी कलम ७९ अंतर्गत बाहेरील संस्थाच्या मदतीने लेखे तयार करून घेऊन त्याबाबतचा होणारा खर्च सहकारी साखर कारखान्यांकडून वसूल करावयास हवा होता.

ज्ञापन :—

२.४४. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

याबाबत सादर करण्यात येते की, सर्व प्रकारचे प्रयत्न करून चौकशी कामकाज पूर्ण करण्यात येईल.

आयुक्त स्तरावरील विलंब :—

२.४५. सन २००० ते २००४ या कालावधीत प्रक्रिया पूर्ण झालेल्या व त्यांचे परिणाम संबंधित सहकारी साखर कारखान्यांना कळविल्या गेलेल्या १८ प्रकरणांच्या बाबतीत जानेवारी २००८ अखेर कारवाई प्रलंबित होती. ह्या सर्व प्रकरणात संबंधित सहकारी साखर कारखान्यांनी शासनाकडे अपील केले नव्हते ह्या प्रकरणांपैकी रु.१६.७९ कोटी इतकी रक्कम गुंतली असलेल्या १७ प्रकरणांत, ती प्रकरणे कलम ८३ अंतर्गत असल्याने निंबधकाने सहकारी साखर कारखान्यांनी दिलेल्या उत्तराच्या आधारे जबाबदारी निश्चित करण्याच्या दृष्टीने पुढील कारवाई करावयाची होती. परंतु तशी कारवाई ह्या सर्व प्रकरणांत करण्यात आली नव्हती. असे लक्षात आले होते की जरी कलम ८३ अंतर्गत राजगड सहकारी साखर कारखाना, पुणे ह्यांच्या विरोधात झालेल्या चौकशीत (२९ नोव्हेंबर २००५) २०००-०३ या कालावधीत खराब म्हणून साखरेच्या चुकीच्या झालेल्या विक्रीच्या व्यवहारात रु.६९ लाखाचा तोटा निश्चित झाला होता. तरी त्याबाबतीत निबंधकाकडून कलम ८८ अंतर्गत जबाबदारी निश्चित करण्यासंबंधात आणि झालेल्या नुकसानाचीभरपाई करून घेण्यासंबंधात कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती.

त्याचप्रमाणे, जिजामाता सहकारी साखर कारखाना, बुलढाणा यांच्या कलम ८३ अंतर्गत झालेल्या चौकशीत (२० मार्च १९९९) १९९५-९६ दरम्यान भांडार विभागास लागलेली आग, भंगार वस्तूची उधार विक्री कर्मचारी वर्गास दिलेली अग्रिम, एच अ‍ॅड टी कंत्राटदारावर झालेला खर्च इ. कारणामुळे रु. २ कोटी इतक्या रकमेचा तोटा निश्चित झाला होता. झालेल्या चौकशीत (जुलै २०००) झालेल्या तोट्याकरिता व्यवस्थापकीय संचालक, मुख्य अभियंता, भंडारा अधीक्षक आणि व्यवस्थापन यांना एकत्रित जबाबदार धरले होते. तथापि, कलम ८३ अतर्गत झालेल्या तोट्याची रक्कम वसूल करण्याकरिता कोणतीही कारवाई आयुक्तांनी सुरू केली नव्हती. तसेच कलम ७८ अंतर्गत कोणतीही कारवाई दोषी ठरलेल्या अधिकाऱ्यांविरोधात केली गेली नव्हती.

ज्ञापन :—

२.४६. उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

या बाबत सादर करण्यात येते की, सर्व प्रकारचे प्रयत्न करून चौकशीचे कामकाज पूर्ण करण्यात येईल.

साक्ष :

२.४७. समितीने दिनांक २० जून, २०१२, ६ सप्टेंबर, २०१२, २२ जानेवारी, २०१३ व २१ फेब्रुवारी, २०१३ रोजी " महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन " यासंदर्भात सचिव, पर्यावरण विभाग व सहकार विभाग सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, यांची साक्ष घेतली.

पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण विकास नियंत्रण महामंडळ

२.४८. महाराष्ट्रातील साखर कारखान्याचे व्यवस्थापन या लेखापरीक्षण अहवालाचा संदर्भ घेऊन माननीय उच्च न्यायालयात जनहितयाचिका दाखल करण्यात आलेली आहे. परंतु दाखल केलेल्या जनहितयाचिकेबाबत पर्यावरण विभागाच्या सचिवांना काहीच माहिती नसल्यामुळे समितीने सदर लेखापरीक्षणाच्या आक्षेप काय आहे अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली की, पर्यावरणीय संरक्षणाच्या निगमांच्या जबाबदाऱ्या (CREP) या सनदीच्या आवश्यकतांचे सहकारी साखर कारखान्यांच्या अनुपालनाचे नियंत्रण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) करीत असते मार्च, २००३ मध्ये सह्या केलेली ही सनद, मळीवर आधारित आसवन्यांची पर्यावरणीय मानके आणि प्रदूषकांचे विसर्जन वातावरणांत शून्यावर आणण्यासाठी डिसेंबर, २००५ पर्यंत आणि त्यानंतर डिसेंबर, २००७ पर्यंत वाढविलेल्या मुदतीत कालबद्ध कार्यवाहीने साध्य करण्यासंबंधी आहे.

२.४९. पर्यावरण संरक्षणाच्या संदर्भातील मुलभुत अटीबाबत माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) निर्गमित केलेल्या गाईडलाईन्समध्ये तीन महत्त्वाचे मुद्दे आहेत. पहिला मुद्दा असा आहे की, प्रेसमडच्या मदतीने स्पेन्ट वॉशचे कम्पोस्टमध्ये रुपांतर कॉंक्रीटच्या अभेद्य सपाटीवर करावे, दुसरे स्पेन्ट वॉश स्टोअर करण्यासाठी कॉंक्रीटचे लगून तयार करणे आणि तिसरे साखर कारखान्यांकडून बँक गॅरन्टी घेणे. ज्यांनी या अटींचे उल्लंघन केले असेल त्यांची बॅंक गॅरन्टी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) जप्त केली जाते. अशा साखर कारखान्यांविरुद्ध महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) अनेकदा कारवाई केलेली आहे. दोन स्टारमध्ये सात सहकारी कारखाने आहेत. या सात सहकारी साखर कारखान्यांनी आसवन्या निसृत / विर्सजित करीत असलेले स्पेन्ट वॉश अभेद्य सपाटीवर करावयाचे असताना थेट जमिनीवर सोडून कंपोस्ट करीत होते, असे महालेखाकारांच्या अहवालात नमूद केलेले आहे. या अनुषंगाने या सात साखर कारखान्यांच्या विरोधात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) ने कारवाई केलेली आहे.

२.५०. साखर कारखान्यांनी विसर्जित करीत असलेले स्पेन्ट वॉश अभेद्य सपाटीवर करावयाचा असतो किंवा त्यांना क्रॉंक्रीटचा टँक करावयाचा असतो परंतु स्पेन्ट वॉश थेट जमिनीवर सोडून कंपोस्ट करीत होते, यामध्ये सात साखर कारखान्यांची यादी आहे.

२.५१. डॉ. व्ही.व्ही.पाटील-नगर, जय भवानी-बीड, निफाड-नाशिक, राजाराम बापू-सांगली, समर्थ-जालना, श्रीराम-सातारा, सिद्धेश्वर-सोलापूर, वैद्यनाथ-बीड या सात साखर कारखान्यांच्या संदर्भातील ऑडिट ऑब्जेक्शन आहे. यामध्ये प्रत्येक साखर कारखान्याने कॉंक्रीटचा प्लॅटफॉर्म बांधण्याची गरज होती. स्पेन्ट वॉशचे शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करण्याची गरज आहे. डॉ. व्ही.व्ही.पाटील-नगर येथील साखर कारखान्याचे ३० दिवस स्पेन्ट वॉश साठवता येईल अशा प्रकारचा कॉंक्रीटचा टँक तयार केलेला आहे. सन २००९ पासून ८ एकरचे कंम्पोस्ट प्लांट या कारखान्याने कार्यान्वित केले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) प्रत्येक साखर कारखान्यांकडून बँक गॅरन्टी घेतली जाते. त्यांनी नियमांचा भंग केला तर त्यांची बँक गॅरन्टी जप्त केली जाते. त्याप्रमाणे या साखर कारखान्याची २ लाख रुपये बँक गॅरन्टी ३१ डिसेंबर, २०१२ पर्यंत आहे. जय भवानी साखर कारखान्याचे डिसेंबर, २०१४ पर्यंत व्हॅलिड असलेले संमतीपत्र आहे. बँक गॅरन्टी घेण्यामध्ये हेतू एवढाच असतो की, नदीमध्ये स्पेन्ट वॉश मिळाल्याची तक्रार प्राप्त होताच लगेच बँक गॅरन्टी जप्त करून घेण्यात येते.

२.५२. नियमांचा भंग केल्यामुळे उपरोक्त सात कारखान्यासंदर्भात काढलेल्या आक्षेपाबाबत त्या कारखान्यांनी कार्यवाही केली असा विभागाचा अहवाल आहे. परंतु उपरोक्त सात कारखान्यांच्या यादीत असणाऱ्या एका कारखान्याकडून प्रदूषणाच्या संदर्भात आजूबाजूच्या लोकांनी प्रदूषणाचा त्रास होत असल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलने केली आहेत. त्यामुळे प्रदूषण कमी होण्यासाठी कारखान्यांकडून मिळालेली अनामत रक्कम जप्त करणे या पर्यायाव्यतिरिक्त प्रदूषणाचा ऱ्हास न होणे आणि वातावरण चांगले कसे राहील हे पाहणे जरुरीचे आहे, अशी सूचना समितीने विभागास केली.

२.५३. बँक गॅरन्टीची रक्कम, बँक गॅरन्टी ऑपरेशन आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी मेंटनन्सवर होणाऱ्या खर्चाच्याप्रमाणे परिगणना (calculate) केली जाते. सदरहू बँक गॅरन्टी २ लाख किंवा ५ लाख रुपये एवढ्या प्रमाणात घेतली जाते. साखर कारखान्याने नियमाचा भंग केला असेल तर त्यांची बँक गॅरन्टी जप्त केली जाते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) कडून प्रत्येक साखर कारखान्याला दरवर्षी मान्यता घ्यावी लागते. २ लाख रुपयांची बँक गॅरन्टी ही केवळ मेंटनन्सकरिता असते. ही बँक गॅरन्टी कधीच परत केली जात नाही. कन्सेन्टचे नूतनीकरण होईपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडेच (MPCB) असते. यानंतर तक्रारी प्राप्त झाल्या तर बँक गॅरन्टी जप्त केली जाते.

२.५४. छोट्या आणि मोठ्या क्षमतेच्या कारखान्यांकडून एकाच प्रकारची बँक गॅरन्टी घेतली जाते काय तसेच स्टील कारखान्यासाठी व साखर कारखान्यासाठी बँक गॅरन्टीची रक्कम सारखी आहे काय याबाबत खुलासा करताना सदस्य सचिव, यांनी सांगितले की, स्टील कारखान्यांसाठी समजा ५०० कोटी रुपयांची यंत्रसामग्री घेतली गेली तर १० टक्के प्रमाणे त्यांच्याकडून ५० कोटी रुपयांची बँक गॅरन्टी घेतली जाईल. ठराविक कालावधीत कारखान्यांनी आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसवली नाही तर त्यांची बँक गॅरन्टी जप्त केली जाते. मोठ्या आणि छोट्या क्षमतेच्या साखर कारखान्यांसाठी २ लाख रुपये बँक गॅरन्टी घेतली जाते. ज्या कारखान्यांकडे प्रतिदिन २० ते ४५ किलो लीटर क्षमतेच्या डिस्टीलरीज् असतील तर २ लाख रुपये व प्रतिदिन ७५ किलो लीटर क्षमतेच्या डिस्टीलरीज् असतील तर ५ लाख रुपये बँक गॅरन्टी घेतली जाते. बँक गॅरन्टी जप्त केल्यानंतर नियमाचा भंग करणारे साखर कारखाने पुढे सुरूच रहातात आणि त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी होत नाही अशी खंत समितीने व्यक्त केली.

२.५५. बँक गॅरंटी घेण्याच्या निकषाबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, मे.वेल्लोर सिटीझन वेलफेअर फोरम विरुद्ध भारत सरकार आणि इतर, याचिका क्र.९१४/१९९१ यामध्ये मे. सर्वोच्च न्यायालयाने प्रदूषण करणारांनी नुकसानभरपाई द्यावी. या ठरवून दिलेल्या तत्त्वाप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १९९५ पासून जल व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमातील अनुक्रमे जल-कलम ३३-अ व हवा-कलम ३१-अ या तरतुदींप्रमाणे दिलेल्या निर्देशांची पूर्तता करण्याकरिता बँकेची हमी घेऊन सदरहू आदेशाची पूर्तता करण्याकरिता कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून, कालावधी देण्याची पद्धत अवलंबिण्यास सुरूवात केली.

बँकेची हमी खालील कारणास्तव घेण्यात येत आहे :—

अ. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविणे/ आहे, त्या यंत्रणेमध्ये सुधारणा करणे.

ब. बसविलेली प्रदूषण नियंत्रण यंत्रणा व्यवस्थित चालविणे, जेणेकरून, कोणतेही प्रदूषण होणार नाही.

२.५६. अशी बँकेची हमी घेताना, संबंधित प्रदूषित उद्योगांस प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याकरिता जेवढा अपेक्षित खर्च आहे, त्याच्या १० टकके रक्कम बँकेची हमी म्हणून सदरहू यंत्रणा बसविण्याकरिता घेणे आवश्यक आहे. जेणेकरून विहीत कालावधीमध्ये, अशी यंत्रणा बसविली नाही तर, बँकेची हमी जप्त करून, प्रदूषण करणारांनी नुकसानभरपाई भरणे आवश्यक आहे, हे विचारात घेऊन अशी नुकसानभरपाई वसूल केली पाहिजे.

२.५७. दुसऱ्यांदा प्रदूषण नियंत्रणाचे उल्लंघन केल्यावर होणाऱ्या शिक्षेबाबत असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र मुल्यांकन समितीने बँकेची हमी घेण्याबाबतच्या प्रक्रियेचे पुर्नविलोकन करून, त्यामध्ये खालीलप्रमाणे योग्य ती सुधारणा केलेली आहे.

अ. लघु, मध्यम आणि मोठे उद्योगधंदे यांची वित्तिय स्थिती विचारात घेऊन १० टक्के ते ३० टक्के प्रदूषण नियंत्रण यंत्रणेच्या अपेक्षित खर्चाच्या बँकेची हमी घेणे.

ब. अस्तित्त्वात असणारी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा कार्यक्षमपणे चालविण्याकरिता वरीलप्रमाणे अशी यंत्रणा चालविण्याच्या वार्षिक खर्चाच्या आधारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेगवेगळ्या अपूर्तता विचारात घेऊन सर्वांना समानरित्या वागणूक दिली जावी. याकरिता अपूर्तता वर्गवारी करून, त्यामध्ये संपूर्ण अपूर्तता, अपूर्ण आणि अंशतः अपूर्तता, अशी विभागणी केलेली आहे. त्याप्रमाणे अंशतः अपूर्तता असल्यास २५ टक्के बँकेची हमी जप्त करणे व सदरहू पूर्तता करण्याकरिता अधिकचा २५ टक्के (पूर्वीच्या कालावधीच्या) कालावधी देणे आणि ५० टक्के अपूर्ण अपूर्तता असल्यास, ५० टक्के हमी जप्त करून, ५० टक्के च्या दुप्पट बँकेची हमी उर्वरित ५० टक्के कामकाज करण्याकरिता दिलेल्या ५० टक्के कालावधीकरिता देणे, तसेच संपूर्ण अपूर्तता असल्यास १०० टक्के बँकेची हमी जप्त करून, २०० टक्के बँकेची हमी घेऊन उर्वरित कालावधी देणे अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सोबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेले लिगल मॅट्रीक्स जोडण्यात येत आहे.

क. आसवण्यांच्याबाबतीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषणाची शुन्य निकसन पातळीची पूर्तता होण्याबाबत धोरण ठरविलेले आहे. (परिशिष्ट-६)

२.५८. दुसऱ्यांदा उल्लंघन झाल्यास पूर्ततेसाठी दिलेल्या कालावधीकरिता वरीलप्रमाणे जास्तीची घेतलेली बँकेची हमी जप्त करून जर अधिक कालावधी दिला तर दुसऱ्यांदा दिलेल्या बँकेच्या हमीच्या दुप्पट बँकेची हमी घेऊन, उर्वरित कालावधी दिला जातो. येणेप्रमाणे अपूर्तता करणाऱ्या उद्योगापासून होणारे प्रदूषण नुकसानभरपाई म्हणून बँक हमीची रक्कम जप्त करून व पुन्हा वाढवून अपूर्तता अधिक खर्चिक व दंडनीय करून, अपूर्तता करण्यास अप्रवृत्त करणे हा उद्देश आहे.

२.५९. साखर कारखान्यांच्या बँक गॅरंटी संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बँक गॅरंटी दोन कारणांसाठी घेतली जाते. डिव्हायसेस आणि इक्विपमेंटमध्ये काही कमतरता असेल तर त्यांनी त्याची पूर्तता केली पाहिजे. तसेच, आवश्यक ती यंत्रे बसवायची असतील तर ती बसविली पाहिजेत. यासाठी १० टक्के ते ३० टक्के बँक गॅरंटी घेतो. तसेच, प्लँट आणि मशिनरी संदर्भात ऑपरेशन अँड मेन्टेनन्स हा दुसरा प्रकार आहे. यासाठी १ कोटी रुपयांची बँक गॅरंटी घेतली जाते. इतर गोष्टींसाठी २ लाख रुपये, ३ लाख रुपये, ५ लाख रुपये या प्रमाणे बँक गॅरंटी घेण्यात येते. ज्या साखर कारखान्यात अडचणी आढळून आलेल्या नाहीत आणि साखर कारखाना व्यवस्थित सुरू असेल किंवा आवश्यक ती यंत्रे बसविल्यानंतर बँक गॅरंटी वापस केली जाते. ज्यांनी साखर कारखाना बरोबर चालविला नाही त्यांच्याकडून विभागाने १९ लाख रुपयांची बँक गॅरंटी जप्त केलेली आहे.

२.६०. परंतु बँक गॅरंटी जप्त केल्यानंतर संबंधित साखर कारखाने आवश्यक ती यंत्रे बसवितात काय यावर साखर कारखान्याची बँक गॅरंटी जप्त केल्यानंतर देखील संबंधित साखर कारखान्याने विभागाने सूचविलेल्या सूचनांचे पालन केले नाही तर त्यांच्याकडून डबल बँक गॅरंटी घेतली जाते. भिमा सहकारी साखर कारखान्याला कम्पोष्ट यार्ड तयार करण्यासंदर्भात सूचविण्यात आले होते. त्यांनी या सूचनेची पूर्तता न केल्यामुळे त्यांच्याकडून १० लाख रुपये बँक गॅरंटी जप्त करण्यात आली आणि आता त्यांना २० लाख रुपयांची बँक गॅरंटी देण्यास सांगितले आहे.

२.६१. प्रदूषण होत आहे त्याप्रमाणात बँक गॅरंटी घेतली जात नाही. प्रदूषणाचे होणारे परिणाम विचारात न घेता इंन्स्ट्रुमेंटवर आधारित बँक गॅरंटी घेतली जाते. ही पद्धत अवलंबिली जात असेल तर ती चुकीची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.६२. प्रदूषण मंडळाने निर्धारित केलेल्या अंतिम मुदतीचे अनुपालन कारखान्याने केले नाही तर त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येते. त्यानंतर त्यांना निर्देश देण्यात येतात. त्यांचेही पालन झाले नाही तर कारखान्यांवर कारवाई करण्यात येते. २९ पैकी ५ कारखाने बंद आहेत त्यामध्ये वसंतदादा-सांगली, दौलत-कोल्हापूर, भोगावती-कोल्हापूर, पंचगंगा-कोल्हापूर आणि सत्यवान-कोल्हापूर हे कारखाने बंद आहेत. डिस्टीलरी युनिट बंद आहेत. सिद्धेश्वर सोलापूर, जयभवानी-बीड, निफाड-नाशिक, राजारामबापू-सांगली, वैद्यनाथ-बीड या कारखान्यांनी अटींचे पालन केले आहे.

२.६३. प्रदूषणाच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जास्तीत जास्त कोणती कडक कारवाई करण्यात येते अशी विचारणा समितीने केली असता, पर्यावरण सचिवांनी समितीस सांगितले की, कोणत्याही नगरपरिषदेला अनुदान देताना त्या नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये मूलभूत (बेसिक) पर्यावरण यंत्रणा आहे की नाही, सिव्हेज ट्रिटमेण्ट प्लॅण्ट आहे की नाही हे पाहूनच अनुदान द्यावे, ज्या नगरपरिषदेच्या क्षेत्रात मूलभूत (बेसिक) पर्यावरण यंत्रणा नाहीत अशा नगरपरिषदांना अनुदान देऊ नये अशा सूचना नगरविकास विभागाला करण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त विभागाकडे काही अधिकार नाहीत. पर्यावरण विभागाने विविध विभागाना ७० सूचना दिलेल्या आहेत. परंतु त्या सूचनांची अंमलबजावणी झालेली नाही.

२.६४. सदर लेखापरीक्षणाचा आक्षेप हा मेंटनन्ससाठी आहे की, पायाभूत सुविधा निर्माण केल्या नाहीत म्हणून आहे आणि जर मूलभूत सुविधा दिल्या नाही तर कोणती कारवाई केली जाते असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, CREP च्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये (गाईडलाईन्स) दोन मुद्दे होते. त्यावर आधारित सदर लेखापरीक्षण परिच्छेद आहे. सदर परिच्छेद सन २००७ सालातला आहे. सन २००३ मध्ये सनद केल्याचा उल्लेख आहे. सन २००७ पर्यंत पूर्तता केलेली नाही. त्यांना सन २००७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती व त्यांनी दिलेल्या अभिप्रायाची पूर्तता या परिच्छेदात उल्लेख केलेल्या सर्व साखर कारखान्यांनी केलेली आहे व वेटिंग झाल्यानंतर ते सहकार विभागाकडे गेले.

२.६५. साखर कारखान्यांच्या संदर्भातील सर्व कामकाज सहकार खात्यामार्फत केले जाते. साखर कारखाने चालू असताना प्रदूषणाच्या संदर्भातील नियमांची अंमलबजावणी पर्यावरण खात्यामार्फत केली जाते. महालेखाकारांनी परिच्छेद काढल्यानंतर सहकार खात्याकडून त्याची पूर्तता (कम्प्लायन्स) केली जाते. सहकार व पर्यावरण या दोन्ही विभागाच्या सहकार्याने काम झाले पाहिजे परंतु सहकार विभाग व पर्यावरण विभाग यांच्यामध्ये परस्परांत सहकार्य नसल्याचे दिसून येते असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

२.६६. सीआरईपीच्या निकषांचे तंतोतंत पालन करण्यासाठी साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून सदर समितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व मिटकॉन यांचा समिती सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. विभागीय सचिव समितीचे सदस्य असल्यामुळे विभागाकडे त्या समितीचा अहवाल आलाच असेल. सदरहू अहवालावर कोणती कार्यवाही केली ? या संबंधित माहिती समितीला द्यावी असे सांगितले असता सदरहू अहवाल विभागाकडे आलेला नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

२.६७. उक्त समिती ही साखर आयुक्त, यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व मिटकॉम यांच्या सदस्य म्हणून सदर समितीत समावेश आहे. त्यामुळे विभागाकडे सदर अहवाल प्राप्त झाला नाही हे विभागाचे म्हणणे योग्य नाही. असे अभिप्राय समितीने नोंदविले व त्याअनुषंगाने पुढे विचारणा केली की, सीआरईपीच्या निकषांचे तंतोतंत पालन करण्यासाठी ही समिती सन २००७ रोजी गठित केली होती. समिती गठित केल्यापासून आतापर्यंत कोणते निर्णय घेतले, किती साखर कारखान्याची तपासणी करण्यात आली याबाबत अहवाल विभागास प्राप्त झाला आहे का तसेच निकषांचे पालन न करणाऱ्या साखर कारखान्याकडून घेण्यात आलेली बँक गॅरन्टी जप्त करण्यात आली का याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. परंतु, कामकाज सुरू असलेल्या ठिकाणी नवनवीन तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने मूलभूत तत्त्व (गाईडलाईन) बनविण्याचे कामकाज सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.६८. उक्त नियुक्त करण्यात आलेल्या समितीमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कोण होते याची सुद्धा माहिती सदस्य सचिवांना असावयास पाहिजे. खरे तर, सदर साखर कारखाना संदर्भात गठित केलेल्या समितीच्या अहवालाबाबतची माहिती किंवा उक्त अहवाल लोकलेखा समितीच्या बैठकीकरिता विभागाने आणावयास पाहिजे परंतु विभागाने उक्त अहवाल लोकलेखा समितीच्या बैठकीत आणला नसल्यामुळे समितीचे कामकाज पूर्ण होऊ शकले नाही व लोकलेखा समितीचा बैठक घेण्याचा उद्देश सफल होत नाही अशी खंत समितीने व्यक्त केली असता यावर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की, सदर समितीची कार्यकक्षा स्पेन्ट वॉशची विल्हेवाट कशी लावावी, याकरिता काही मार्ग सूचविण्यात आले आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सदर समितीने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे की नाही, याची पाहणी नियंत्रण मंडळ करीत असते.

२.६९. आतापर्यंत सदर समितीच्या एकूण किती बैठका झाल्या, त्या बैठकांचे निष्कर्ष काय आहेत समितीच्या शिफारशींची किंवा निर्णयाची अंमलबजावणी झाली की नाही ? याबाबतची माहिती तसेच समितीने तयार केलेल्या अहवालाच्या प्रती समितीस देण्यात याव्या असे निदेश समितीने दिले असता, विभागाकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती व अहवाल प्राप्त झाला नाही परंतु सदस्य सचिव यांनी सांगितले की, सीआरईपी च्या मूलभूत तत्त्वानुसार (गाईडलाईन्स) स्पेंटवॉशची विल्हेवाट लावण्याकरिता ३ मार्ग सूचविले आहेत. सीआरईपीच्या मूलभूत तत्त्वावर (गाईडलाईन्स) विचार केल्याशिवाय या समितीच्या अहवालाला तसा काहीच अर्थ राहत नाही. सहकारी साखर कारखान्यातील स्पेन्ट वॉशचा विलंब कशा पद्धतीने करावा, याकरिता उपाय सूचविले आहेत. स्पेंट वॉशची निर्मिती कमी करण्यासाठी रि-बॉयलिंग वापरून बाष्पीभवन करणे, स्पेंट वॉशची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने लावून, यामध्ये कंपोस्ट करून विल्हेवाट लावणे, कॉंक्रिट टँक तयार करून स्पेंट वॉशची विल्हेवाट लावणे यापैकी कोणत्याही एका उपायाचा अवलंब करून शास्त्रशुद्ध पद्धतीने स्पेन्ट वॉशची विल्हेवाट लावता येते.

२.७०. केवळ उपाययोजना सूचविणे एवढेच साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे काम नाही. सीआरईपीच्या मूलभूत तत्त्वांचे (गाईडलाईन्स) तंतोतंत पालन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ३१ डिसेंबर ही तारीख सर्व कारखान्यांना दिली होती. सीआरईपीच्या निकषांचे तंतोतंत पालन करण्यासाठी शासनाने खास सवलत दिनांक १६ ऑक्टोबर २००७ रोजी दिली होती. मानांकनांचे योग्य प्रकारे पालन होते की नाही, याची तपासणी करण्याचे काम देखील या समितीचे आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व विचारणा केली की कारखान्याचे काम सुरू असताना प्रदूषणाच्या दृष्टीने काही अनियमितता घडत असल्यामुळे कारखान्यांचे काम योग्य प्रकारे सुरू आहे की नाही, हे पाहण्यासाठी साखर कारखान्याच्या भेटी देणे आवश्यक असते. तशा प्रकारच्या भेटी दिल्या जातात काय ? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही परंतु सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी यासंदर्भात उदाहरणदाखल माहिती दिली की, याबाबत समर्थ सहकारी साखर कारखाना, ता. अंबड, जि. जालना येथे संमती पत्र एमपीसीबीने दिले होते. या कारखान्याला सन २०१४ पर्यंत मुदत आहे. ३० कि.लि.प्रति दिन एवढी या कारखान्याची क्षमता आहे. ३० दिवस स्पेन्ट वॉश साठवता येईल एवढया क्षमतेचे कॉंक्रीटचे तळे तयार केले आहे. २ लाख रुपयांची

बँक गॅरंटी घेण्यात आलेली आहे. येथे काही कारखाने व ५९ डिस्लेरीज् आहेत. या प्रत्येक कारखान्याचे कोष्टक विभागाकडे तयार आहे. प्रत्येक वेळी त्यांचे कन्सेन्ट रिन्यू केले जाते. एखादी स्पेसिफिक तक्रार आल्यास त्या आधारे तपासणी केली जाते. कारखान्याने कोणती उपाययोजना केली व त्यामध्ये कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत काय, अशा प्रकारची यादी तयार केलेली आहे.

२.७१. परंतु उपरोक्त माहिती फिल्ड ऑफीसरांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे विभागाने घेतली असेल. साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नियुक्त केली होती, त्या समितीने काय काम केले, याबाबतची माहिती मात्र दिली जात नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, सदस्य सचिवांनी सांगितले की, महालेखाकार अहवालाच्या परिच्छेदामध्ये १० साखर कारखान्यांचा उल्लेख केला आहे. त्या कारखान्यांच्या संदर्भात माहिती आहे.

२.७२. समितीच्या सीआरईपीच्या मार्गदर्शी तत्त्वानुसार (गाईडलाइन्स) कोणत्या कारखान्यावर काय कारवाई करण्यात आली, याबाबत प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे की, महाराष्ट्रात एकूण मळीवर आधारित ८७ कारखाने असून त्यापैकी ६ कारखान्यामध्ये सीआरईपीच्या मार्गदर्शी तत्त्वाचे (गाईडलाइन्स) पूर्णतः पालन केले नाही व ५ कारखाने सद्यःस्थितीत बंद आहेत. अंशतः मार्गदर्शक तत्त्वाचे (गाईडलाइन्स) पालन करणाऱ्या ६ कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करून या मार्गदर्शी तत्त्वांचे (गाईडलाइन्स) पालन करण्यासंदर्भात बजावण्यात आलेले आहे. बंद असलेल्या ५ कारखान्याचे सीआरईपीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे (गाईडलाईन्स) पालन केल्यानंतरच चालू करण्याची परवानगी दिली जाईल.

२.७३. साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीचे कामाच्या स्वरुपाबद्दल प्राप्त झालेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेली समिती कायमस्वरुपी नसून फक्त प्रकल्प छाननी करून, शिफारशींसाठी होती. समितीने तयार केलेल्या अहवालाच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेल्या नाहीत. याबाबत साखर आयुक्त यांच्याकडे दिनांक १४ जुलै २०१२ रोजी मागणी करण्यात आलेली आहे.

२.७४. साखर आयुक्त यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर २००७ रोजी राज्यातील आसवनी प्रकल्पातील प्रदूषणाची शुन्य पातळी (Zero Discharge) स्थापित करण्यासाठी दिनांक ३१ ऑक्टोबर २००७ रोजीच्या बैठकीत वसंतदादा शुगर इंन्स्टिट्युट यांचे प्रतिनिधी, मिटकॉन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या प्रतिनिधीसह साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. सदरील समितीने प्रदूषणाची शुन्य पातळी करण्यासाठी व केंद्र शासनाच्या मागदर्शक तत्त्वांची (CREP Guidelines) पूर्तता करण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांनी महाराष्ट्रातील आसवन्यांचे प्रकल्प अहवाल तयार करावेत व तयार केलेल्या प्रकल्प अहवालावर मान्यता देऊन पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाबाबत मिटकॉन यांना मार्गदर्शन करण्यास सांगितले होते. त्यानुसार समितीने ३९ प्रकल्पांची छाननी करून शिफारस केल्यानुसार, साखर आयुक्तालयाने आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली होती.

२.७५. प्रदूषणाची शुन्य निकसन (Zero Discharge) करण्याचे निर्देश सीआरईपी या मार्गदर्शक तत्त्वानुसार मार्च, २००३ मध्ये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये मळीवर आधारित आसवन्यांतून निघणाऱ्या सांडपाण्यासाठी खालील पर्याय सुचविण्यात आले.

अ. कंपोस्ट तयार करण्यासाठी प्रेसमड/शेतातील कचरा / नागरी कचरा वापरावा.

ब. कॉन्सेट्रेशन अँड ड्राईंग / भस्मीकरण

क. स्पेंट वॉश ची प्रक्रिया बायोमिथेनायझेशनद्वारे करून त्यानंतर दोन स्तरावर प्रक्रिया करणे व प्रक्रियायुक्त सांडपाणी प्रक्रिया केलेल्या पाण्याबरोबर मिसळून शेतीसाठी जमिनीवर विल्हेवाट लावण्याच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या मानकांप्रमाणे करणे.

ड. स्पेंट वॉशचे बायोमियेनायझेशन करून द्वितीय स्तरावरील प्रक्रिया केल्यावर बीओडी ५०० मिली पेक्षा कमी करणे व समुद्राच्या पाण्यात राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केलेल्या ठिकाणी विल्हेवाट लावणे, ज्यामध्ये समुद्राच्या पाण्यामधील प्राणवायूचे प्रमाण ४ पेक्षा कमी होऊ नये.

इ. स्पेंटवॉशची एक वेळ शेतीमध्ये नियंत्रित विल्हेवाट लावणे, ज्यासाठी अभ्यास करून निर्णय घेणे.

शुन्य निकसन करण्यासाठी खालीलप्रमाणे पथदर्शी आराखडा सुचविण्यात आला आहे.

५०% स्पेंटवॉश वापर मार्च, २००४ पर्यंत

७५% स्पेंटवॉश वापर मार्च, २००५ पर्यंत

१००% स्पेंटवॉश वापर डिसेंबर, २००५ पर्यंत

१००% स्पेंटवॉशचा वापराचे उद्दिष्ट साध्य करणे आणि लाईन्ड लगुनमध्ये साठविलेले स्पेंटवॉश पावसाळ्यात नियंत्रित पद्धतीने सोडणे, ज्यामध्ये नदयांच्या पाण्याचा रंग बदलता कामा नये. नवीन आसवन्या व जुन्या आसवन्यांचे आधुनिकीकरण करताना शुन्य निकसन करावे.

२.७६. साखर आयुक्तांनी प्रदूषण रोखण्याच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी समिती निर्माण केली होती. त्यानुसार ३९ प्रकल्पाच्या बाबतीत छाननी करून शिफारशी केल्या होत्या. सदर ३९ प्रकल्प कोणते व प्रकल्पांवर काय कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात एक कमिटी होती. साखर कारखाने अडचणीत असल्यामुळे त्यांना मदत करण्याची गरज होती. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संदर्भात मान्यता देण्यासाठी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या कमिटीचे पर्यवेक्षण (supervision) करण्याचे काम नाही. समितीने साखर कारखान्यांकडून प्रस्ताव घ्यावयाचे आणि ते प्रस्ताव वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमार्फत तपासून घ्यावयाचे. त्यांच्या प्रशासकीय आणि आर्थिक मान्यतेसाठी शिफारस करण्याचे काम समितीचे होते. सदरहू अहवालानुसार ४१ प्रकल्पाची छाननी करून मान्यता देण्यात आली होती.

२.७७. झिरो डिसचार्जसाठी ही कमिटी आहे. आजारी आणि तोट्यात चाललेले साखर कारखाने प्रदूषण करीत आहेत. त्यांना अर्थसहाय्य आणि मशिनरी बसविण्यासंदर्भात शिफारस करण्याचे काम सदर कमिटीचे होते. यासंदर्भात तांत्रिक मदत वसंतदादा टेक्निकल इन्स्टिट्यूटकडून घेतली. आयुक्तांनी आर्थिक आणि प्रशासकीय मान्यता दिल्याशिवाय त्यांना अर्थसहाय्य मिळत नाही. याकरिता ही कमिटी आहे ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व विभागास विचारणा केली की उक्त समितीने शिफारस केल्यानंतर झिरो डिसचार्जसाठी किती मदत केली यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भातील सर्व अभिलेखे साखर आयुक्तांकडे असून प्रदूषण विभागाचा एक प्रतिनिधी देखील त्यावेळी त्यांच्याबरोबर काम करीत होता. उक्त प्रकल्पांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

डॉ. बाबासाहेब तनपुरे सहकारी साखर कारखाना, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, २६०.१६ लक्ष.

श्री. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, जिल्हा सोलापूर, प्रकल्प खर्च, १५५.३७ लक्ष.

गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर, प्रकल्प खर्च, २११ लक्ष.

संगमनेर सहकारी साखर कारखाना, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, ३५६.०७ लक्ष.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, तालुका परळी, जिल्हा बीड, प्रकल्प खर्च, २०३.९२ लक्ष.

संजिवनी सहकारी साखर कारखाना, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, ९३७.८० लक्ष.

किसनवीर सहकारी साखर कारखाना, तालुका वाई, जिल्हा सातारा, प्रकल्प खर्च, १३३.१७ लक्ष.

सोनहीरा सहकारी साखर कारखाना, तालुका कडेगाव, जिल्हा सांगली, प्रकल्प खर्च, २३३.४९ लक्ष.

विकास सहकारी साखर कारखाना, जिल्हा लातूर, प्रकल्प खर्च, १५३.९० लक्ष.

पूर्णा सहकारी साखर कारखाना, बसमतनगर, जिल्हा हिंगोली, प्रकल्प खर्च, १७४.२६ लक्ष.

जयभवानी सहकारी साखर कारखाना, गेवराई, तालुका बीड, प्रकल्प खर्च, १७८.५४ लक्ष.

सह्याद्री सहकारी साखर कारखाना, तालुका कराड, जिल्हा सातारा, प्रकल्प खर्च, २८४.८४ लक्ष.

वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, जिल्हा सांगली, प्रकल्प खर्च, ४३०.५२ लक्ष.

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, जिल्हा सातारा, प्रकल्प खर्च, १९३.०५ लक्ष.

तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना, जिल्हा कोल्हापूर, प्रकल्प खर्च, २०३.९७ लक्ष.

सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, जिल्हा औरंगाबाद, प्रकल्प खर्च, १८९.४८ लक्ष.

अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, जिल्हा बीड, प्रकल्प खर्च, १९१.८६ लक्ष.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, कर्मवीर काकासाहेब सहकारी साखर कारखाना, भाडेतत्त्वावर चालविला जातो, जिल्हा नाशिक, प्रकल्प खर्च, ४४.११ लक्ष.

विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना, तालुका शिराळा, जिल्हा सांगली, प्रकल्प खर्च, ६१८.२१ लक्ष.

श्री. भोगावती सहकारी साखर कारखाना, जिल्हा कोल्हापूर, प्रकल्प खर्च, ११४.०२ लक्ष.

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना, जिल्हा सातारा प्रकल्प खर्च, ४५३.७८ लक्ष.

श्रीराम सहकारी साखर कारखाना, तालुका फलटण, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, ३१५.६३ लक्ष.

वसंतरावदादा पाटील सहकारी साखर कारखाना, जिल्हा नाशिक, प्रकल्प खर्च, ९६.८३ लक्ष.

मांजरा सहकारी साखर कारखाना, जिल्हा लातूर, प्रकल्प खर्च, १६८.७६ लक्ष.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना, तालुका अकलूज, जिल्हा सोलापूर, प्रकल्प खर्च, २७७.८० लक्ष.

समर्थ सहकारी साखर कारखाना, तालुका अंबड, जिल्हा जालना, प्रकल्प खर्च, २६१.४१ लक्ष.

विघ्नहर सहकारी साखर कारखाना, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, प्रकल्प खर्च, १२९.४५ लक्ष.

श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, १२२.४७ लक्ष.

श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, तालुका नेवासा, जिल्हा सोलापूर, प्रकल्प खर्च, २०० लक्ष.

शंकर सहकारी साखर कारखाना, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर, प्रकल्प खर्च, १६७.६७ लक्ष.

कोपरगाव सहकारी साखर कारखाना, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, २०२.५० लक्ष.

इंदापूर सहकारी साखर कारखाना, जिल्हा पुणे, प्रकल्प खर्च, २०८.४२ लक्ष.

मधुकर सहकारी साखर कारखाना, जिल्हा जळगाव, प्रकल्प खर्च, २०७.१८ लक्ष.

दौलत सहकारी साखर कारखाना, जिल्हा कोल्हापूर, प्रकल्प खर्च, १५०.८४ लक्ष.

राजाराम बापू सहकारी साखर कारखाना, जिल्हा सांगली, प्रकल्प खर्च, ९०१.५० लक्ष.

तेरणा सहकारी साखर कारखाना, जिल्हा उस्मानाबाद, प्रकल्प खर्च, ३३५.५५ लक्ष.

प.वि.विखे-पाटील सहकारी साखर कारखाना, जिल्हा अहमदनगर, प्रकल्प खर्च, ३८७.१८ लक्ष.

यशवंत सहकारी साखर कारखाना, जिल्हा पुणे, प्रकल्प खर्च, २२९.०१ लक्ष.

२.७८. एकूण प्रस्तावित खर्च १०१ कोटी ७० लाख ५३ हजार असून हा सर्व खर्च कारखान्यांना अनुदान दिलेले आहे. सदरहू कारखान्यांना मदतीच्या संदर्भात समितीने शिफारस केलेली आहे. या सर्व कारखान्यांना पर्यावरण पूरक तंत्रज्ञानासाठीच्या प्रस्तावित खर्चासाठी साखर आयुक्तालयाने आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. समितीने केलेल्या प्रत्येक प्रकल्पांची शिफारशींची तारीख वेगवेगळी आहे. सदरहू कालावधी हा ऑक्टोबर, २००७ पासून मार्च, २००८ पर्यंतचा आहे.

२.७९. सदरहू कारखाने प्रदूषणरहित आहेत की नाही अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्रात एकूण ८७ डिस्टिलिअरी आहेत. यापैकी ७७ डिस्टीलअरी या साधनसामुग्रीच्या तंत्रज्ञानाच्याबाबतीत परीपूर्ण आहेत. ५ पार्शली कंम्प्लाईड केलेले आहे तर ५ नॉन कंम्प्लाईड आहेत. अशा डिस्टीलरीकडून बँक गॅरंटी घेऊन त्यांना गाईडलाईन्सची पूर्तता करण्यास सांगण्यात आले आहे.

२.८०. हा उपरोक्त साखर कारखान्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे. विभागाने सन २००७-०८ मध्ये सदर साखर कारखान्यांच्या संदर्भात शिफारस केली होती. त्यानंतर प्रदूषण कमी होणे अपेक्षित आहे. या साखर कारखान्यांची तपासणी सन २०११ मध्ये करण्यात आली की सन २०१२ मध्ये करण्यात आली आणि आता प्रदूषणाची पातळी किती आहे तसेच किती कारखाने बंद पडलेले आहेत, किती कारखान्यांचे प्रदूषण कमी झाले व किती कारखान्यांना आर्थिक मदत मिळाली आणि त्यांची अडचण सुटलेली आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या साखर कारखान्यांपैकी वसंतदादा, दौलत आणि भोगावती या ३ साखर कारखान्यांनी विभागाने सुचविलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही. इतर सर्व साखर कारखान्यांनी विभागाने सुचविलेल्या सूचनांचे पालन केलेले आहे.

२.८१. पर्यावरण खाते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून अपेक्षित कार्यवाही होत नाही. यासंदर्भात लोकप्रतिनिधीसुद्धा अनेक वेळा प्रश्न उपस्थित करीत असतात. राज्यात सहकारी तत्त्वावर चालणारे कारखाने ११५ आहेत व खाजगी तत्त्वावर चालणारे त्याच्या निम्मे आहेत. सदर कारखान्यासंदर्भात काही तक्रार प्राप्त झाली किंवा तक्रार प्राप्त झाली नसतानाही पाहणी करण्याची यंत्रणा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आहे का ? पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे अधिकारी किती वेळा साखर कारखान्याला भेटी देतात. अशी विचारणा समितीने केली असता सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांनी सांगितले की, राज्यामध्ये एकूण १२ विभागीय अधिकारी आहेत. त्यांच्या खालोखाल उप प्रादेशिक अधिकारी हे प्रत्येक जिल्ह्यात आहेत. त्यांच्या हाताखाली २०० फिल्ड अधिकारी आहेत. तांत्रिक स्वरूपाचे ४०० कर्मचारी आहेत. पुणे,

कोल्हापूर अशा ठिकाणी हे विभागीय अधिकारी आहेत. सोलापूर, सांगली या ठिकाणी एसआरओ असून त्यांच्याकडे फिल्ड ऑफिसर्स, फिल्ड असिस्टंटस् आहेत, या कर्मचाऱ्यांकडून व अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी महानगरपालिकेच्या व कारखान्यांच्या सांडपाणी प्रक्रिया प्लॅन्टला भेट देऊन तपासणी करीत असतात. म्हणजेच उद्योगांची पाहणी ही त्या त्या विभागातील अधिकाऱ्यांमार्फत, प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी व क्षेत्र अधिकारी यांच्यातर्फे केली जाते. सर्व अटींची पूर्तता केल्यानंतर एखाद्या कारखान्याला प्रशासकीय मान्यता दिली जाते. मात्र मान्यता दिल्यानंतर देखील सदर कारखाना त्या अटींचे पालन करीत आहे किंवा नाही, याची देखील तपासणी झाली पाहिजे, अशी सूचना समितीने विभागास केली.

२.८२. आधुनिकीकरण (मॉडर्नायझेशन) व पर्यावरण प्रमानकाप्रमाणे (एनव्हायरनमेंट नॉर्म्स) विभागाकडून बदल करण्यात येते का अशी विचारणा केली असता, या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्व (गाईडलाईन्स) सन २००७ मध्ये आखण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणेच आतापर्यंत काम करण्यात आले आहे. सदर मार्गदर्शी तत्त्वामध्ये (गाईडलाइन्स) सुधारणा केल्या नसून गेल्या ५ वर्षांपासून त्याच मार्गदर्शी तत्त्वानुसार (गाईडलाइन्स) कार्यवाही करण्यात येत आहे.

२.८३. स्पष्टीकरकरणात्मक ज्ञापनात सासवड, माळीनगर या कारखान्याचे नाव आले आहे. हा सहकारी साखर कारखाना नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा सहकारी साखर कारखाना नाही. ही खाजगी कंपनी आहे. पूर्वी हा सहकारी साखर कारखाना म्हणून नोंदणीकृत झाला होता. ही सन १९६१ च्या पूर्वीची गोष्ट आहे. तेव्हा राज्य शासनाच्या धोरणात बदल झाला. शासनाने खाजगी उद्योजकांना कारखाने सहकारी तत्त्वावर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार हा साखर कारखाना सहकारी म्हणून नवीन कारखाना झाला. तो कारखाना खाजगी तत्त्वावर पूर्वी ३ वर्षे चालविला होता.

२.८४. साखर कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या मळीमुळे, नदीतील पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढले आहे. साखर कारखान्यांकडून प्रक्रिया न करता सांडपाणी नदीमध्ये सोडले जाते. पुणे जिल्ह्यात बहुतांश साखर कारखान्यांच्या आजुबाजूच्या नद्या प्रदुषित झालेल्या आहेत. सदर नद्यांवर पिण्याच्या पाण्याच्या विविध योजना आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांगितल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेकडून गेल्या अनेक वर्षांपासून प्लॅन बसविण्याच्या संबंधातील कार्यवाही सुरू आहे. साखर कारखान्यांना दंड करूनही प्रदूषणासारखा भयानक प्रश्न निर्माण होत आहे. या साखर कारखान्यांच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते किंवा कोणता निर्णय घेण्यात येतो कारण राज्यामध्ये असे अनेक कारखाने आहेत. हे सर्व कारखाने योग्य प्रक्रिया न करता सांडपाणी नदीमध्ये सोडून देतात. राज्यातील किती नद्यांमधील पाणी किती खराब झाले आहे, या संदर्भातील अहवाल विभागाकडे असेलच. सदर प्रकरणी नियंत्रण करण्याच्या संदर्भात विभागात कोणते काम सुरू आहे ? याबाबत विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, साखर कारखान्यातून मळी सोडण्यात येत नाही. तथापि सदरील मळी सुरक्षितरित्या स्टीलच्या टाक्यामध्ये साठविली जाते व मळीचा वापर करून आसवन्याद्वारे अल्कोहोलची निर्मिती केली जाते.

२.८५. कारखाने योग्य प्रक्रिया न करता सांडपाणी नदीत सोडून देतात याबाबत प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे म्हटले आहे की, साखर कारखाने हे शेतीसमृद्ध परिसरात असतात. कारखान्यामधून निर्माण होणारे सांडपाणी नदीत सोडण्यासाठी परवानगी दिली जात नाही. तथापि, कारखान्याचे प्रक्रिया केलेले सांडपाणी हे कारखान्याच्या आजुबाजुच्या परिसरात शेतीसाठी वापरले जाते. बहुतांश साखर कारखाने हे सप्टेंबर ते मार्च या कालावधीत चालू असतात व त्यावेळेस पिकांसाठी पाण्याची भरपूर मागणी असते. काही वेळेस कारखान्यांनी प्रक्रियायुक्त सांडपाणी व्यवस्थापन योग्य न केल्यास जमिनीवरील शेतीसाठी सोडलेले प्रक्रियायुक्त पाणी निचरा होऊन नदीत मिसळू शकते. असे घडू नये यासाठी कारखान्यास वारंवार बजावण्यात येते.

२.८६. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे किती कर्मचारी वृदांची आवश्यकता आहे व यासंदर्भात विभागाने काही मास्टर प्लॅन तयार केला आहे का कारण प्रदूषण रोखायचे असेल तर कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावयाची गरज असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सद्यःस्थितीत असणारा कर्मचारी वर्ग हा अतिशय अपुरा आहे. त्यामुळे नव्याने आणखी ५७० पदांच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे.

२.८७. या विभागाकडे किती कर्मचारी वृंद आहे याबाबत माहिती देताना असे सांगण्यात आले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे राज्यात १२ ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत. मंडळामध्ये एकूण मंजूर पदे ८४० असून त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी समाविष्ट आहेत. त्यापैकी एकूण ७०२ पदे भरलेली असून १३८ पदे रिक्त आहेत **(परिशिष्ट-७)**.

२.८८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून प्राप्त माहितीवरून असे दिसून येते की, मंडळाकडे महामंडळामध्ये ८४० मंजूर पदांपैकी फिल्ड ऑफीसर्स व प्रयोगशाळेतील कर्मचारी यांची किती पदे रिक्त आहेत व ती कोणत्या विभागातील आहेत. विभागाने सादर केलेल्या माहितीनुसारदि. ३० सप्टेंबर २०१२ पासून एकूण १३८ पदे रिक्त आहेत. क्षेत्र निरीक्षकांची २१ पदे रिक्त आहेत. याचे कारण काय आहे याबाबत खुलासा करताना पर्यावरण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये विभागाने शासनाकडे रोस्टर पाठविले होते. एकूण ४६ कॅडरच्या

संदर्भातील माहिती शासनाकडे पाठवली होती. शासनाकडून हे रोस्टर परत आल्यानंतर भरती प्रक्रिया सुरू केली जाईल. सध्या काही तांत्रिक कारणामुळे भरती प्रक्रिया थांबलेली आहे. रोस्टर आल्यानंतर साधारणपणे ३ महिन्यानंतर भरती सुरू होईल परंतु पदे केव्हापासून रिक्त होती याबाबतची माहिती विभागीय सचिवांना देता आली नाही.

२.८९. उक्त पदे बऱ्याच कालावधीपासून रिक्त होती परंतु लोकलेखा समितीने पाठपुरावा केल्यामुळे सदरहू पदे आता भरली गेली आहेत. रोस्टर क्लिअर झाल्यानंतर लवकरात लवकर भरती प्रक्रिया सुरू करावी तसेच १२ वर्षे रोस्टर न तपासल्यामुळे भरती प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होणे, ही बाब अतिशय गंभीर आहे. रोस्टरच्या संदर्भात फिड पॉईंट करण्याची गरज आहे. रोस्टर व्यवस्थित न ठेवल्यामुळे गरजू उमेद्वारांवर अन्याय झालेला आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी रोस्टर सुस्पष्ट ठेवले पाहिजे. नियमित पदे भरताना रोस्टर पूर्ण असले पाहिजे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले मागील वर्षी रोस्टर मंजूर झाले नव्हते. यामुळे भरती प्रक्रियेमध्ये अडचण निर्माण झाली होती. यापुढे ती कार्यवाही पूर्ण करून घेतली जाईल. तसेच मागासवर्गीय आयोगसुद्धा पाहणीकरिता आले होते. त्यांनी शासनाकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर पदे भरावी अशी सूचना विभागास केली होती.

२.९०. प्रत्येक महसूल विभागाच्या मुख्यालयात सहायक आयुक्त मागासवर्ग कक्ष स्वतंत्रपणे निर्माण केलेला आहे. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानुसार प्रत्येक कार्यालयाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या संदर्भातील रोस्टर तपासण्यासाठी व त्यातील त्रुटीच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी सहायक आयुक्त मागासवर्ग कक्षाला पत्र पाठविण्याची गरज आहे. यास्तव संबंधित अधिकाऱ्यांनी सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याशी पत्रव्यवहार करून भरती प्रक्रियेच्या संदर्भातील रोस्टर तपासणीबाबत विनंती करावी. त्यानुसार ते पुढील कार्यवाही करतील अशी सूचना समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

२.९१. सदर भरती प्रक्रिया ही सन २००१ मध्ये केलेली नसून ती सन २००७ मध्ये केलेली आहे. रोस्टरप्रमाणे भरती प्रक्रिया पार पाडलेली नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००७ मधील भरती प्रक्रिया ही आरक्षणाप्रमाणे करण्यात आलेली आहे. सन २००१ मधील एकूण ४६ कॅडर बद्दलची माहिती देणार आहे. यामध्ये फिल्ड ऑफिसरची पदे भरण्यात आली होती. सन २००७ मध्ये एकाच कॅडरची भरती केली असून ते क्षेत्रीय अधिकाऱ्याचे कॅडर आहे.

२.९२. संपूर्ण भरती प्रक्रियेमध्ये उणिवा राहू नयेत यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर सर्व बाबी तपासून घेण्याची गरज आहे.सन २००१ पासून रोस्टर अद्ययावत केलेले नाही, त्या काळातील संबंधित अधिकाऱ्यांनी रोस्टर अद्ययावत करण्यासाठी पुढाकार घेतला किंवा नाही याची विभागीय सचिवांना जाण असली पाहिजे. यासर्व बाबी कागदावर आल्या पाहिजेत. जर रोस्टर पॉईंट सुस्पष्ट करून भरती केली असती तर अपंग, व्हिजेएनटी, अनुकंपातील उमेद्वारांना न्याय मिळाला असता असे अभिप्राय समितीने नोंदविले व वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ मधील रिक्त पदे आणि मागील काळात झालेल्या भरतीच्या संदर्भातील रोस्टर पॉईंट किती सुस्पष्ट केले, त्याचा अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश दिले. तसेच प्रदूषण करणाऱ्या आस्थापनांवर आतापर्यंत कोणती कारवाई केली व ही कारवाई करण्यासंबंधी ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्यांच्यावर काय कारवाई केली कारण यंत्रणेमधील काही अधिकारी बेफिकीरपणे वागतात अशांवर कारवाई करणे गरजेचे आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.९३. आतापर्यंत सीआरपीच्या गाईडलाईन्सचे पालन न करणाऱ्या कारखान्यांवर केलेल्या कारवाईच्या संदर्भात सदस्य सचिव यांनी सांगितले की, समितीचे काम हे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना निश्चित करण्याचे होते व सदर उपायांचे पालन होते की नाही हे पाहण्याचे काम प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण ८७ आसवन्या असून त्यापैकी ७७ आसवन्या सीआरपीईपीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करतात व ०५ आसवन्या अंशतः पालन करतात. तसेच ०५ आसवन्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करीत नाहीत. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या ०५ आसवन्या सद्यःस्थितीत बंद आहेत.

२.९४. कोल्हापूर महानगरपालिकेला प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत गेल्या ३ वर्षांमध्ये १४० नोटीसेस पाठविण्यात आल्या असून ४ फौजदारी गुन्हे देखील दाखल केले आहेत. तसेच इचलकरंजी व पुणे महापालिकेवर देखील फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. सध्या प्रत्येक महापालिका व नगरपालिकेमध्ये प्रदूषणाच्या संदर्भात अशाचप्रकारची परिस्थिती आहे. कोल्हापूर महापालिकेतील ५० टक्के सांडपाणी पंचगंगा नदीमध्ये सोडले जाते.

२.९५. प्रदूषण मंडळाने रायगड, महाड येथील औद्योगिक क्षेत्रामधील १५ कारखाने बंद केले होते. त्यांची बँक गॅरंटी जप्त केली असून काही कारखान्यांवर कारवाई सुरू आहे. याबाबतची विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे **(परिशिष्ट-८)**.

२.९६. लोटे परशुराम (जि.रत्नागिरी) येथील एम.आय.डी.सी. मधील रासायनिक कारखान्यातून रसायन मिश्रीत सांडपाणी सावित्री नदीत मोठ्या प्रमाणात सोडले जाते व तेच पाणी गुरांना प्यावे लागते, त्यामुळे जनावरे मोठया प्रमाणात मृत्युमुखी पडतात. रसासन मिश्रीत सांडपाणी नदी पात्रात सोडणाऱ्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण मंडळातर्फे करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईच्या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की,

तेथे कॉमन ट्रिटमेंट प्लँट विभागाची कोर्टात केस सुरू आहे. प्रत्येक महिन्याला सर्वात जास्त प्रदूषण निर्माण करणाऱ्या १० कारखान्यांवर कारवाई केली जाते. कारखान्यांकडून होत असलेल्या प्रदूषणाची पातळी बघून त्यांची बँक गॅरंटी जप्त केली जाते. विभागाने काही ठिकाणी उद्योग बंद करण्याचे आदेश सुद्धा दिलेले आहेत. बँक गॅरंटी जप्त केल्यानंतर त्यांची सुनावणी घेऊन त्यांनी कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहेत याबाबतची माहिती संबंधित कारखान्याला दिली जाते. त्यांनी जर त्या सूचनांचे पालन केले नाही तर संबंधित कारखान्याला कारखाना बंद करण्याचे आदेश दिले जातात. लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणकारी कारखानाबाबतची कार्यवाहीची माहिती प्राप्त झाली आहे (**परिशिष्ट ९**).

२.९७. पुणे-चिंचवड महापालिका हद्दीमधील कोणत्या कारखान्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई केली आहे, तसेच हे कारखाने सीआरईपीच्या नियमावलींचे योग्य प्रकारे पालन करतात की नाही, याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे महापालिकेवर फौजदारी कारवाई केली असून सदर कारवाईमध्ये कोणालाही अटक झालेली नाही.

२.९८. पुणे महापालिकेने प्रदूषण रोखण्यासाठी ७९७ कोटी रुपयांचा एक मोठा प्रोजेक्ट तयार केला असून तो केंद्र शासनासमोर सादर करण्यात आला आहे. याकरिता ३०-७० या प्रमाणात वित्तीय सहाय्य दिले जाणार आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यास पुणे शहरातील प्रदूषणाच्या संदर्भातील बऱ्याच अडचणी सुटू शकतील. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सुद्धा प्रस्ताव दिलेला असून, त्यामध्ये काही त्रुटी आहेत. तसेच इचलकरंजी नगरपरिषदेने सुद्धा प्रस्ताव दिलेला आहे. कोल्हापूर महानगरपालिकेने दिलेल्या प्रस्तावात ८० कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केलेली आहे. त्यांच्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे.

२.९९. पद्मजा पेपर मिल संदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, पद्मजी पल्प अँड पेपर मिल या कारखान्याला दर दिवशी ५२९६ घन मिटर पाणीपुरवठा केला जातो. यापैकी ८६५ घन मिटर पाणी प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येतो.

२.१००. पवना नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता सर्वसाधारणपणे संमतीपत्रामध्ये नमूद केलेल्या विहित मर्यादेत दिसून येते.

२.१०१. पर्यावरण आघात मूल्यांकन, १९९४ च्या अधिनियमामध्ये दिनांक ७ जुलै २००४ रोजीच्या सुधारणेनुसार बांधकाम उद्योगांस पर्यावरणीय अनुमती घेणे बंधनकारक करण्यात आले. त्यानंतर पर्यावरण आघात मूल्यांकन २००६ मध्ये २०००० चौ.मीटर अथवा जास्त बांधकाम करणाऱ्यांना पर्यावरणीय अनुमती घेणे बंधनकारक केले. त्यानुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व नगररचना कार्यालय अनुमती देताना पर्यावरणीय अनुमती घेतली किंवा कसे याबाबतची शहानिशा करून मान्यता देतात. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे अनुमती लागू असलेल्या बांधकाम उद्योजकाने सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा व्यवस्थापन केल्याबाबतची शहानिशा करून संमतीपत्र प्रदान करण्यात येते.

२.१०२. ठाणे व मुंबई परिसरामध्ये अनेक ठिकाणी नियमावलींचा विचार न करता इमारती बांधण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता शहरी भागात इमारत बांधकामास परवानगी देताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरणीय अनुमती लागू असलेल्या बांधकाम उद्योजकाने सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा व्यवस्थापन केल्याबाबतची शहानिशा करून संमतीपत्र प्रदान करण्यात येते.असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

२.१०३. इचलकरंजी तालुक्यात नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात कावीळीची साथ पसरलेली आहे. या साथीमुळे बरेच रुग्ण मृत्युमुखी पडलेले आहेत. अजूनही तेथील कावीळीची साथ आटोक्यात आलेली नाही. या साथीमुळे जे रुग्ण मृत्युमुखी त्या प्रत्येक मृताच्या कुटुंबाला १ लाख रुपयाची मदत शासनातर्फे दिली जाते. परंतु याप्रकरणी अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या गोष्टीकडे जाणवपूर्वक दुर्लक्ष केले आहे त्यांच्याविरुद्ध कारवाई केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, इजलकरंजी नगरपालिकेने कावीळ साथीच्या अनुषंगाने एकूण ९ फेऱ्यांमध्ये सर्वेक्षण केले असता एकूण ५३३० कावीळ बाधित रुग्ण आढळून आले. त्यापैकी २३०३ इतक्या कावीळ बाधित रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यापैकी २१३५ बरे होऊन घरी गेले व इतर रुग्णांवर विविध रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

२.१०४. कोल्हापूर येथील काविळीच्या साथीसंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार इचलकरंजी शहरामध्ये काविळीची साथ ही मुख्यत्त्वे करून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये मैला मिश्रीत दूषित पाणी तसेच अशुद्ध पाणीपुरवठा, दाब नलिकेमध्ये असणाऱ्या गळती, शुद्ध पाणीपुरवठा दाब नलिकेमध्ये गळती, शहरातील वितरण नलिकेमध्ये असणाऱ्या गळती तसेच अनियमित पाणी शुद्धीकरण या घटकांमुळे निर्माण झालेली आहे.

२.१०५. कावीळ साथीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने इचलकरंजी नगरपालिकेविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच कोल्हापूर महानगरपालिकेवर दिनांक ११/७/२०१२ रोजी कायदेशीर खटला दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे. यामध्ये जबाबदार असणाऱ्या महानगरपालिका आणि नगरपरिषदांना नोटीसेस पाठविलेल्या आहेत. यावर यामध्ये फक्त नोटीसा बजावून काहीच साध्य होणार नाही. प्रदूषण होऊ नये म्हणून विभागाने योग्य त्या उपाययोजना आखण्याची गरज आहे अशी सूचना समितीने विभागास केली.

२.१०६. कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत केल्या जात असलेल्या उपाय योजनेसंबंधी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दर महिन्याला मॉनिटरींग सुरू आहे. याबाबत मागील वर्षी ऑगस्ट, २०१२ मध्ये आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर दर महिन्याला बसून त्यांच्यामार्फत मॉनिटरींग सुरू केले आहे. महानगरपालिकेकडून कोणकोणती उपाययोजना केली जात आहे याची माहिती घेऊन विभाग दर महिन्याला अहवाल घेत असतो. त्याचप्रमाणे कोल्हापूरमधील दुधारी आणि जयंती नाला या ठिकाणी होत असलेल्या प्रदूषणाबाबत त्यांनी कारवाई सुरू केली आहे. त्यामध्ये सिव्हरेज कलेक्शन सिस्टीम आणि कसबाबावडा येथे असलेल्या नदीवर नवीन एस.टी.पी. बांधण्याचे काम सुरू केले आहे. सदरचे काम मार्च, २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्याशिवाय त्या ठिकाणी १२ नाले आहेत त्यामधून डिसचार्ज स्टॉप करण्यासाठी कोणकोणती उपाय योजना केली आहे याची माहिती घेतली आहे.

२.१०७. त्याशिवाय जिल्हा परिषदेमध्ये ३४ मोठ-मोठी गावे आहेत त्या ठिकाणी सिव्हरेज कलेक्शन करणे, सर्व्हेक्षण करणे यासाठी एक एजन्सी नेमली आहे. तरीसुद्धा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ दर महिन्याला आयुक्तांकडून अहवाल घेत असते. कोल्हापूर व नाशिक या दोन्ही जिल्ह्यांमध्ये प्राधान्याने काम हाती घेतले आहे.

२.१०८. इचलकरंजी शहरातील ५ टेक्सटाईल इंडस्ट्रीज बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी एस.टी.पी. व्यवस्थितपणे न बसविल्यामुळे कारखाने बंद केले आहेत काय? या कारखान्यांच्या सद्यस्थिती बाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्यावेळी कोल्हापूर शहरामध्ये काविळीची साथ आली होती त्यावेळी पाणी जास्त प्रमाणात प्रदूषित होत होते. प्रयोगशाळेमध्ये पाण्याच्या नमुन्याची तपासणी केल्यानंतर प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवालानुसार प्रदूषण सांडपाण्यामुळे होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे सर्व इंडस्ट्रीजमध्ये जाऊन त्यांची तपासणी केली. त्यावेळी त्यांच्याकडे बसविण्यात आलेल्या प्रदूषण नियंत्रण सिस्टीममध्ये त्रुटी आढळून आल्या. म्हणून त्या काळात आपण त्या इंडस्ट्रीज बंद ठेवल्या होत्या. आजच्या सद्यस्थितीमध्ये त्या इंडस्ट्रीज चालू आहेत.

२.१०९. केंद्र शासनाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासंबंधी व प्रदूषण नियंत्रण रोखण्यासंबंधी डॉ.माधवराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने या विषयाचा अभ्यास करून अहवाल तयार केलेला आहे. परंतु त्या समितीचा अहवाल केंद्र सरकार सादर करून घेत नाही. डॉ.माधवराव गाडगीळ समिती केंद्र शासनास सांगते आहे की, वाटल्यास हा अहवाल तुम्ही नाकारा. परंतु, गाडगीळ समितीने जो अहवाल तयार केला आहे तो अहवाल आपण सादर करून घ्यावा. परंतु, केंद्र सरकार अद्याप अहवाल सादर करून घेत नाही, ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे. केंद्रात जशी परिस्थिती आहे, तशीच परिस्थिती महाराष्ट्र शासनाची देखील आहे. सदर समितीचा अहवाल केंद्र शासनाने सादर करून घ्यावा याबाबतीत राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून कोणते प्रयत्न केले जाणार आहेत याबाबत असे नमूद केले आहे की, माधवराव गाडगीळ समितीचा अहवाल केंद्र शासनाच्या सांगण्यावरून बनविण्यात आला व तो केंद्रास सादर झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने आपले अभिप्राय केंद्र शासनास वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत कळविलेले आहेत.

२.११०. मुळा-मुठा नदीचे प्रदूषण प्रतिबंध करण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत दिनांक २१ मे २०१२ रोजी मुळा-मुठा नदी प्रदूषण प्रतिबंध करण्यासाठी प्रकल्प अहवाल केंद्रीय वने व पर्यावरण विभागाच्या राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालय, नवी दिल्ली यांना मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. तथापि, त्यासंदर्भात अधिक माहिती केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण संचालनालयाच्या कार्यालयाने दिनांक २२/६/२०१२ रोजी मागविलेली आहे ज्यामध्ये शहराचा सांडपाणी संकलन व भुयारी गटार योजनेचा आराखडा, त्यावर आधारित सांडपाणी प्रक्रिया यंत्रणांचे प्रकल्प अहवाल व सदरील यंत्रणा चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अखंडीत निधीची तरतूद याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे. त्याबाबत पूर्तता करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

२.१११. या अनुषंगाने समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, पुणे जिल्ह्यात पवना नदी, इंद्रायणी नदी, मुळा-मुठा नद्यांची अवस्था गटारगंगेपेक्षा वाईट झालेली आहे. त्यांना नदी म्हणावी कां हाच सर्वसामान्यांना प्रश्न पडतो ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागाने सांगितले की, महाराष्ट्रामध्ये एकूण असलेली प्रदूषणाची टक्केवारी पाहता त्यामध्ये ८० टक्के प्रदूषण हे नागरीकरणामुळे होते. सर्व महानगरपालिकांची सिव्हरेज कॅपॅसिटी अतिशय कमी आहे. त्यामुळे सर्व दूषित पाणी नदीमध्ये सोडले जाते.

२.११२. परंतु पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये १०० टक्के योजना कार्यान्वित आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये नागरीकरण झाले असले तरी नदीमध्ये पाणी सोडले जात नाही त्या ठिकाणी प्रदूषण होत नाही असे समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्या संदर्भातील अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. साधारणपणे ८० टक्के प्रदूषण नागरीकरणामुळे होते. यामध्ये मुख्य अडचण अशी आहे की, महानगरपालिकेकडून सॉलिड वेस्टची विल्हेवाट लावली जात नाही. पावसाळयामध्ये ते सर्व वाहून नदीच्या पाण्यामध्ये येते. त्याचप्रमाणे इंडस्ट्रियल एरीयामध्ये सुद्धा प्रदूषण आहे. परंतु त्यांच्यावर कारवाई करण्यास आम्हाला मुभा असते. त्यामधून आम्ही इंडस्ट्रीज बंद करण्याबाबत कारवाई करतो. परंतु महानगरपालिका, नगरपालिका यांच्यावर कारवाई करण्यामध्ये विभागाला मर्यादा येतात. त्यामुळे त्याबाबत नेमकी कोणती भूमिका घ्यावी असा प्रश्न पडतो. तरीसुद्धा विभागाकडून सतत पाठपुरावा करीत असतो. पुणे व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांतील नदीच्या पाण्यामध्ये मोठया प्रमाणात प्रदूषण आहे. परंतु ती बाब गंभीरपणे लक्षात घेतली जात नाही.

२.११३. नागरीकरणामुळे प्रदूषण होते त्याबाबत उपाय योजना करण्याकरिता केंद्र शासनाकडून महानगरपालिकांना मोठया प्रमाणात अनुदान मिळते. त्यामधून किती नगरपालिका व महानगरपालिकांनी एस.टी.पी. बसविले आहेत? ज्या महानगरपालिकांनी एस.टी.पी.बसविले नसतील त्यांना केंद्र शासनाने अनुदान देऊ नये. बसविण्यात आलेल्या एस.टी.पी. पैकी किती कार्यान्वित झाले आहेत त्या संदर्भात विभागाकडे अहवाल तयार असेलच. त्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नगर विकास विभागाला कळविले आहे काय? त्याबाबत संबंधित जिल्ह्यातील नगरपालिका व महानगरपालिकांकडून विनिर्दिष्ट माहिती आली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, संपूर्ण राज्याचा सदरहू अहवाल तयार केला आहे. त्यामध्ये नगरपालिका व महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये काय परिस्थिती आहे, याबाबत संपूर्ण माहिती दिली आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या २० टक्के नद्यांमध्ये जास्त प्रदूषण आहे त्या आयडेंटिफाय केल्या आहेत. या २० टक्के असलेल्या नद्यांच्या क्षेत्रामध्ये ८ महानगरपालिका व ४४ नगरपालिका आहेत. त्याबाबत देखील विभागाने शासनाला कळविले आहे की, या नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाने कॅपिटल दिले तर नदीमधील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. या बाबत मागील वर्षी शासनास अहवाल सादर केला असून त्यामध्ये एम.जे.पी. आणि नगरविकास विभाग यांना कारवाई करण्यास कळविले आहे. हा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

२.११४. मुळा-मुठा नदीमध्ये ४५० एम.एल.डी. इतके सांडपाणी जनरेट होते. त्याठिकाणी ५३५ एम.एल.डी. इतकी कॅपॅसिटी आहे. तसेच,त्या ठिकाणी जुन्या असलेल्या एस.टी.पी. चे नूतनीकरण करण्यात येत आहे. पिंपरीला आणि सांगलीला एस.टी.पी. बसवावयाचे आहेत त्याकरिता केंद्र शासनाकडून मदत मागितली आहे. परंतु, पुणे महानगरपालिकेचे एस.टी.पी. हे अंडर कंस्ट्रक्शन आहे. फौजदारी कारवाई केल्यामुळे जुने एस.टी.पी. चे नूतनीकरण केले असल्याची बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. त्यामध्ये खराडी येथे ४० एम.एल.डी. चे काम चालू केले आहे. परंतु पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये चिखली आणि फसाळे या दोन ठिकाणी काम चालू आहे.

२.११५. अनेक साखर कारखाने वीज निर्मिती करतात. किती साखर कारखान्यांनी वीज निर्मिती करताना कार्बन फ्री वीज उत्पादनाची अंमलबजावणी केलेली आहे ? काही साखर कारखाने कोळशाचा वापर करून वीज निर्मिती करतात. त्यामुळे प्रदूषणाच्या पातळीत वाढ होते. ३९ साखर कारखान्यांपैकी बंद पडलेले ३ साखर कारखाने वजा करता ३६ साखर कारखाने वीज निर्मिती करतात काय आणि हे साखर कारखाने जर वीज निर्मिती करीत असतील तर ते कोळशावर आधारित वीज निर्मिती करतात की कोळसा विरहीत वीज निर्मिती करतात ? कोळशाचा वापर करून वीज निर्मिती केली जात असेल तर त्यामुळे प्रदूषणाच्या पातळीत वाढ होत असल्यामुळे विभागाने त्या कारखान्यांवर कारवाई केलेली आहे काय याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ढोबळमानाने सांगायचे झाले तर ८० टक्के साखर कारखाने स्वतःचे मटेरियल वापरून वीज निर्मिती करतात आणि २० टक्के साखर कारखाने कोळशाचा वापर करून वीज निर्मिती करतात. परंतु, याबाबतची सविस्तर माहिती समितीस नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले परंतु अद्याप समितीस माहिती उपलब्ध झाली नाही.

२.११६. भुसावळ थर्मल पॉवर स्टेशन येथे मोठया प्रमाणात प्रदूषण होते. अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा कारवाई केली जात नाही याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील प्रदूषित पाण्यामुळे ४ महिला मृत्यूमुखी पडल्या. यासंदर्भात तालुका आरोग्य अधिकारी, भुसावळ यांनी पाठवलेल्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, ४ पैकी २ महिला अतिसाराने मृत्यूमुखी पडल्या असून उर्वरित महिला अन्य कारणामुळे दगावल्या आहेत. सदर कालावधीमध्ये विहिरीवरील मोटार पंप बंद पडल्यामुळे पाण्याचे शुद्धीकरण होऊ शकले नाही. यामुळे पाण्याचे प्रदूषण झाले होते. दिपनगर हे गाव स्टेशनपासून ४ ते ५ किमी. अंतरावर आहे.

२.११७. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, सदर गाव मेन रोड पासून आत ४ ते ५ कि.मी. अंतरावर असून येथे विस्तारीकरण झालेले आहे. प्रत्यक्षात हे गाव स्टेशनपासून अधिक लांब नाही. मयत झालेल्या व्यक्तींच्या संदर्भात जी माहिती विभागाने दिली आहे त्याचे प्रत्यक्षात स्वरूप निराळे आहे.तेथे खूप मोठया प्रमाणात प्रदूषण आहे. याबाबत अनेकदा वर्तमानपत्रामध्ये बातम्या छापून येतात. औद्योगिक केंद्रामधील प्रदूषित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता नदीमध्ये सोडले जाते. कागदावर झाडे लावल्याचे दाखविले जाते. मात्र प्रत्यक्षात तेथे झाडे लावली जात नाहीत. आज गुगल अर्थ व इतर सर्व इंजिनचा वापर करून प्रत्यक्षात किती झाडे लावली आहेत, हे पाहता येते. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई का केली जात नाही याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, भुसावळ, परळी येथील औष्णिक वीज केंद्राच्या संदर्भात बैठक होते. त्यावेळी विभागाने त्यांना प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजना करून घेण्यास सांगितले. मात्र त्यांनी यास आर्थिक कारणामुळे असमर्थता दर्शवली.

प्लांट जुने असल्यामुळे अपग्रेडेशनसाठी वेळ लागणार असून सन २०१४ पर्यंत अपग्रेडेशन केले जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. नवीन प्लांट हा शासकीय असून सन २०१४ पर्यंत अपग्रेडेशन करण्याची मुदत वाढवून देण्यात आली आहे.

२.११८. प्रदूषण मंडळाच्या प्रयोगशाळा कोठे आहेत तसेच त्या अद्ययावत व त्यांचे संगणकीकरण करण्यात आले आहे काय याबाबतची माहिती देताना विभागिय सचिवांनी सांगितले की, एकूण आठ ठिकाणी प्रयोगशाळा त्यापैकी एक केंद्रीय प्रयोगशाळा नवी मुंबईमध्ये महापे येथे आहे. त्याशिवाय स्थानिक पातळीवर अजून ७ प्रयोगशाळा आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पुणे, नागपूर, औरंगाबाद, ठाणे, चिपळूण, नाशिक व चंद्रपूर या ठिकाणी प्रयोगशाळा आहेत. विभागाकडे सब प्रयोगशाळा आहेत त्यांना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता आहे. मागील दोन ते तीन वर्षांमध्ये सर्वप्रकारचे आधुनिकीकरण केले असून काही ठिकाणी आधुनिकीकरणाचे काम प्रोसेसमध्ये असल्यामुळे त्या ठिकाणी नमुने (सँपल) तपासण्यामध्ये अडचण आहे. चंद्रपूरमध्ये नवीन प्रयोगशाळा सुरू केली असून त्यासाठी शासनाकडे पदे भरण्याबाबत प्रस्ताव दाखल केला आहे. त्याचप्रमाणे चिपळूण येथे नवीन प्रयोगशाळा सुरू करण्यात आली असून त्या ठिकाणी विभागाला कर्मचाऱ्यांची अडचण आहे.

२.११९. चंद्रपूर व नागपूर येथे असलेल्या दोन्ही प्रयोगशाळा पूर्व विदर्भामध्ये आहेत. परंतु पश्चिम विदर्भामध्ये खामगाव, अमरावती, अकोला या ठिकाणी एमआयडीसी असून त्या ठिकाणी एकही प्रयोगशाळा नाही. प्रदूषणासंबंधी कोणतीही समस्या उदभवल्यानंतर पश्चिम विदर्भातील लोकांना नागपूरला जावे लागते. अमरावती हा औद्योगिक विभाग असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन प्रयोगशाळा प्रस्तावित आहे का अशी विचारणा समितीने केली विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षी चंद्रपूर व चिपळूण येथे आपण नवीन प्रयोगशाळा सुरू केली असून सद्या तरी नवीन प्रस्तावित प्रयोगशाळा शासनाच्या विचाराधीन नाही. यावर पश्चिम विदर्भामध्ये पाच ते सहा एमआयडीसी आहेत. त्या ठिकाणी नेहमी प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतात त्यासाठी आपण त्या ठिकाणी नवीन प्रयोगशाळा सुरू केली पाहिजे अशी सूचना समितीने विभागास केली.

२.१२०. एखाद्या कारखान्याने प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना करण्यासाठी निधी नसल्याचे सांगितल्यास महामंडळाकडून त्यांना ५ ते १० वर्षांची मुदत वाढवून दिली जाते. मधला मार्ग म्हणून मुदत वाढवून दिली जाते. परंतु कायद्यानुसार हे कारखाने बंद करावे लागतील. केंद्रीय हवा कायदा व केंद्रीय पाणी कायदा हे दोन प्रमुख कायदे आहेत. सध्याचे बरेचसे कारखाने जुने झालेले आहेत. सध्याचे पॉवर प्लांट लगेच बंद करता येणार नाहीत. पॉवर प्लांट सुरू करण्यापूर्वी पर्यावरण विभागाची मान्यता आवश्यक असते. त्याचवेळी सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यास नंतर फारसे प्रश्न उद्‌भवणार नाहीत अशी सूचना समितीने विभागीय सचिवांना केली.

२.१२१. महानगरपालिका, जेएनएनयूआरएम, राज्य शासन यांना खूप मोठया प्रमाणात निधी प्राप्त होत असतो. निधी प्राप्त झाल्यानंतर विकास कामे हाती घेतली जातात. मात्र एसटीपी प्लांटकरिता निधी खर्च केला जात नाही. विकास कामांबरोबरच नागरिकांचे आरोग्य हा देखील महत्त्वाचा भाग आहे. यामुळे प्रदूषण नियंत्रणाकरिता देखील काही टक्के रक्कम खर्च केली पाहिजे. जे कारखाने ट्रीटमेंट प्लांट सुरू करीत नाहीत त्यांच्यावर कोणतीही गंभीर कारवाई केली जात नाही. या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवले पाहिजे तसेच बजेटमधील ठराविक रक्कम या कामाकरिता खर्च केली पाहिजे. रस्त्याचे डांबरीकरण, दिवे इ. कामांसाठी रक्कम खर्च केली जाते. त्याचप्रमाणे प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजनांकरिता देखील प्राधान्याने निधी खर्च केला पाहिजे. नगरविकास विभागाने देखील याकडे लक्ष दिले पाहिजे. नगरपालिकांचे बजेट कमी असल्यामुळे नगरपालिका हा खर्च करू शकत नाही.

२.१२२. नागरी सोयी सुविधांवर निधी खर्च करण्याबाबत कोणताही विरोध नसतो. मात्र आज शहरीकरणामुळे व वाढत्या प्रदूषणामुळे माणसांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत महामंडळाने व पर्यावरण विभागाने यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. कागदावर कारवाई केल्याचे सांगितले जाते, मात्र प्रत्यक्षात तेथे कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही असे अभिप्राय समितीने नोंदविले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात खुलासा केला की, राज्यामध्ये २६ नगरपालिका व २० महानगरपालिका आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. बायोमेडीकल वेस्ट, ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण इ. अनेक विषय असून त्यांची व्यापकता बरीच मोठी आहे. अशा परिस्थितीत काम करण्याकरिता विभागाला बऱ्याच मर्यादा येतात.

२.१२३. वसई-विरार येथील महानगरपालिकेने सिवेज ट्रीटमेंट प्लांटच्याबाबत अहवाल सादर केला आहे काय, त्याबाबत नगरविकास विभागाला कळविण्यात आले आहे काय याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वसई-विरारमध्ये साधारणपणे १३० एमएलडी सांडपाणी तयार होत असून तेथे एकही एसटीपी नाही. आता तेथे ७ एसटीपी बसविण्याकरिता परवानगी देण्यात आलेली आहे.

२.१२४. मुंबईला देखील मिठी नदीचा प्रश्न भडसावित आहे. यासंदर्भात प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

(१) मिठी नदीच्या संवर्धनाकरिता केंद्र शासनाकडून आजतागायत कोणताही निधी प्राप्त झालेला नाही.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मिठी नदीच्या कामांकरिता टप्पा १ मध्ये रु. ३४.५० कोटी आणि टप्पा २ च्या कामांकरिता रु. ३६८.५७ कोटी इतका खर्च झालेला आहे. मिठी नदी कामांतर्गत खालीलप्रमाणे कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

अ.क्र.	कामे	पूर्ण कामे	कामे पूर्ण %
१	खोलीकरण	२७६९२७४ घ.मी.	१०० %
२	रुंदीकरण	७४२५३६ घ.मी.	७६ %
३	खडकखोदाई	२०३८०१ घ.मी.	५५ %
४	संरक्षक भिंत	६.६१ कि.मी.	८२ %
५	सेवा रस्ते	३.०५ कि.मी.	५५ %
६	सुशोभिकरण	१.१२ कि.मी.	१०० %

(३) अपूर्ण कामांचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	कामे	पूर्ण कामे	कामे पूर्ण %
१	रुंदीकरण	३६४४२४ घ.मी.	२५%
२	खडकखोदाई	१६७७९३ घ.मी.	४५ %
३	संरक्षक भिंत	१.९ कि.मी.	१८ %
४	सेवा रस्ते	२.५ कि.मी.	४५ %

उर्वरित कामे डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण करणे प्रस्तावित आहे.

२.१२५. समितीच्या बैठकीत खालील मुद्यांसंदर्भातील माहिती समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले परंतु अद्यापपर्यंत उक्त माहिती समितीस अप्राप्त आहे.

(१) पुणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट आहेत, त्यातील किती प्लॅन्ट चालू आहेत व किती प्लॅन्ट बंद आहेत ? पुणे महानगरपालिकेने ७०० कोटी रुपयांचा नवीन सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट मंजुरीसंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे. सदरहू सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्ट मंजुरीसंबंधीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे कधी पाठविला ? या प्रस्तावास केंद्र शासनाकडून अद्यापपावेतो परवानगी का मिळाली नाही ? महानगरपालिकेने एखाद्या सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्टचे काम हाती घेण्याचे ठरविले तर त्यास महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून किती दिवसात परवानगी दिली जाते.

(२) पुणे महानगरपालिकेचे सिवेज प्लॅन्ट खाजगीकरणाच्या माध्यमातून चालविण्यात येत आहेत. खरे तर हे प्लॅन्ट दिवसभर चालले पाहिजे व सायंकाळी प्रक्रिया झालेले पाणी नदीपात्रात सोडले पाहिजे. परंतु प्रक्रिया न करता शहरातील सांडपाणी नदीपात्रात सोडले जाते ही बाब गंभीर आहे, पुणे शहरातील सांडपाणी नदी पात्रात प्रक्रिया करून सोडले जाते आहे किंवा नाही याची तपासणी महानगरपालिकेने रात्रीच्या वेळी केली पाहिजे, तशी तपासणी महानगरपालिकेकडून तसेच पर्यावरण विभागाकडून केली जाईल काय तसेच पुणे शहर प्रदूषणमुक्त व्हावे म्हणून विशेष लक्ष घालण्यासाठी पर्यावरण विभागाकडून कोणते प्रयत्न केले जात आहेत.

(३) वैजापूर शहर, कोपरगाव, येवला, चितळी, शिर्डी, उंबरगा या शहरामध्ये पिण्यासाठी पाणी नाशिकच्या परिसरातून येते. काकणी, गंगापूर धरण, दारणा धरण यातील पाणी नांदूर-मधमेश्वर या धरणात येते व त्या धरणातून गोदावरी नदीमध्ये पाणी सोडून ते वैजापूर, कोपरगाव, येवला, चितळी, शिर्डी या गावांना गोदावरी नदीमध्ये पाणी येते. नाशिक शहरातील गटारगंगा गोदावरी नदीमध्ये सोडली जाते. त्यामुळे गोदावरी नदीचे पाणी प्रदूषित होते व ते पाणी या गावातील गावकऱ्यांना पिण्यासाठी उपलब्ध करून दिले जाते. उन्हाळयात तर या नदीच्या प्रवाहाचे पाणी हिरवे, पिवळे अशा रंगाचे असते. हे प्रदूषित पाणी वैजापूर, कोपरगाव, येवला, चितळी, शिर्डी, उंबरगा या गावातील लोकांना पिण्यासाठी दिले जात असल्यामुळे त्या गावात मोठया प्रमाणात रोगराई पसरत असते. नाशिक शहरातील सांडपाणी गोदावरी नदीत

सोडले जात असल्यामुळे गोदावरी नदीचे पाणी मोठया प्रमाणात प्रदुषित झालेले आहे. त्याबाबतीत प्रदूषण नियंत्रण मंडळाने काय उपाययोजना केलेली आहे.

(४) आवाज प्रदूषणाचा प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. प्रत्येक समारंभात मोठ-मोठया आवाज करून वाद्ये वाजविली जातात, डी.जे. वाजविले जातात. त्या आवाज प्रदूषणामुळे दवाखान्यातील रुग्ण, वयोवृद्ध माणसे, शाळेतील मुले यांना मोठया प्रमाणात त्रास होतो. जेवढया डेसीबल आवाजाची परवानगी दिलेली असते त्यापेक्षा जास्त डेसीबल आवाजाने सदर वाद्ये वाजविली जातात. या गोष्टीवर कोणत्याही यंत्रणेचे लक्ष नाही. राज्यात आवाज प्रदूषण त्रास होऊ नये म्हणून काय उपाययोजना केली जाणार आहे.

(५) नाशिक हे श्रद्धास्थान असलेले शहर आहे. त्या शहरात कुंभमेळा होत असतो. पुढील कुंभमेळा २०१४ या वर्षी आहे. कुंभमेळयाच्या वेळी गोदावरी नदीच्या पाणी मोठया प्रमाणात प्रदुषित होते. त्या नदीतील पाणी प्रदूषित होऊ नये, तसेच पर्यावरणाचा समतोल व्यवस्थित रहावा म्हणून पर्यावरण विभागाने कसे नियोजन केले आहे.

(६) जळगाव येथे ऑर्डीनन्स फॅक्टरी आहे तसेच औष्णिक विद्युत केंद्र आहे. ऑर्डीनन्स फॅक्टरीमध्ये इफ्यूलंट प्लॅन्ट बंद आहे. तो पुन्हा कार्यरत करण्यासाठी विभागाकडून कोणते प्रयत्न केले गेले आहेत ? औष्णिक विद्युत केंद्रातील प्रदूषित सांडपाण्याने चार महिला मृत्युमुखी पडल्या. या प्रदुषित पाण्यामुळे गुरे देखील मोठया प्रमाणात मृत्युमुखी पडलेली आहेत. एअर पोल्यूशनचे निर्मूलन करण्यासाठी पर्यावरण विभागाकडून कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली.

(७) यहां पर महाराष्ट्र प्रदूषण कंट्रोल बोर्ड है और उसके नियम भी हैं परन्तु ये सारे नियम कागजों पर हैं. इन नियमों का पालन होना जरुरी है. प्रदूषण के मानकों के हिसाब से इन नियमों का पालन किया जाना जरुरी है. गोंदिया एवं भंडारा जिलों में ४०० बोईल्ड राईस के प्लांट हैं. वहां पर वॉटर एफ्लूएन्ट ट्रीटमेंट प्लांट लगे हुए हैं परन्तु वे चलते नहीं हैं. नियम के हिसाब से सारा सिस्टम बना हुआ है परन्तु उसका कोई फायदा नहीं है. यह केवल कागजात पूरे करने की बात है. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात वॉटर पोल्यूशन मोठया प्रमाणात होत आहे. राईस मिल्सचे सांडपाणी नदीपात्रात प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने प्रदूषणात वाढ झाली आहे. भंडारा, गोंदिया जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी कारखान्यांचे सांडपाणी सोडले जाते त्या त्या ठिकाणी एफ्यूलंट ट्रिटमेंट प्लॅन्ट कार्यान्वित करण्यासाठी विभागाने काय कार्यवाही केली ?

(८) वणी आणि चंद्रपूरमध्ये कोळशाच्या खाणी मोठ्या प्रमाणात आहेत. चंद्रपूर येथे केंद्रीय कोळसामंत्री यांनी स्थानिक खासदार, आमदार, जिल्हाधिकारी आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यावेळी पर्यावरण विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. प्रदूषण रोखण्यासाठी अधिकार नसल्यामुळे कार्यवाही करता येत नाही, असे उत्तर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत दिले होते. या बैठकीत प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या उत्तराची नोंद इतिवृत्तात केलेली आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळास नेमके कोणते अधिकार आहेत .

(९) पश्चिम घाट संवर्धन समितीने कोकणातील प्रदूषणाच्या संदर्भात शासनाला कडक शिफारशी केलेल्या आहेत. कोकणातील कळणे मायनिंगमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. कळणे मायनिंगमुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या संदर्भात तेथील गावकऱ्यांनी तक्रारी देखील केलेल्या आहेत. मायनिंगमुळे हवेचे, आवाजाचे प्रदूषण होते. तसेच मायनिंगच्या अनुषंगाने होणाऱ्या वाहतुकीमुळे देखील प्रदूषण होते. कळणे मायनिंगच्या आजूबाजूच्या शाळेतील विद्यार्थ्यांना ऐकू न येणे यासारखे आजार झालेले आहेत. आता ते विद्यार्थी त्यावर उपचार घेत आहेत. यासंदर्भात विभागाकडे शेकडो तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. कळणे मायनिंगमुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केलेली आहे

सहकार विभाग

२.१२६. समितीच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१२ रोजी सचिव, सहकार विभाग व आयुक्त (साखर) हे उपस्थित होते त्यावेळी राज्यातील अस्तित्त्वातील साखर कारखानदारीविषयी माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यामध्ये एकूण नोंदणीकृत सहकारी साखर कारखान्यांची संख्या २०२ आहे. सध्या नवीन कारखान्यांची नोंदणी राज्य शासनाने बंद केलेली आहे. २०२ सहकारी साखर कारखान्यांपैकी अवसायानात गेलेल्या कारखान्यांची संख्या २२ असून उभारणीअंतर्गत असलेले कारखाने ९ आहेत. या ९ पैकी चालू सीझनमध्ये गाळप करण्याची अपेक्षा असलेले ५ कारखाने असून उर्वरित ४ कारखाने एका वर्षांत सीझन घेणार आहेत. उभारणी पूर्ण झालेल्या कारखान्यांची संख्या १६८ आहे. याशिवाय राज्यात खाजगी साखर कारखाने देखील आहेत. या खाजगी साखर कारखान्यांना राज्य शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत दिली जात नसल्यामुळे त्यांचा या सहकारी साखर कारखान्यांच्या संख्येमध्ये समावेश केलेला नाही. आज राज्यात १६८ कारखाने कार्यरत आहेत.

२.१२७. साखर कारखान्यांना दोन-तीन प्रकारची आर्थिक मदत राज्य शासनाच्या वतीने दिली जाते. सुरूवातीला राज्य शासनाने निश्चित केलेल्या नॉर्म्सप्रमाणे १:३ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. मराठवाडा परिसरात असलेल्या कारखान्यांना १:५ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. याशिवाय आदिवासी क्षेत्रातील सहकारी साखर कारखाने आणि महिला सहकारी साखर कारखाने ही एक कॅटगरी आहे. या प्रकारच्या कारखान्यांसाठी १:९ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. राज्यात कोल्हापूर येथे इंदिरा महिला सहकारी साखर कारखाना हा एकमेव महिला सहकारी साखर कारखाना कार्यरत आहे.

२.१२८. ट्रायल सीझनवर किती साखर कारखाने आहेत व या कारखान्यांना देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड ते कशी करणार आहेत याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बाणगंगा आणि भाऊसाहेब बिराजदार या दोन उस्मानाबाद जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांचा यामध्ये समावेश आहे. राज्य शासनाने त्यांच्या कर्जाला हमी दिली आहे. राज्य शासनाने एनसीडीसी कडून कर्ज घेऊन ते या साखर कारखान्यांना वितरित केले आहे आणि त्या कर्जाला हमी दिलेली आहे. त्यामुळे राज्य शासनाला कर्जाची परतफेड करावी लागेल. सहकार विभाग या साखर कारखान्यांकडून वसूली करून कर्जाची परतफेड करणार आहे.

२.१२९. परंतु या कारखान्यांच्या उभारणीचा कालावधी विचारात घेतला तर कर्जाच्या परतफेडीची मुदत निघून गेली आहे. हे कारखाने सुरू होऊन कर्जाची परतफेड करू शकतील का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या कारखान्यांचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. ऑक्टोबर, २०१२ पर्यंत उर्वरित काम पूर्ण होऊन यावर्षी काही प्रमाणात हे कारखाने ट्रायल सीझन घेणार आहेत. परंतु दुर्दैवाने दुष्काळी परिस्थितीमुळे या सीझनमध्ये ऊसाची उत्पादकता कमी होणार आहे.

२.१३०. उक्त साखर कारखान्याची सन २०१२ मध्ये ट्रायल सीझन घेणार आहे. परंतु त्या भागात ऊसाची उपलब्धता लक्षात घेतली तर ते शक्य होईल असे वाटत नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यावर्षी त्यांना ५० हजार टनापर्यंत क्रशिंग करावे लागेल. या कारखान्यांमध्ये मशिनरी, बॉयलर व हायड्रॉलिक सिस्टीम पूर्ण झालेली आहे. त्यामुळे हे कारखाने पुढील सीझन पूर्ण करतील याची खात्री वाटते. तसे कारखान्यांकडून विभागाला कळविण्यात आलेले आहे. राज्य शासनाच्या वतीने कर्ज घेण्यात आले असून ते या कारखान्यांना वितरित केलेले आहे. त्यामुळे या कारखान्यांकडून वसूली करून एनसीडीसीकडे कर्जाची परतफेड केली जाणार आहे. राज्य शासनाने जे कर्ज दिलेले आहे त्याला हमी दिलेली आहे. राज्य शासनाने राज्यामध्ये २०२ कारखान्यांना भाग भांडवलापोटी १०९३ कोटी रुपये दिलेले असून शासकीय कर्ज ११०४ कोटी रुपयांचे आहे. त्यापैकी २ टक्के हमी शुल्क म्हणून २३१ कोटी रुपये घेण्यात आले आहेत. ही आकडेवारी दिनांक १ एप्रिल २०१० पर्यंतची आहे. प्रत्यक्षात थकबाकीच्या २२०० कोटी रुपयांपैकी ११४८ कोटी रुपये देय म्हणजे ओव्हरड्यू आहेत. जे राज्य शासनाला देणे बाकी आहे. यापैकी मागील वर्षी २७३ कोटी रुपये वसूल केले आहेत. मागील वर्षी साखरेचे भाव बऱ्यापैकी होते. म्हणून १०० टक्के वसूली झाली.

२.१३१. एनसीडीसीमार्फत दोन प्रकारची कर्जे दिली जातात. भागभांडवल आणि कारखाने उभारणीसाठी प्रिंसीपल लोन दिले जाते. ज्या सहकारी साखर कारखान्यांसाठी एनसीडीसीकडून राज्य शासनाने कर्ज घेतले त्या कर्जाची वसूली संदर्भात तपशिलावर माहिती तसेच राज्यात एकूण १६८ सहकारी साखर कारखाने कार्यरत आहेत. त्यांच्या संदर्भातील भाग भांडवल, शेअर कॅपिटल, कर्ज, गाळप क्षमता याची तपशीलवार माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश दिले असता, भाग भांडवलासाठी एनसीडीसीकडून राज्य शासनाने कर्ज घेऊन ते साखर कारखान्यांना दिलेले आहे. त्या संदर्भातील माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

२.१३२. समितीने पुढे विचारणा केली की, ही युनिट व्हायबल होऊ शकतात का? त्यांची उभारणी विलंबाने झालेली आहे हे लक्षात घेता ही युनिट व्हायबल होऊन कर्जाची वेळेवर परतफेड करू शकतात का यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सन २००२ मध्ये कारखान्याची नोंदणी झाल्यानंतर उभारणीची रुपरेषा लक्षात घेता १२५० टन क्षमतेच्या कारखान्यासाठी २८ कोटी रुपये आणि २५०० टन क्षमतेच्या कारखान्यासाठी ४० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. मागील १० वर्षांत उभारणीचा खर्च वाढला आहे. आज २५०० टन क्षमतेच्या कारखान्यासाठी ७५ कोटी रुपये लागतात. राज्य शासनाकडून वाढीव खर्चासाठी भाग भांडवल दिले जात नाही. राज्य शासनाच्या धोरणानुसार २८ कोटी रुपयांपैकी ३० टक्के रक्कम भाग भांडवलापोटी दिली जाते. त्यापेक्षा जास्त खर्च झाला तरी ती रक्कम वाढवून दिली जात नाही. भाग भांडवल वाढवून देण्यासाठी मागणी करण्यात आली होती. परंतु राज्य शासनाने भाग भांडवल वाढवून न देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्षात जी तफावत आहे तेवढ्या रकमेबाबत संबंधित साखर कारखान्याने एमएससी बँक किंवा इतर कोणत्याही बँकेकडून कर्ज घ्यावे. आज निर्माण केली जाणारी साखर, मोलॅसीस, को-जनरेशन लक्षात घेता पाच-सहा वर्षांत साखर कारखाने पे बॅक होतील अशी स्थिती आहे.

२.१३३. परंतु त्यासाठी ऊसाची उपलब्धता आवश्यक आहे. जर त्या परिसरात ऊस उपलब्ध नसेल तर युनिट कसे व्हायबल होणार आहे असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मागील तीन वर्षांतील ऊसाची उपलब्धता लक्षात घेता सन २०१२-२०१३ चा विचार न करता गेल्या तीन वर्षांत साधारणपणे ८०० ते ९०० लाख मे.टन ऊसाचे गाळप झाले. सन २०११-२०१२ मध्ये ७७१ लाख मे.टन ऊसाचे गाळप झाले आणि ९० लाख मे.टन साखरेचे उत्पादन झाले. सन २०१०-२०११ मध्ये ८०२ लाख मे.टन ऊसाचे गाळप झाले होऊन

९०.७२ लाख मे.टन साखरेचे उत्पादन झाले. सन २००९-२०१० मध्ये काही प्रमाणात दुष्काळ होता, तरी देखील त्या वर्षांत ६१४ लाख मे.टन ऊसाचे गाळप झाले होते. म्हणजे वर्षाला सरासरी ७०० ते ७५० लाख मे.टन ऊसाचे गाळप होते. चालू वर्षांत राज्यात तीव्र दुष्काळ असल्यामुळे ऊसाची उपलब्धता चाऱ्यासाठी डायव्हर्ट केली आहे. या वर्षी ५४५ लाख मे.टन ऊसाची उपलब्धता आहे. मागील चार-पाच दिवसात राज्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस झाल्यामुळे काही प्रमाणात ऊसाचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. परंतु ५४५ लाख मे.टन ऊसाची निश्चित उपलब्धता आहे.

२.१३४. क्रशिंग कॅपॅसिटी आणि उपलब्ध असलेला ऊस याची स्थिती विशद करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात २०२ साखर कारखाने आहेत. त्यापैकी प्रत्यक्षात उभारणी झालेले कारखाने १६८ आहेत. याशिवाय खाजगी ६१ साखर कारखाने आहेत. खाजगी आणि सहकारी साखर कारखान्यांची संख्या लक्षात घेता प्रत्येक दिवशी ५०४ मे.टन ऊसाचे गाळप होऊ शकते. चार पाच वर्षांपूर्वी राज्यामध्ये काही भागात सीझन संपल्यानंतर सुद्धा शेतात ऊस उभा होता. यापुढे राज्यात ऊसाचे कितीही उत्पादन झाले तरी त्याचे गाळप होऊ शकते, १२० दिवस गाळप होईल अशी स्थिती आहे. ऊसाची कमतरता झाली तर काही प्रमाणात कारखाने बंद राहतील. चालू वर्षी ५४५ लाख मे.टन ऊस लक्षात घेता सर्व साखर कारखाने ५० टक्के गाळप करू शकतात.

२.१३५. ऊस उपलब्ध असेल तर नवीन कारखान्यांनी परवानगी द्यावी, ऊस उपलब्ध नसेल तर त्या भागामध्ये नवीन कारखान्यांना परवानगी देऊ नये. मागील पाच वर्षांच्या काळात साखर कारखान्यांची क्रशिंग कॅपॅसिटी आणि उपलब्ध असलेला ऊस यामध्ये किती तफावत होती, नियोजनामध्ये काय चूक झाली, या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, साखर कारखान्यांना लायसन्स देत असताना केंद्र सरकारच्या शुगर केन कंट्रोल ऑर्डरनुसार साखर आयुक्तांनी एनओसी द्यायची असते. केंद्र सरकारने संपूर्ण देशासाठी नियमावली तयार केली आहे. परंतु राज्य शासनाने त्यामध्ये अपवाद करून घेतला आहे. १५ किलोमीटर अंतरात एखादा कारखाना अस्तित्त्वात असेल किंवा प्रस्तावित कारखाना असेल तर त्या कारखान्याला एनओसी देत नाही. राज्य शासनाने आपल्या राज्यामध्ये ही १५ किलोमीटरची मर्यादा २५ किलोमीटरपर्यंत वाढविलेली आहे. सध्या २५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतर असेल तर एनओसी देण्यात येते. २५ किलोमीटरपेक्षा कमी अंतर असेल तर एनओसी दिली जात नाही. सध्या राज्यामध्ये नवीन कारखाने देण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही.

२.१३६. उस्मानाबाद जिल्ह्यातील बानगंगा व भाऊसाहेब बिराजदार दोन्ही कारखान्यांची सद्यःस्थिती सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००२ मध्ये नोंदणी झालेली आहे. त्यावेळी १५ किलोमीटरची मर्यादा होती. आता २५ किलोमीटरची मर्यादा घातलेली आहे. आर्थिक अडचणीमुळे त्या ठिकाणी कारखान्याची उभारणी केली नाही. मशिनरी पुरवठ्याचे ॲग्रीमेंट सन २००६ मध्ये रद्द केले होते. त्यानंतर नवीन ॲग्रीमेंट केले. त्यामुळे उशीर झालेला आहे. सन २००२ नंतर नवीन कारखान्यांची नोंदणी केलेली नाही.

२.१३७. काही कारखान्यांची २५-३० टक्केच उभारणी झालेली आहे अशा कारखान्यांचे भविष्यात काय होणार आणि जे काही कारखाने वगळलेले आहेत. अशा कारखान्यांच्या बाबतीत शासनाने काय धोरण ठरविले आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, पाईपलाईनमधून वगळलेले कारखाने २२ आहेत. या कारखान्यांबाबत राज्य शासनाचे धोरण स्पष्ट आहे. ज्या कारखान्यांचे नोंदणी झालेले आहे त्यांना उभारणी करावयाची असेल तर राज्य शासन त्यांना कोणत्याही प्रकारची मदत देणार नाही, भागभांडवल देणार नाही तसेच कर्जासाठी हमी देणार नाही. त्यांनी त्यांची आर्थिक परिस्थिती बघून ते करावयाचे आहे.

२.१३८. कारखान्यांनी त्यांची आर्थिक परिस्थिती बघून उभारणी करावयाची म्हणजे ते खाजगीमध्ये कन्व्हर्ट करावे असा विषय आहे. शासनाकडून त्यांना काहीही देण्यात येणार नाही. तुम्ही कर्ज घ्या आणि काहीही करा. म्हणजे ते कारखाने खाजगी होतील ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये एक फरक आहे. सहकारी साखर कारखाना म्हटल्यानंतर सभासदांकडून शेअर कॅपिटल गोळा करणार. त्या कारखान्याचे स्वरुप सहकारी असेल पण त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा किंवा भाग नसेल.

२.१३९. एखाद्या कारखान्याची नोंदणी केल्यानंतर आणि त्याला मान्यता दिल्यानंतर शासनाने कर्जाची गॅरंटी घेतली पण कारखाना उभारणीसाठी जे पैसे लागतात त्यामध्ये पैसे घालण्याची शासनाची जबाबदारी असताना शासनाकडून २ कोटी रुपये, ५० लाख रुपये अशा पद्धतीने रक्कम दिली जाते त्यामुळे कारखान्याच्या उभारणीचा खर्च वाढत जातो. याबाबतीत सरकारची काय बांधीलकी आहे ? ठराविक काळात कारखान्याची उभारणी झाली पाहिजे असे शासनाचे धोरण आहे की नाही ? हे सर्व पैसे निष्कारण व्यर्थ गेलेले आहेत ही बाब लेखापरीक्षणात आली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

२.१४०. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी मानसेवी (Honorary) काम करतात पण त्यांच्याकडून बंधपत्र लिहून घेतात. त्याबाबत आता अध्यादेश काढून त्यांना मोकळे केले. हे सर्व साखर कारखाने सहकारी तत्त्वावर उभे आहेत. तोटा वगैरे असेल तर ते भरून देणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. परभणीच्या नरसिंह सहकारी साखर कारखान्याला ११८ कोटी रुपये दिले पण त्या ठिकाणी ऊसाच्या एका कांडीचेही

गाळप झालेले नाही. तो कारखाना भाड्याने चालविण्यासाठी घेतला. दोन वर्षे तो कारखाना भाड्याने चालविल्यानंतर कारखाना विकला. ११८ कोटी रुपये बुडविणाऱ्या साखर कारखान्याच्या संचालकांवर कारवाई का झाली नाही ? या सर्व बाबी लेखापरीक्षणामध्ये आल्या पाहिजेत. यामध्ये शासनाचे कोट्यवधी रुपये गेलेले आहेत. त्यामुळे त्याची जबाबदारी निश्चित व्हावयास पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

२.१४१. साखर कारखान्यांना वर्षांनुवर्षे मदत करीत असूनसुद्धा तरी त्याची उभारणी पूर्ण झालेली नाही. काही साखर कारखाने मोडीत निघाले. काही साखर कारखाने विकले गेले. या सर्व बाबतीत त्या त्या कारखान्यावर काय कारवाई झाली ? त्याची जबाबदारी संचालकांवर येते. अशा कारखान्यावर वित्त विभागाकडून वसूलीच्या बाबतीत तगादा लावण्यात येतो का कारण परत येणारे पैसे हे राज्याच्या तिजोरीमध्ये येतात. परंतु पैसे राज्याच्या तिजोरीत येतच नाही. यामध्ये २-४ कोटी रुपयांची रक्कम नसून ही रक्कम १००-१०० कोटी रुपयांवर जाते. वित्त विभागाकडून वित्तिय सहाय्य केले जाते. जर वसूली होत नसेल, ते पैसे देत नसतील तर वित्त विभाग काय कारवाई करणार? पैसे परत मिळण्याची मुदत संपल्यानंतर सुद्धा त्यांना पैसे दिलेले आहेत. शासन सहकारी साखर कारखान्यांना कर्ज उपलब्ध करून देते. त्यांना सिक्युरिटायझेशन ॲक्ट लावला जातो. लिलाव केल्यानंतर ते पैसे कारखान्याला किंवा शासनाला मिळतात पण कारखान्याचे चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन यांच्यावर कोणतीही जबाबदारी निश्चित होत नाही. समितीने उपस्थित केलेले उक्त मुद्यांसदर्भात विभागीय सचिवांनी तसेच वित्त सचिवांकडून काहीच उत्तर प्राप्त झाले नाही.

२.१४२. बुडीत कर्जे आणि शंकास्पद कर्जाची तरतूद तसेच प्रलंबित दायित्त्वे त्या संदर्भात विभागाकडून जे स्पष्टीकरणासंदर्भात ज्ञापन अभिप्राय दिले आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, साखर आयुक्त कार्यालयाकडील दिनांक ७ ऑक्टोबर २००४ व दिनांक १४ जून २००५ च्या पत्राने सर्व संबंधित साखर कारखान्यांना कळविले आहे. म्हणजे महालेखाकारांनी जो अभिप्राय दिलेला आहे त्या बाबतचे उत्तर देण्याऐवजी त्यांच्या परिच्छेदाचाच त्यामध्ये उल्लेख केलेला आहे. कारवाई काय केली या बाबतचे उत्तर या अभिप्रायामध्ये अपेक्षित आहे. या संदर्भात विशेष लेखापरीक्षण करावयास लावल्यानंतर महालेखाकारांनी हे आक्षेप काढलेले आहेत. महालेखाकार ही कार्यवाही घेणारी संस्था नाही. कारवाई संबंधित खात्याने करावयाची असते. साखर कारखान्यांमध्ये बुडीत कर्जाच्या बाबतीत किंवा इतर ज्या अनियमितता झाल्या त्या ठळकपणे निदर्शनास आणण्याचे काम महालेखाकारांचे आहे. ते काम त्यांनी केले. परंतु कार्यवाही घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाकडे येते. यामध्ये ११८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचा प्रश्न आहे. सहकार विभाग आणि साखर आयुक्त यांनी कारखान्यांवर कारवाई करून शासनाचे पैसे वसूल करावयास पाहिजे होते. तसे काहीही केलेले दिसत नाही म्हणजेच याबाबतीत काहीही कारवाई झालेली नाही हे विभागाने अप्रत्यक्षपणे मान्य केलेले आहे. यामध्ये बऱ्याचशा सहकारी साखर कारखान्यांनी बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद त्यांच्या आर्थिक पत्रकात केलेली आहे असा उल्लेख केलेला आहे. नेमक्या किती कारखान्यांनी असे केले आहे हे नमूद करावयास पाहिजे होते. "बऱ्याचशा" या शब्दाचा अर्थ समितीने काय समजावयाचा ? याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

२.१४३. प्रलंबित दायित्त्व यासंदर्भातील अभिप्रायामध्ये विभागाने असे म्हटले आहे की, शासकीय येणे रकमांच्या वसूलीबाबत साखर आयुक्त स्तरावर घेण्यात येत असलेल्या बैठकीमध्ये आढावा घेतला जात असून या येणे रकमेच्या वसूलीबाबत आढावा घेऊन वसूलीचे प्रयत्न केले जातात. याबाबतीत केलेले प्रयत्न आणि प्रत्यक्षात झालेल्या वसूलीबाबत झाली याबाबत आयुक्त, साखर यांनी समितीला सांगितले की, ज्यावेळी लेखापरीक्षण झाले तेव्हा ३१ मार्च २००७ अखेर संशयित व बुडीत कर्जे निधीमध्ये २ कोटी रुपये जमा होते. यासंदर्भात तरतूद करण्याच्या बाबतीत वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. त्यानंतर ती तरतूद वाढवून १७ कोटी २४ लाख रुपये केलेली आहे. मंत्री समितीच्या धोरणाप्रमाणे जी तरतूद व्हावयास पाहिजे त्याबाबतीत काटेकोर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येतो. ही तरतूद कारखान्यांनी केलेली आहे. भागभांडवल, शासकीय कर्जे आणि हमी या संदर्भातील जी येणे रक्कम होती त्यापैकी २०१०-२०११ मध्ये २७३ कोटी रुपये वसूल झालेले आहेत.

२.१४४. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या शेतकऱ्यांनी शेअरचे पैसे भरून कारखाना उभा करण्यासाठी लाखो रुपये जमा करून दिले त्या शेतकऱ्यांना एक रुपया सुद्धा मिळालेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ३६ कोटी रुपयांच्या वसूलीचा निर्णय दिला होता दहा वर्षे झाली तरी वसूली झालेली नाही. तसेच जास्तीतजास्त थकबाकी असणारे कारखान्यांची नावे आणि त्यांच्यावर काय कारवाई केली. लिलावाने जे कारखाने विकले त्यामधून खूप कमी पैसे आलेले आहेत. लिलावातून आलेल्या पैशातून सरकारने आपले भागभांडवल वसूल करावयास पाहिजे होते. विक्रि झालेल्या कारखान्यावर किती कर्ज आहे, शासनास किती रक्कम परत करावयाची आहे गेल्या पाच वर्षांमध्ये किती कारखाने विकले गेले आणि किती कारखान्यांची कर्ज वसूली करण्यात आली नाही सदर विक्रीतून शेतकऱ्यांना किती रक्कम मिळाली असे प्रश्न समितीने उपस्थित केले व त्यावरील माहिती समितीने लेखी स्वरुपात सादर करावी असे निदेश दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यामध्ये काही साखर कारखान्यांना राज्य शासनाने आणि काही कारखान्यांना एमएससी बँकेने सिक्युरिटायझेशन ॲक्टखाली कर्ज दिल्यानंतर केंद्र सरकारच्या कायद्याप्रमाणे बँकेला कारखाना ताब्यात घेऊन विकण्याचा, लिलाव करण्याचा अधिकार आहे. त्या पद्धतीने बँकेने काही ठिकाणी कार्यवाही केलेली आहे. राज्यामध्ये एकंदरित ८ कारखान्यांची विक्री राज्य शासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे. अहमदनगर येथील डीसीसी

बँकेने काही कारखान्यांची विक्री केलेली आहे. एमएससी बँकेने १२ कारखान्यांची विक्री केलेली आहे. ४ कारखान्यांच्या विक्रीबाबत निविदा काढलेली आहे. ती प्रक्रिया अंतिम टप्प्यापर्यंत आलेली आहे. काही कारखान्यांच्या विक्रीबाबत निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू आहे.विक्री झालेल्या कारखान्यांबाबत सांगावयाचे झाले तर, कोरेगाव येथील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याची ६२ कोटी ७५ लाख रुपयांना विक्री करण्यात आली. नरसिंह सहकारी साखर कारखान्याची ४० कोटी २५ लाख रुपयांना विक्री करण्यात आली.

२.१४५. कारखान्यांची विक्री किती रुपयांना केली हे सांगत असतानाच, विभागाने कारखान्यावर किती रुपयांचे कर्ज होते , बँकांनी किती कर्जफेड करून घेतली व किती शेतकऱ्यांची देणी देण्यात आली याची माहिती देखील देणे गरजेचे आहे असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सिक्युरिटायझेशन ॲक्टप्रमाणे प्रथम बँका कर्जाची परतफेड करून घेतात. त्यानंतर कर्मचाऱ्यांचे देणे दिले जाते, त्यानंतर राज्य सरकारचे देणे दिले जाते. या संदर्भात उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा देखील निर्णय आहे.

२.१४६. केंद्र शासनाच्या आयकर कायद्यात असे नमूद केले आहे की, एखाद्या वसूली संदर्भात लिलाव करावा लागला तर, त्या लिलावातून प्राप्त झालेल्या रकमेतून प्रथम इन्कम टॅक्सची वसूलीची वसूली केली जाते, त्यानंतर राज्य शासनाच्या वसूलीची वसूली केली जाते, त्यानंतर बँक, त्यानंतर शेतकरी व त्यानंतर खाजगी बँका अशा प्रकारे वसूली केली जाते. याच नियमाचे सर्वत्र पालन होताना दिसते. सरकार म्हणून साखर कारखान्याची कर्ज वसूली करण्यासाठी विभागाकडून काय प्रयत्न केले अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सिक्युरिटायझेशन ॲक्ट सर्व बँकाना लागू असल्यासंदर्भात आयडीबीआय, देना बँक उच्च व सर्वोच्च न्यायालयात गेल्या. सिक्युरिटायझेशन ॲक्ट हा फक्त राष्ट्रीयकृत बँकाना लागू होणार, तो सहकारी बँकाना लागू होणार नाही असे राज्य शासनाचे म्हणणे होते. त्याकरिता शासन सर्वोच्च न्यायालयात गेले होते. परंतु, तो केंद्र शासनाचा कायदा असल्याने राज्यशासनाला त्याबाबत चॅलेंज करता आले नाही. राष्ट्रीयकृत, सहकारी सर्व बँकांना सिक्युरिटायझेशन ॲक्ट लागू आहे. त्याबाबतची प्रक्रिया त्या कायद्यामध्ये नमूद केलेली आहे. त्यानुसार देशाभरात तीच पद्धती अवलंबिली जाते. परंतू ज्याच्या पैशावर कारखाना उभा राहतो त्या शेअर होल्डर शेतकऱ्याचे नुकसान होते असे मत समितीने व्यक्त केले.

२.१४७. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या कारखान्यांची विक्री करण्यात आली आहे किंवा जे कारखाने विक्री करावयाचे ठरविले आहे त्यांच्यावर जेवढे कर्ज आहे, त्यापेक्षा अधिक कर्ज असलेले कारखाने देखील आहेत. असे असताना जास्त कर्ज असलेले कारखाने न विकता हेच कारखाने विक्रीसाठी का काढले यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, राज्य शासनाच्या सन २००५ च्या धोरणानुसार बंद स्वरुपात असलेले कारखाने, तसेच लिक्विडेशनमध्ये काढलेले कारखाने विक्रीसाठी काढले आहेत. ज्या कारखान्यांनी कर्जाच्या इन्स्टॉलमेंटचा एकही हप्ता दिलेला नाही, जे कारखाने बंद आहेत, ज्या कारखान्यांना ऊसाची उपलब्धता होत नाही अशा प्रकारच्या आजारी कारखान्यांच्या बाबतीत ही प्रक्रिया अनुसरली जाते. एमएससी बँकेने सिक्युरिटायझेशन ॲक्ट खाली त्याबाबतची कारवाई केलेली आहे.

२.१४८. जे कारखाने चालत नाही तेच कारखाने विकले जातात. आणि ते कारखाने जे विकत घेतात तेव्हा कारखाने चालवतात. त्यांना अडचण येत नाही. कधी कधी तर या कारखान्यांचे जे अध्यक्ष असतात तेच कारखाने विकत घेताना दिसतात. याबाबत विभागाकडून काही निर्बंध घातले जातात काय अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी या संदर्भातही काही भाष्य केले नाही. आजारी कारखान्यांमुळे एमएससी बँक सुद्धा अडचणीत आलेली आहे. त्यातून बँकेला बाहेर काढण्यासाठी, कारखाने चांगल्या अवस्थेत आणण्यासाठी, शेअर होल्डर्सना त्यांची रक्कम परत करण्यासाठी काय करता येईल या बाबत एखादे धोरण ठरविण्याची सूचना समितीने केली.

२.१४९. एखाद्या कारखान्याची प्रॉपर्टी १०० कोटी रुपयांची असते. परंतु त्या कारखान्याचा लिलाव मात्र २५ किंवा ३० कोटी रुपयांना केला जातो. कारखान्याचा लिलाव करताना त्याचे मुल्यांकन कशा प्रकारे केले जाते ?याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी एमएससी बँकेवर प्रशासकाची नियुक्ती केल्यानंतर एमएससी बँकने सूचना केल्या की, जी मालमत्ता विकावयाची आहे किंवा लिजवर द्यावयाची असेल तिची संपूर्ण माहिती घेऊन त्यांचे मुल्यांकन करण्यासाठी ३ खाजगी संस्थांची नियुक्ती करावी. त्याप्रमाणे इकॉनॉमिक टाईम्समध्ये याबाबतची जाहिरात देऊन ऑल इंडिया लेव्हलवर निविदा काढून ३ खाजगी एजन्सीजची नियुक्ती केलेली आहे. त्यांच्यामार्फत मुल्यांकनाचे काम केले जाते. यापूर्वी त्याकरिता वसंतदादा व्हीसीसी व मिटकॉम अशा दोन संस्था होत्या.

२.१५०. साखर कारखान्यांसाठी घेतलेल्या जमिनी या मुळात शेतकऱ्यांच्या आहेत. या जमिनी ते विकतात परंतु तसे करताना शेतकऱ्यांचे नुकसान होता कामा नये. कारखानदाराला किंवा सरकारला वाचवत असतानाच प्रथम शेतकऱ्याला वाचवले पाहिजे. तसेच या जमिनीचे मुल्यांकन करण्याकरिता खाजगी संस्था नेमल्या आहेत. त्या मुल्यांकन करतील त्याप्रमाणे जमिनीची विक्री होते. परंतु, जमिनीची किंमत किती असावी, त्यातून शेतकऱ्याला किती पैसे द्यावेत, बँकेला किती पैसे द्यावेत त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे तसेच सरकारने केवळ कारखान्याची विक्री करून जी काही वसूली असेल ती करावी आणि त्या कारखान्याकरिता ज्या शेतकऱ्याची जमीन घेतली असेल ती जमीन संबंधित शेतकऱ्याला बाजार मूल्याप्रमाणे परत करावी.अशी सूचना समितीने विभागीय सचिवांना केली.

२.१५१. यशवंत सहकारी साखर कारखान्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एमएससी बँकेने सिक्युरिटायझेशन ॲक्ट खाली यशवंत सहकारी साखर कारखाना ताब्यात घेतला. थेऊर येथील ज्या जमिनीवर तो कारखाना आहे ती जमिनीचे रेडीरेकनरपेक्षा जास्त भाव आहेत या करिता त्यामध्ये राज्य शासन व स्थानिक शेतकऱ्यांनी हस्तक्षेप केला. त्यानंतर त्यासंदर्भात साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने जमिनीचे मुल्यांकन करावयाचे होते. त्या कमिटीने त्या जमिनीचे मुल्यांकन ८० ते ९० लाख रुपये असे केले. त्या बाबत निविदा काढली असता पहिल्या वेळेस ७५ लाख रुपयांची निविदा आली. त्यामुळे ती रद्द करून दुसऱ्यांदा निविदा काढण्यात आली. यावेळी शासनाला असे वाटत होते की, या जमिनीची किंमत जवळपास एक कोटी २० लाख रुपये इतकी येईल. परंतु, तसे न झाल्याने खाजगी संस्थेमार्फत त्या जमिनीचे मूल्यांकन करण्यात आले. त्या कारखान्याची ७० ते ८० एकर जमीन विकल्यानंतर बँकाची देणी दिल्यानंतर कारखाना परत कार्यान्वित करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

२.१५२. यशवंत सहकारी साखर कारखाना याबाबत अधिक माहिती देताना आयुक्त साखर, यांनी सांगितले की, कारखान्याबाबत अपेक्षेप्रमाणे निविदा प्राप्त न झाल्याने निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यानंतर खाजगी संस्थांकडून त्या कारखान्याच्या जमिनीचे मुल्यांकन करून घेण्यात आले. हे मुल्यांकन सरसकट पद्धतीने न करता ५ प्रकारच्या मॉडयूलच्या आधारे केले गेले. अशाप्रकारे केलेल्या मुल्यांकनानंतर त्या जमिनीची किंमत १ कोटी १५ लाख रुपये इतकी आली. त्या जमिनीच्या विक्रीतून जवळपास १०० कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर व अकोला येथील सहकारी साखर कारखान्यांच्या अवसायानाबाबत आक्षेप घेतलेले आहेत. त्यासंदर्भात शासनाने विभागीय पातळीवर वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. महालेखाकार पातळीवरील आक्षेप परिच्छेदांची पूर्तताही केलेली आहे.

२.१५३. यशवंत साखर कारखाना ७० कोटी रुपयांमध्ये विकला गेला. प्रत्यक्ष साखर कारखान्याच्या मालकीची जमीन एकूण २०० ते ३०० कोटी रुपयांची होती. ज्यावेळी यशवंत सहकारी साखर कारखाना अवसायनात निघाला त्यावेळी, शासनाची व भाग भांडवलदार शेतकरी यांची एकूण किती देणी देणे बाकी होते, तसेच, हा कारखाना अवसायनात निघाल्यामुळे शासनाचे एकूण किती कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे ? शासनाला देय असलेली रक्कम साखर कारखान्याची विक्री केल्यानंतर शासनाला प्राप्त झालेली आहे का ? असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता विभागाकडून समितीने उपस्थित केलेल्या उक्त मुद्यांबाबत माहिती प्राप्त झाली नाही परंतु विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, गेल्या चार ते पाच वर्षांपासून अनेक सहकारी साखर कारखाने अवसायनात निघून विक्रीकरिता समोर येत आहेत. त्यातील काही कारखान्यांची प्रत्यक्ष विक्री प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. सहकारी साखर कारखाने विक्री काढत असतांना जे धोरण राबविले जात होते त्यामध्ये शासनाने आता मूलभूत बदल आणलेले आहेत. कोणताही सहकारी साखर कारखाना अवसायनात निघाल्यानंतर एमएससी बँक व डीसीसी बँक ते कारखाने बँक सिक्युरिटायझेशन ॲक्ट अंतर्गत ताब्यात घेते. त्यानंतर साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली या सर्व प्रक्रियेवर कठोर व अचूक देखरेख ठेवण्याकरिता एक समिती नेमण्यात आलेली आहे. कारखाना ज्या जागेवर उभा आहे, ती जमीन व कारखान्याच्या भोवतालची जमीन अशा प्रकारे जमिनीच्या विक्रीच्या जाहीर निविदा काढल्या जातात. साखर कारखान्याच्या जमिनीचे जर एनए केलेले नसेल तर त्याच्या विक्रीमध्ये अडचणी येतात. तसेच, जमीन विक्रीबाबत नुकसान सहन करावे लागते. साखर कारखान्याच्या जमीन विक्रीबाबत नियम व अटी यांचे पाच प्रकारचे मॉडेल्स तयार केले गेलेले आहेत.

२.१५४. थेऊर सहकारी साखर कारखान्याच्या विक्रीबाबत जे निकष व जो न्याय लावण्यात आलेला आहे, तोच न्याय व निकष इतर विक्रीकरिता पुढे आलेल्या सहकारी साखर कारखान्यांकरिता तंतोतंतपणे लागू करण्यात यावा अशी सूचना समितीने विभागास केली.

२.१५५. शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कारखाने जसे विकण्यात आले त्याप्रमाणे लिजवर असलेल्या जमिनीवरील कारखानेसुद्धा विकले गेले आहेत. अशा व्यवहारास जिल्हाधिकाऱ्याने परवानगी दिली आहे असे अभिप्राय समितीने नोंदविले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, लिजवर असलेल्या जमिनीवरील कारखाना थर्ड पार्टीला विकावयाचा असेल तर, तो राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या परवानगीने विकता येतो. त्या जमिनीची किंमत ५ कोटी रुपयांपर्यंत असेल तर त्याबाबत परवानगी देण्याचे अधिकार राज्य शासनाचा अधिकारी या नात्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेले आहेत. जमिनीची किंमत जर त्यापेक्षा जास्त असेल तर त्या बाबत शासनाकडे परवानगी घ्यावी लागते.

२.१५६. कारखाने विकले जातात, बाजारभावाप्रमाणे जमिनीची किंमत वाढत जाते. प्रथम बँकेच्या वसूलीची वसूली केली जाते. शेतकरी मात्र तसेच राहतात. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे अशी सूचना समितीने केली असता, सन २०१० मध्ये एमएससी बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ज्या कंपनीने केलेल्या मुल्यांकनावर विश्वास बसेल अशा खाजगी कंपनीकडे मुल्यांकनाचे काम द्यावे, त्यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार लिलावाची प्रक्रिया करावी अशा सूचना एमएससी बँकेने दिलेल्या आहेत. त्यानंतरच्या काळात मुल्यांकनासाठी ३ खाजगी एजन्सी नेमण्याची प्रक्रिया होऊन त्यांच्या मार्फत मुल्यांकनाचे काम केले जात आहे. अशा प्रकारे मागच्या २ वर्षांपासून काम सुरू आहे. या अगोदर व्हीएसआय व मिटकॉन मुल्यांकनाचे काम करीत असत. मागच्या दोन वर्षांमध्ये या खाजगी कंपन्यांनी जे काही मुल्यांकन केलेले आहे त्या बाबत असे आहे की, दत्ता असोले या कोल्हापूर येथील कारखान्याचे मुल्यांकन १०८ कोटी रुपयांना केले गेले. कारखान्याची किंमत १०८ कोटी व कर्मचाऱ्यांचे देणे देण्यांकरिता १७ कोटी रुपये अशा प्रकारे एकूण १२५ कोटी रुपये देऊन तो कारखाना दिल्ली येथील खाजगी उद्योजकाने विकत

घेतलेला आहे. दत्ता असोले या कारखान्याचे बँकेला ८० कोटी रुपयांचे देणे आहे. ते देऊन उरलेली रक्कम राज्य शासन व कर्मचाऱ्यांची देणी देण्यासाठी वापरली जाईल. त्यानंतर शिल्लक रकमेतून सभासदांचे ५ टक्के शेअर कॅपिटल देण्याबाबत कारवाई केली जाईल. अशा प्रकारची प्रक्रिया आता सुरू आहे.

२.१५७. साखर कारखान्याच्या जमिनीचा प्लॉट जर एनए असेल आणि भागभांडवलदार शेतकऱ्याला सदर प्लॉट परत दिला तर तो पुन्हा त्यावर प्रत्यक्षामध्ये शेती करू शकणार नाही. तसेच, साखर कारखान्याचा प्लॉट एनए नसेल व तो प्लॉट गृहसंकुल विकासकाला दिला तर तो प्लॉट एनए करून करोडो रुपये कमावेल. या संदर्भात शासकीय पातळीवर कोणत्या प्रकारचे नियंत्रण आहे ? भविष्यकाळातील जमिनींचे वाढते भाव, शहरालगतच्या जमिनींवर होत असलेल्या हाऊसिंग सोसायटीज लक्षात घेता गेल्या चार ते पाच वर्षांपासून काही सहकारी साखर कारखाने संगनमताने विकले गेलेले आहेत. मूळ साखर कारखान्यातील संचालक मंडळ कायम ठेवून नव्याने उभारण्यात आलेल्या साखर कारखान्यामध्ये संचालक मंडळ म्हणून काम करीत आहे. शेतकरी, शेतमजूर व शासन यांनी यामध्ये जे पैसे गुंतविलेले असतात, त्या शेतकऱ्यांना त्याचा मोबदला योग्य बाजारभावाने मिळावयास पाहिजे? तसेच, भाग भांडवलदार म्हणून त्यांनी जी गुंतवणूक केलेली असते, त्याचा योग्य मोबदला मिळावयास पाहिजे त्यामुळे साखर कारखान्याच्या जमिनीचे मुल्यांकन अचुक व योग्य पद्धतीने झाले पाहिजे अशी सूचना समितीने केली कारण शासनाने सहकारी साखर कारखान्याच्या जमिनी विक्रीबाबतच्या धोरणामध्ये अतिशय चांगला बदल केलेला आहे. त्यासंदर्भात कठोर व अचूक अंमलबजावणी झाली तर शासनाचा उद्देश सफल होईल, असे मत समितीने व्यक्त केले.

२.१५८. चार ते पाच वर्षांपूर्वी यवतमाळ, अकोला, बुलढाणा येथील सहकारी साखर कारखाने १६ कोटी रुपयांना विकले गेले. आता मात्र त्यांच्या जमिनींची किंमत २०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचलेली आहे. आता हे साखर कारखाने ज्यांच्या मालकीचे आहेत, त्यांच्याकडे हा सर्व जादा पैसा वर्किंग कॅपिटल म्हणून पडून आहे. परंतु हे कारखाने त्यावेळी जर योग्य भावाने विकले गेले असते तर त्याचा फायदा शासनाला व शेतकरी भागभांडवलदारांना झाला असता. शेतकरी भागभांडवलदार व शासन यांना देय असलेली देणी योग्य मोबदल्यासह विहित वेळेच्या मुदतीमध्ये त्यांना देण्यात आलेली आहे का ? आणि जर नसेल तर ती केव्हा अदा करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

२.१५९. समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, महालेखाकारांनी आक्षेपामध्ये असे म्हटले आहे की, साखर आयुक्तांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. वैधानिक कमीत कमी किंमतीवर प्रदान करण्यासाठी कलम ५ए अंतर्गत शिल्लक नसतांनाही नऊ सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाची अतिरिक्त किंमत दिली. आयुक्तांची पूर्व परवानगी देखील त्यांनी घेतली नव्हती. सन २००१-२००६ कालावधीत या सहकारी साखर कारखान्यांनी दिलेल्या ऊसाची अतिरिक्त किंमत रु.१०७.१४ कोटी रुपये होती. त्यांच्या देय क्षमतेपलीकडे ऊसाची किंमत प्रदान केल्यामुळे मार्च, २००६ अखेर या सहकारी साखर कारखान्यांचा संचयी तोटा रुपये २१३ कोटींनी वाढला सहकारी संस्थांतील रोगट स्पर्धांना प्रतिबंध घालण्यास आयुक्त अपयशी झाले. सन २००४-२००५ व सन २००५-२००६ मध्ये उसाला दर एसएमपीपेक्षा जास्त जास्त दर शुगर कंट्रोल दर ऑर्डरचे कलम ५ अ मधील तरतुदीनुसार दिलेले आहेत. त्याला साखर आयुक्तांची परवानगी नाही.

२.१६०. महाराष्ट्र सहकारी संस्था नियमावली १९६१ च्या नियम ६१ प्रमाणे आर्थिक वर्षांच्या अखेरपासून ४५ दिवसात सहकारी साखर कारखान्यांनी वार्षिक लेखे तयार करावयाचे असतात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८१ नुसार वर्षातून एकदा आयुक्तांवर निबंधक म्हणून लेख्यांचे लेखापरीक्षण करून घ्यावयाची जबाबदारी आहे. शासनाने या संदर्भात अभिप्राय नाही असा मजकूर नोंदविलेला आहे. सहकारी साखर कारखाना अवसायनात काढल्यानंतर बँक सिक्युरिटायझेशन ॲक्ट अंतर्गत ताब्यात घेते. त्यानंतर त्याच्या विक्रीच्या जाहीर निविदा काढल्या जातात. निविदा काढून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणाऱ्यांवर आणि सहकारी साखर कारखाना कमी किमतीने विकणाऱ्यांवर कोणत्या प्रकारची कारवाई शासनाकडून करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय सचिवांकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

२.१६१. २० सहकारी साखर कारखान्यांनी रुपये ४४.०७ कोटींची बुडित कर्जे आणि शंकास्पद कर्जाची तरतूद न करण्याची कारणे काय आहेत याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बुडित कर्जे व संशयित कर्जाची तरतूद करणे सर्वसामान्य स्वीकृत लेखा तत्त्वाप्रमाणे असून सदर तरतूद करण्याबाबत संबंधित सहकारी साखर कारखान्यांना साखर आयुक्त कार्यालयाकडील दि.७.१०.२००४ व दि.१४.६.२००५ च्या पत्राने कळविले आहे. त्यानुसार बऱ्याचशा सहकारी साखर कारखान्यांनी बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद त्यांच्या आर्थिक पत्रकात केलेली आहे. तथापि, संबंधित सहकारी साखर कारखाने व विशेष लेखापरीक्षक यांना बुडीत कर्जे व संशयीत कर्जाची तरतूद करण्यात येते किंवा कसे याची खात्री करण्याबाबत संबंधित लेखापरिक्षकांना सूचना देण्यात आल्या आहेत. सहकारी साखर कारखान्यांना जेवढा नफा होतो. त्यामधील ३० टक्के रक्कम आयकर विभाग, प्रोसेसिंग फी, भागभांडवलदारांचा नफा ट्रान्सफर करण्यामध्ये जातो. उर्वरित नफयाच्या रकमेमधून सर्व प्रकारच्या कर्जांसाठी तरतूद करणे व कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यालयीन सामग्री, मशिनरी मेंटेनन्स याकरिता खर्च केला जातो.

२.१६२. सहकारी साखर कारखान्यांनी दर वर्षी लेखापरीक्षण करणे बंधनकारक असूनही तसे होत नाही. त्यामुळे सर्व लेख्यांमधून नेमक्या नफयाच्या व भागभांडवल गुंतवणूकीमध्ये किती वाढ करणे आवश्यक आहे, याचा अंदाज येत नाही. वर्षानुवर्षे अशाच प्रकारे साखर कारखान्यांचा कारभार असाच चालू असतो. साखर कारखाने हे तोटयात जाऊ लागतात. कंत्राटदारांना द्यावयाच्या रकमांची तरतूद व इतर आवश्यक बाबींची तरतूद करण्यामध्ये साखर कारखाने असमर्थ ठरु लागतात. सरतेशेवटी घायकुतीला येऊन सहकारी साखर कारखाने विकण्याचा निर्णय घेतला जातो असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सहकारी साखर कारखान्यांमध्ये प्रत्येक वर्षी किमान ६०० कोटी रुपयांचे फिक्स्ड कॅपिटल असते. वर्किंग कॅपिटल मात्र १०००-२००० कोटी रुपयांचे असते. यावरील व्याजाकरिता २०० ते २५० कोटी रुपयांची तरतूद सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने करणे आवश्यक आहे. या तरतुदीमुळे शेतकऱ्यांना व कंत्राटदारांना चेक पेमेंट करणे शक्य होते. राज्यामध्ये उपरोल्लेखित कॅपिटल असणारे सहा ते सात सहकारी साखर कारखाने आहेत. कागल येथील सहकारी साखर कारखान्याकडून आयकर विभागाला प्राप्ती कराच्या स्वरुपामध्ये प्रतीवर्षी १५-२० कोटी रुपये दिले जातात. तसेच, पांडुरंग सहकारी साखर कारखाना दरवर्षी आयकर विभागाला ६ कोटी रुपये प्राप्तीकराच्या स्वरुपात देते. वर्किंग कॅपिटल राखीव ठेवून वर्किंग कॅपिटलच्या अगेन्स्ट जेवढे कर्ज बँकेकडून कमी घेता येईल, तेवढा प्रयत्न या कारखान्याच्या संचालक मंडळाने केलेला आहे.

२.१६३. दिनांक ३१ मार्च, २००६ अखेर २२ सहकारी साखर कारखान्यांची रु.२६५८.६५ कोटीची प्रलंबित देणी होती. चाचणी तपासणी केलेल्या सर्व कार्यरत २२ सहकारी साखर कारखान्यांच्या २००५-२००६ च्या ताळेबंदांवरुन निदर्शनास येते की प्रलंबित सांविधिक देणी एकूण रुपये २६५८.६५ कोटी होती. त्यात शासकीय देणी रु.११६.९५ कोटी शासकीय कर्जे २१३.९० कोटी, एनसीडीसी कर्जे रु.६.९८ कोटी रुपये, सभासदांची ऊसाची देय बिले रु.२७७.२० कोटी, इतर देणी धनको / पुरवठादार रु.४९७.९६ कोटी रुपये, तारणी /बीना तारणी कर्जे रु.१४१६.४०, एडीएफ कर्जे रु.६२.९७ कोटी आणि ऊसाच्या बिलातून वसूल केलेली परंतु वित्तीय संस्थांना संवितरीत न केलेली देणी समाविष्ट होती. दोन ते पांच वर्षांपासून ही देणी प्रलंबित होती याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, १४०० कोटी रुपयांपैकी २७३ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. जवळपास २० टक्के वसूली झालेली आहे. वसूली करण्याची कार्यवाही सहकार आयुक्तांकडून सुरू आहे.

२.१६४. परंतू स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद केले आहे की, " सहकारी साखर कारखान्याकडील शासकीय येणे रकमांच्या वसूलीसाठी सन २००७-०८, २००८-०९ या गाळप हंगामात सहकारी कारखान्यांनी उत्पादित केलेल्या साखरेतून रु.२५ प्रती क्विंटल याप्रमाणे वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. " त्यापैकी किती रक्कम वसूल झालेली आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००७-०८, २००८-०९ या गाळप हंगामात सहकारी कारखान्यांनी उत्पादित केलेल्या साखरेतून रु.२५ प्रती क्विंटल याप्रमाणे वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. मागील वर्षी मराठवाड्यात १८००/- रुपये प्रमाणे ऊसाचे पेमेंट केलेले आहे आणि पश्चिम महाराष्ट्रात २,०५०/- रुपये प्रमाणे ऊसाचे पेमेंट केलेले आहे. मागील दोन वर्षांपासून टॅगिंग करून वसूली करावी, असे राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु प्रत्यक्षात वसूली होत नाही.

२.१६५. चाचणी तपासणी केलेल्या कार्यरत २२ सहकारी साखर कारखान्यांनी एकूण रु.१६४.४१ कोटी भाग किंमत भागधारकांकडून वसूल न करण्याची कारणमिमांसा सांगताना विभागीय सचिवांनी विदित केले की, सुरूवातीला सहकारी साखर कारखान्याची भागाची किंमत ३ हजार रुपये होती. त्यानंतर राज्य शासनाने फेस व्हॅल्यू वाढवून ती ५ हजार रुपये केली. मागील वर्षी फेस व्हॅल्यू ५ हजार रुपयांवरुन १० हजार रुपये करण्यात आलेली आहे. ज्यावेळी हा परिच्छेद काढण्यात आला त्यावेळी ३ हजार रुपये फेस व्हॅल्यू होती. भागधारकांकडून ३ हजार रुपयांची सुद्धा वसूली झालेली नाही, असा आक्षेप आहे. भागधारकांकडून ९० टक्के वसूली झालेली आहे. आता शेअर कॅपीटलची फेस व्हॅल्यू वाढविण्यात आलेली आहे.

२.१६६. नाशिक जिल्ह्यातील निफाड व कादवा सहकारी साखर कारखान्यांच्या महाराष्ट्र सहकारी अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये सुरू असलेल्या चौकशीची सद्यःस्थिती माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, निफाड सहकारी साखर कारखान्याने डीसीसी बँकेकडून आणि कादवा सहकारी साखर कारखान्याने एमएससी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे. साखर कारखान्यांसाठी लागणारा कर्ज पुरवठा ते प्रत्येक वर्षी बँकेकडून उपलब्ध करून घेत असत आणि हा कर्ज पुरवठा ३०० कोटी रुपये, ५०० कोटी रुपये असा असायचा. साखरेची विक्री केल्यानंतर त्या रकमेतून प्रत्येक वर्षी कर्जाची वसूली होत असते. सर्वसाधारणपणे एप्रिल ते मार्च हे आर्थिक वर्ष धरले जाते. परंतु सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबर असे असते. निफाड सहकारी साखर कारखान्याला बँकेने पैसे दिलेले आहेत. परंतु कारखान्याच्या आणि बँकेच्या संगनमताने १० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सहकार आयुक्त कार्यालयाकडून लेखापरीक्षकाची नियुक्ती करून याबाबत विभागाने चौकशी केली व त्यानुसार सन २००७ मध्ये निफाड सहकारी साखर कारखान्याच्या ११ संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तथापि फौजदारी गुन्हा दाखल केल्यानंतरही वसूली झालेली नाही. कोर्टात केस दाखल झालेली आहे. चार्जशिट दाखल झाल्यानंतर संबंधितांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांची जामिनावर सुटका झालेली आहे. निफाड सहकारी साखर कारखान्याच्या ११ संचालक, साखर कारखान्याचे १ व्यवस्थापकीय संचालक, बँकेचे २ अधिकारी आणि १ शासकीय लेखापरीक्षक यांच्यावर

फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ज्यावेळी हे निदर्शनास आले त्यावेळी निवडणुका होऊन नवीन संचालक मंडळ नियुक्त झाले होते. परंतु, नवीन संचालक मंडळात जुन्या संचालक मंडळातील काही पदाधिकारी निवडून आलेले आहेत किंवा नाहीत याबाबतची माहिती विभागीय सचिवांकडे उपलब्ध नव्हती पण कलम ८३ अन्वये चौकशी सुरू होती. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात दाखल झाले. उच्च न्यायालयाने या प्रकरणात स्थगितीचे आदेश दिले होते. ती स्थगिती अडीच वर्षे होती. आता ती स्थगिती उठविण्यात आलेली आहे. आता दोन-तीन महिन्यात याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१६७. सन २००६ मधील हे प्रकरण आहे. आता सन २०१२ सुरू आहे. उच्च न्यायालयाने स्थगिती उठविल्याची तारीख तसेच ऑडीटरने काय कार्यवाही केली याबाबत विभागीय सचिवांकडे काहीच माहिती उपलब्ध नसल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सदरहू प्रकरणात विभागाकडून दिरंगाई झाली असल्याने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व समितीने उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती लेखी स्वरुपात समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले.

२.१६८. २५ सहकारी साखर कारखान्यांच्या रु.३३.९३ कोटीच्या थकित हमी शुल्कास बिनव्याजी कर्जात रुपांतर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर कर्ज रकमेच्या वसूलीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, साखर कारखान्यासाठी लागणाऱ्या कर्जास राज्य शासनाच्या वतीने बँकांना हमी दिली जाते. सध्या २ टक्के हमी शुल्क आहे. एमएससी बँकेने १०० कोटी रुपये कर्ज दिलेले आहे. १०० कोटी रुपयांच्या २ टक्के एवढी रक्कम बँकेकडे जमा करावयास पाहिजे. ३३.९३ कोटी रुपये अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. सन २००६-०७ मध्ये थकित असलेल्या हमी शुल्काचे बिनव्याजी कर्जात रुपांतर करावे, असा प्रस्ताव होता. त्यावेळी साखर कारखाने अडचणीत आले होते. त्यावेळी प्रत्येक साखर कारखान्याचे २० ते ३० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. म्हणून त्यावेळी केंद्र शासनाने साखर कारखान्यांना पॅकेज दिले होते. त्यामध्ये ३ प्रकारचे टर्म लोन होते.

२.१६९. रस्ते विकास निधीतील रु.१.४० कोटी रुपयांचा अखर्चित शिल्लक निधीचा परतावा ८ सहकारी साखर कारखान्यांनी केला नाही त्या कारखान्यांकडून सदर निधीच्या वसूलीच्या सद्यःस्थितीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, रस्ते विकासासाठी राज्य शासनाच्या वतीने ५-६ कोटी रुपयांची तरतूद केलेली असते. कारखान्यांकडून ज्या पद्धतीने मागणी येते त्यानुसार निधी देण्यात येतो. कारखान्यांनी २-३ कोटी रुपयांची मागणी केली होती. कारखान्यांना १ कोटी ४२ लाख रुपये देण्यात आलेले आहेत. साखर कारखान्यांनी ही मदत वापरल्यानंतर त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करण्यात येते. त्या आर्थिक वर्षांत ही रक्कम वसूल झाली नाही तर वित्त विभागाकडून मुदतवाढ घेण्यात येते. त्यानंतर पुढील आर्थिक वर्षांत थकित रक्कम वसूल केली जाते.

२.१७०. साखर कारखान्यांनी बँकांकडून हंगामासाठी आणि वाहतुकीसाठी घेतलेले कर्ज परत फेडताना बँकेचे कर्ज प्राधान्याने अदा करण्याबाबतची तरतूद सहकार कायद्यात करावयाची होती. त्यादृष्टीने शासनाने केलेली कार्यवाही व तशा प्रकारची तरतूद कायद्यात केली आहे काय याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्यातरी कायद्यात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु गेल्या वर्षी कारखान्यांना १९८ कोटी रुपयांची कर्जे दिली होती त्या सर्व रकमेची १०० टक्के वसूली झालेली आहे.

२.१७१. सन २००६-०७ मध्ये संत तुकाराम साखर कारखाना मर्यादित पुणे यांच्याकडे रु. ११४१.९१ लाख थकीत असून न्यायाधिकरणाने त्यांना सहामाही २० हप्त्यात परतफेड करण्यास परवानगी देऊन अद्याप ३ हप्ते त्यांनी अदा केले आहेत. सद्यःस्थितीत सदर साखर कारखान्याविरुद्ध वसूलीसाठी कोणती कारवाई करण्यात येत आहे तसेच निफाड सहकारी साखर कारखाना थकहमीवर बँक ऑफ बडोदा यांनी उसतोडणी वाहतूक ठेकेदारांना रु. ४४३.०० लाख एवढे कर्ज मंजूर केले आहे. कारखान्याने कर्जाची रक्कम ठेकेदारांकडून संपूर्णपणे वसूल केली आहे. परंतु कारखान्याने १ ही हप्ता बँकेला भरलेला नाही. कर्जाची रक्कम बँकेला न भरण्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता सदर माहिती नंतर देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

२.१७२. साखर कारखान्यांना कार्बन क्रेडीट मिळाले आहे का याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याला को-जनरेशनचा पायलट प्रोजेक्ट म्हणून कार्बन क्रेडीट मिळाले. आता आपल्याकडे ५० ते ५२ कारखान्यांनी को-जनरेशन प्लांट चालू केलेले आहेत परंतु त्या कारखान्याना कार्बन क्रेडीट मिळालेले नाही. सुरूवातीला प्रायोगिक तत्त्वावर प्लांट चालू केला म्हणून त्यांना दिलेले आहे. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर कारखान्यांनी को-जनरेशन प्लांट सुरू केलेले आहेत. परंतु को-जनरेशनसाठी कारखाने बगॅसचा वापर करतात पण बगॅस वर्षभर उपलब्ध नसते असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, साखर कारखाने चालू असतात तेव्हा को-जनरेशनसाठी स्टीमचा वापर करतात. कारखाना बंद झाल्यानंतर बगॅस वापरुन दोन तीन महिने को-जनरेशन प्लांट चालवून वीज निर्मिती करतात. काही कारखान्यांमध्ये बगॅस शिवाय इतर जे फिल्ड असतात ते वापरण्याची सुद्धा सोय आहे. कोल मिक्स करण्याचे प्रमाण आपल्या राज्यामध्ये नाही. किसनवीर साखर कारखान्याला कार्बन क्रेडीट मिळाले की नाही हे बघावे लागेल. त्यांनी मोठ्या प्रमाणावर बायोगॅस तयार केलेला आहे.

२.१७३. जे बंद कारखाने असतात त्यांच्या मशिनरीचा काय उपयोग केला जातो ? त्या मशिनरीचा दुसरीकडे उपयोग करण्याकरिता काय कार्यवाही केली यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००३-२००४ मध्ये राज्यात काही कारखाने बंद झाले होते. आता चालू हंगामामध्ये १०८ कारखान्यांनी हंगाम घेतलेला आहे. बाकीच्या कारखान्यांनी या वर्षी हंगाम न घेतल्यामुळे ते कारखाने या वर्षी बंद असले तरी पुढच्या वर्षी ऊसाची उपलब्धता असेल तर ते कारखाने पुन्हा चालू होतील. प्रत्यक्षात आपल्याकडे १६२ साखर कारखाने ऑपरेशनमध्ये आहेत. त्यापैकी १०८ कारखान्यांनी या वर्षी हंगाम घेतलेला आहे. राज्यात उभारणीखाली असलेल्या ६ साखर कारखान्यांना मशिनरीची विक्री करावी असे आदेश दिलेले आहेत. ४-५ ठिकाणी मशिनरी हलविणार आहोत. औरंगाबादमधील शरद सहकारी साखर कारखान्याने अमरावती येथून मशिनरी घेतली. धुळे येथील कारखान्याने मशिनरी घेतलेली आहे. दोन तीन ठिकाणी अशा प्रकारची मशिनरी घेतलेली आहे. अंबा सहकारी साखर कारखान्याची मशिनरी सुद्धा दिलेली आहे परंतु त्यांच्या संदर्भात काही लिटिगेशन्स चालू असल्यामुळे कार्यवाही होऊ शकली नाही.

२.१७४. १४ तारखेला जो अध्यादेश काढण्यात आलेला आहे त्यामुळे कायद्यात बदल झाल्याने सहकार विभागाचे अधिकार सुद्धा कमी झाले आहेत याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सहकार विभागाचा जो जुना सहकार कायदा आहे त्यामध्ये जनरल बॉडीला मुदत देणे, निवडणुका पुढे ढकलणे अशा बऱ्याच गोष्टी राज्य शासनाच्या अधिकारामध्ये होत्या पण आता ते सर्व अधिकार गेलेले आहेत. आता जनरल बॉडीला मुदत देता येणार नाही, निवडणुका पुढे ढकलता येणार नाहीत. ज्या सहकारी संस्थेमध्ये शासनाचे शेअर कॅपिटल, कर्ज, शासनाची गॅरंटी असा राज्य शासनाचा कोणत्याही प्रकारचा आर्थिक सहभाग नसेल अशा कारखान्यांमध्ये प्रशासकांची नियुक्ती करणे हे पूर्वी असलेले अधिकार आता नाहीत. शासन एक पॅनल तयार करणार आहे. ऑडीटचे अधिकार विभागाकडे आहेत. आता जनरल बॉडी ऑडीटर नियुक्त करते. यावर लेखापरीक्षकाची नियुक्ती पॅनल मधूनच करावी अशी सूचना समितीने केली.

२.१७५. सहकारी बँकांना पीक कर्जाच्या उद्दिष्टासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे जे डिपॉझीट्स आहेत ते पूर्णपणे सहकारी संस्थांकडून येते. पीक कर्ज आणि शेती कर्ज देणे याला प्राधान्य असते. पीक कर्ज १ वर्षासाठी आणि शेती कर्ज ३ ते ५ वर्षांसाठी असते. प्रोसेसींगसाठी कर्ज पाहिजे असेल तर साखर कारखान्यांना वर्कीन्ग कॅपिटल उपलब्ध करून देतात. प्रत्यक्षात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे १५ हजार कोटी रुपयांची लिक्विडीटी आहे. त्यांना जे मॅनडेट दिलेले आहे त्यामध्ये शेती कर्जासाठी सुद्धा ते पैसे कमी पडतात.

२.१७६. परंतु केंद्राच्या कायद्यामध्ये राष्ट्रीयकृत बँकेत ठेवी ठेवण्याच्या संदर्भात तरतूद असल्याची बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्यक्षात मंत्रिमंडळामध्ये ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी सध्याच्या कायद्यामध्ये सहकारी संस्थांनी त्यांच्या ठेवी किंवा गुंतवणूक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत ठेवावी अशी जी तरतूद आहे तशीच तरतूद सध्याच्या नवीन कायद्यामध्ये ठेवलेली आहे. परंतु त्यामध्ये एक ॲडिशन अशी झालेली आहे की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवी ठेवत असताना त्यांचे गेल्या तीन वर्षांचे ऑडीट 'ए' ग्रेडमध्ये असावयास पाहिजे. पण नवीन कायद्यानुसार राष्ट्रीयकृत बँकेमध्ये पैसे ठेवता येतात असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये सहकारी संस्थांना स्वायत्तता द्यावी असे मॅनडेट आहे. जी एक्सपर्ट कमिटी नियुक्त केली होती त्यांनी सांगितले की, या संस्थांना स्वायत्तता द्यावयाची असेल तर डिपॉझीट कोठे ठेवावे आणि कोठे ठेवू नये असे बंधन घालता येणार नाही. कायदा करीत असताना या बाबत विचारविनिमय होऊन कॅबिनेटने निर्णय घेतला आणि जुन्या कायद्यामध्ये असलेली तरतूद तशीच ठेवली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये डिपॉझीट ठेवावे अशी तरतूद केलेली आहे.

२.१७७. कायदा करीत असताना ही मक्तेदारी होते. ज्या ६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका बुडाल्या तरीही त्या बँकांमध्ये पैसे ठेवावयाचे का ? राष्ट्रीयकृत बँकांमध्ये पैसे ठेवण्याची तरतूद मूळ कायद्यामध्ये असलेल्या मूळ कायद्याला कॅबिनेटची सुधारणा चालू शकते का ? राज्य शासनाचा निर्णय केंद्र शासनाच्या कायद्याला अधिक्रमित करू शकतो का या समितीच्या मुद्यांबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये एक्स्प्लीसीट प्रोव्हीजन नाही. त्यामध्ये एवढीच तरतूद आहे की, सहकारी संस्थांना स्वायत्तता द्यावी. संस्थांनी आपल्या ठेवी कोठे ठेवावयाच्या यावर बंधन ठेवले तर स्वायत्तता असणार नाही. परंतु कॅबिनेटमध्ये या बाबतीत एकमत होऊन ठेवी जिल्हा मध्यवर्ती बॅकांमध्ये आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये ठेवण्याचा निर्णय झाला.

२.१७८. या निर्णयाला आव्हान मिळू शकते कारण ते मूळ कायद्याच्या विसंगत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये अशा प्रकारचे आर्ग्युमेंट आहे की, प्रत्यक्षात सहकारी संस्था ठेवीदारांकडून ठेवी गोळा करीत असताना त्या निधीचा वापर सहकारी चळवळीसाठी व्हावा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कर्ज देण्यासाठी ते पैसे वापरतात. सहकाराच्या विकासासाठी हे पैसे वापरावेत अशी अपेक्षा आहे. ते पैसे बाहेर गेल्यानंतर जी लिक्विडीटी उपलब्ध व्हावयास पाहिजे त्यावर फार मोठा परिणाम होईल.

२.१७९. मागील चार-पाच वर्षांमध्ये साखर कारखान्यांची विक्री झालेली आहे. त्यासंबंधीचा अहवाल अद्याप सभागृहाला सादर झालेला नाही. जे कारखाने मूळ किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकले गेले अशा कारखान्यांच्या संदर्भात सभागृहामध्ये देखील चर्चा झालेली आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, साखर कारखान्यामुळे कोठे कोठे प्रदूषण होत आहे याचा आढावा साखर आयुक्तांना घेण्यास सांगितले आहे. ४ कारखान्यांचा लिलाव केलेला आहे. लिलावानंतर राज्य सहकारी बँकेने २५ टक्के रक्कम घेतलेली आहे. जालना सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत राज्य सहकारी बँकेने अंतिम निर्णय घेतलेला नाही. विक्री करण्याच्या बाबतीत स्टे दिला होता. विक्रीबाबत राज्य शासनाकडे परवानगी मागितली होती. देवगिरी कारखान्याच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने साखर आयुक्तांच्या नियंत्रणाखाली जमीन विक्री करावी असे आदेश दिले. त्यासंदर्भात टेंडर काढले होते. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

२.१८०. परराज्यातील उद्योजक राज्यात उद्योग सुरू करू इच्छित आहेत. परंतु टेंडर स्थानिक वर्तमानपत्रातून दिले जात असल्यामुळे त्यास मोठी प्रसिद्धी मिळत नाही असे समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आम्ही राज्य अणि देशपातळीवरील वर्तमानपत्रातून जाहिरात दिली होती. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पुढील १२-१३ तारखेला विभागाकडून निविदा काढण्यात येणार आहेत. त्यास चांगला प्रतिसाद मिळेल असे वाटते.

२.१८१. दोन लाख चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेली इमारत बांधावयाची असेल तर पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे. आता तर परवानगीसाठी अडीच वर्षे वाट पहावी लागेल असे समजते. पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली नाही तर लोकांनी अडीच वर्षे थांबावयाचे काय .तोपर्यंत जमिनीची किंमत मोठया प्रमाणात वाढल्यामुळे त्यांच्या प्रकल्पाची किंमत देखील भरमसाठ वाढते. प्रकरण सादर केल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून किती दिवसात परवानगी दिली जाते, ठराविक दिवसात मंडळाने परवानगी दिली नाही तर परवानगीशिवाय त्या इमारतीचे काम पूर्ण करावे अशी मंडळाची अपेक्षा आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता सचिव, पर्यावरण विभाग यांनी सांगितले की, सन २००६ मध्ये सीईएसी (स्टेट एक्सपर्ट अप्रायझल कमिटी) व एसइआयएए या दोन समित्या नियुक्त करण्याकरिता नोटीफिकेशन काढण्यात आले होते. सन २००६ मध्ये प्रकल्प मंजुरीकरिता इआयए नोटीफिकेशन काढण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात समित्यांची नियुक्ती सन २००८ मध्ये करण्यात आली. नोटीफिकेशन काढण्यापासून समितीला मंजुरी मिळेपर्यंतच्या मधल्या २ वर्षांच्या कालावधीमध्ये बराच बॅकलॉग शिल्लक राहिला. साधारणपणे एका महिन्यात ४० ते ५० नवीन प्रोजेक्टस मंजुरीकरिता येतात. अशा प्रकारे त्यावेळी जवळजवळ ३५० प्रकरणे प्रलंबित राहिली होती. सीईएसी ने दिलेले रिकमेंडेशन दुसऱ्या कमिटीकडे पाठवले जातात. त्यानंतर दुसऱ्या कमिटीकडून प्रकरणाला मंजुरी दिली जाते. विभागाकडून बरेच प्रयत्न करून प्रलंबित प्रकरणांची संख्या जवळजवळ १०० वर आणली होती. या नंतर पहिल्या कमिटीची मुदत ३ वर्षांची असून ती या कालावधीमध्ये संपली. दुसऱ्या कमिटीचे नोटीफिकेशन काढण्याकरिता केंद्र शासनाला ६ महिन्याचा विलंब झाला. त्यामुळे पुन्हा प्रलंबित प्रकरणांची संख्या बरीच वाढली. यावेळी प्रलंबित प्रकरणे ५०० झाली. प्रकरणांना मंजुरी देण्याकरिता एवढा विलंब का होत आहे, या बद्दल उच्च न्यायालयाने देखील पर्यावरण विभागाकडे विचारणा केली होती. यानंतर पर्यावरण विभागाने समितीमध्ये काम करणाऱ्या तज्ञ मंडळींना समितीची बैठक महिन्यातून १० दिवस घेऊन प्रलंबित प्रकरणांची संख्या लवकरात लवकर कमी करण्याची सूचना केली. प्रलंबित प्रकरणांची संख्या ३ महिन्यापर्यंत कमी करण्याकरिता बरेचसे प्रयत्न केले गेले.

२.१८२. प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी ही कमिटी महिन्यातील ३० दिवस काम करीत नाही असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत विभागाकडून वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. समितीमध्ये काम करणारे तज्ज्ञ ३० दिवस काम करण्यास तयार नाहीत. त्यांना महिन्याचा पगार न देता प्रत्येक बैठकीकरिता १५०० रुपये याप्रमाणे मानधन दिले जाते.

२.१८३. पर्यावरण विभागाने ६० दिवसात व कमिटीने ४५ दिवसात निर्णय घ्यावा, अशा प्रकारे नियम असूनही विहित मुदतीमध्ये परवानगी दिली जात नाही. या मुदतीमध्ये एखाद्या प्रकल्पाला परवानगी न दिल्यास त्याबाबत कळविले गेले पाहिजे. मात्र विभागाकडून काहीच कळवले जात नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,याकरिता कायद्यामध्ये बदल करावा लागेल. कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, १०५ दिवसात परवानगी देण्यात यावी. मात्र या मुदतीत परवानगी दिली जात नाही. तसेच बरेचदा स्थानिक संस्था किंवा नगरपालिका ज्या परवानग्या देतात, त्याच परवानग्या पुन्हा पर्यावरण विभागाकडून दिल्या जातात. यामुळे एकच काम दोनदा केले जाते व त्याकरिता खूप वेळ वाया जातो. यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या ६२० प्रकरणे प्रलंबित असून ही प्रकरणे १८ महिन्यांपूर्वीची आहेत. सध्या दोन कमिट्या अस्तित्त्वात असून प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्याकरिता नवीन तिसरी कमिटी तयार केली आहे. तसेच चौथी कमिटी तयार करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. कमिटींची संख्या वाढल्यामुळे प्रकरणे विभागली जातील व प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होण्यास मदत होईल. सर्व पूर्तता केलेली असल्यास पर्यावरण विभागाकडून ६० दिवसांत कार्यवाही पूर्ण होते. ॲथोरिटीकडे सध्या एकही प्रकरण प्रलंबित नाही. समितीस्तरावर प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रकरण सादर केल्यानंतर समितीने ४५ दिवसांत निर्णय न घेतल्यास ही प्रकरणे एसईएसीकडे जातात. या समितीने स्क्रुटीनी केल्यानंतर कम्प्लायन्सची आवश्यकता असल्यास त्याबाबत सांगितले जाते. हे काम पर्यावरण विभागाचे उप सचिव बघतात. तसेच प्रलंबित प्रकरणांची संख्या पाहता आता एकूण ४ समित्या नियुक्त केल्या जाणार आहेत.

२.१८४. चौथी समिती केव्हा पासून नियुक्त केली जाणार आहे कारण समित्यांची संख्या वाढवली जाणार आहे, हे गेल्या दीड वर्षांपासून सांगण्यात येत आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागिय सचिवांनी सांगितले की, संपूर्ण देशात केवळ महाराष्ट्रामध्येच ३ समित्या आहेत, इतर राज्यामध्ये १ किंवा २ समित्या आहेत.

२.१८५. समितीमधील तज्ज्ञांना काम करण्यासाठी वेळ मिळत नाही. यामुळे लवकरात लवकर परवानगी मिळू शकत नाही. ज्या तज्ज्ञांना काम करण्यास वेळ उपलब्ध आहे, अशा तज्ज्ञांना का नियुक्त केले जात नाही याबाबत खुलासा करताना विभागिय सचिवांनी सांगितले की, ज्या तज्ज्ञ मंडळीचा कोणताही वैयक्तिक लाभ नाही, अशांनाच साधारणपणे समितीवर निवडले जाते. समितीवर नियुक्त करताना त्यांच्याकडून लेखी माहिती घेतली जाते. अनेकांचा बायोडेटा आमच्याकडे येतो, मात्र ते इतर ठिकाणी देखील कार्यरत असल्यामुळे त्यांच्या नियुक्तीवर बरीच बंधने येतात. केंद्र शासनाने डॉ.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नियुक्त केला होता. रिअल इस्टेट प्रोजेक्टकरिता पर्यावरण विभागाच्या मंजुरीची आवश्यकता नाही, असे या अभ्यास गटाने निष्कर्ष काढला तर या संधीचा आपल्याला उपयोग करून घेता येईल.

२.१८६. पर्यावरण विभागाने परवानगी दिल्यानंतर देखील एसटीपी चालवला जात आहे की नाही, त्याची क्षमता काय आहे इ. गोष्टी तपासल्याच जात नाहीत. कारण तशा प्रकारे तपासणी करण्याची पर्यावरण विभागाकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागिय सचिवांनी सांगितले की, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन इ. बाबी तपासण्याचे काम नगरपालिकांचे आहे. या सर्व गोष्टी नगरपालिकांनी तपासल्या पाहिजेत.

२.१८७. सध्या प्रलंबित प्रकरणांची संख्या ३०० आहे. एका वर्षात साधारणपणे ५० ते १०० प्रकरणांवर निर्णय घेतला जातो. पर्यावरण कायदा केंद्र शासनाचा आहे. या समित्या देखील केंद्र शासनाकडून मॉनीटर केल्या जातात. आता समित्यांच्या बैठकांची संख्या वाढवली आहे, मात्र त्याचबरोबर वाढत्या शहरीकरणामुळे २ लाख स्क्वे.फू.पेक्षा अधिक बांधकाम करणाऱ्यांची संख्या देखील सतत वाढत आहे. २ लाख स्क्वे.फू.बांधकामाची मर्यादा निश्चित केलेली असली तरी देखील बऱ्याच ठिकाणी साधारणपणे निम्म्या जागेवर पार्कींग असते. बांधकामांची संख्या वेगाने वाढत असताना पर्यावरण विभागाची परवानगी मिळवण्याकरिता विकासकांना ४ ते ५ वर्षांची वाट पाहावी लागते. जमिनीचे दर सतत वाढत आहेत. अशा परिस्थितीत मंजुरी मिळण्यास विलंब होण्याची बाब योग्य नाही.

२.१८८. या संदर्भात केंद्र शासनाचे कोणते कायदे आहेत, कोणत्या मंजुरीची आवश्यकता असते, कमिटीचे निकष काय आहेत, समितीच्या किती बैठका होणे आवश्यक आहे, सध्या समितीकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत. सध्या प्रकल्पाला नगरपालिकेकडून जी परवानगी दिली जाते, तीच परवानगी पर्यावरण विभागाकडून देखील दिली जाते. प्रकल्पाला परवानगी देण्याकरिता नगरपालिकेच्या व्यतिरिक्त पर्यावरण विभागाने काही वेगळी प्रमाणके निश्चित केलेली आहेत काय ? इ. सर्व बाबींची माहिती समितीला सादर करावी. प्रलंबित प्रकरणांची संख्या अधिक असल्यामुळे समितीमधील तज्ज्ञांची संख्या वाढवली पाहिजे. सध्या समिती सदस्य देखील एक उत्पन्नाचे साधन या दृष्टीनेच समितीमध्ये काम करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

२.१८९. पर्यावरण विभागाच्या संदर्भात राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी केंद्र शासनाशी चर्चा करून या नियमांमध्ये शिथिलता आणली पाहिजे. सर्व गोष्टींची पूर्तता झालेली असेल तर लवकरात लवकर प्रकल्पाच्या कामाला परवानगी दिली गेली पाहिजे. पूर्तता केलेली नसल्यास जो दंड आकारला जातो, त्याची रक्कम आपण वाढवू शकता. मात्र काही किरकोळ गोष्टींमुळे ३-३ वर्षे बांधकामाला मंजुरी मिळत नाही. हे आपल्या राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय धोकादायक आहे. अशीच परिस्थिती राहिली तर कोणीही बांधकाम करण्यास तयार होणार नाही. हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

२.१९०. पुणे, पिंपरी, चिंचवड या राज्यातील महत्त्वाच्या शहरामध्ये सध्या मोठया प्रमाणात बांधकाम होत आहेत. वेळेत परवानगी न दिल्यामुळे अनेक लोक बेकायदेशीरपणे बांधकामास सुरूवात करतात. यामुळे परिस्थिती आणखी बिकट होते. या संदर्भात केंद्र शासनातील अधिकाऱ्यांना भेटावे लागेल. समितीमधील तज्ज्ञ व्यक्तींना एका बैठकीकरिता १५०० रुपये इतके तुटपुंजे मानधन दिले जाते. यामुळे ते अधिक वेळ काम करण्यास उत्सुक नसतात. असे मत समितीने व्यक्त केले.

२.१९१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यात आहे. केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या समित्या व प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रमाणके सर्वोच्च न्यायालयाने ठरविलेली आहेत काय, समितीमधील सदस्य कोण आहेत ? गेल्या वर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संचालकांवर केस दाखल केली गेली होती. त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. संचालकच चुकीची कामे करीत असतील तर ते एकूण कामकाजावर योग्य प्रकारे नियंत्रण करू शकतात काय? पर्यावरण विभागातील अधिकारी या समितीमध्ये कार्यरत आहेत काय ? सध्या अनेक प्रकल्पांना पर्यावरण विभागाची मंजुरी मिळण्यास २ ते ३ वर्षे विलंब होतो. परवानगी देण्याकरिता प्रदूषण मंडळ व नगर विकास विभागाची भूमिका काय आहे, प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी काय केले पाहिजे, त्याकरिता केंद्र शासनाकडे काय प्रस्तावित करावयाचे आहे या

संदर्भातील सविस्तर माहिती समितीला द्यावी.असे निदेश समितीने विभागास दिले एखाद्या प्रकल्पाच्या मंजुरीकरिता पर्यावरण विभागाकडे अर्ज केल्यानंतर अशी यंत्रणा हवी की, पर्यावरण विभागाचे अधिकारी त्वरित साईटवर जाऊन तेथील प्लांटला भेट देतील. निकषाप्रमाणे तेथे काही बाबी पूर्ण केलेल्या नसल्यास मंजुरी देऊ नये असे अभिप्राय नोंदवतील असे मत समितीने व्यक्त केले.

२.१९२. याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, लवकरात लवकर चौथी कमिटी तयार करणे हा एक पर्याय आहे. तसेच रिअल इस्टेट प्रोजेक्टकरिता पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नाही, ही बाब राज्य शासनाने सांगितली पाहिजे. रिअल इस्टेट प्रोजेक्टला परवानगी देण्याकरिता पर्यावरण विभागाच्या कोणत्याही रोलची आवश्यकता नाही. सांडपाणी, घनकचरा इ. कामे नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांची आहेत. सदर विषय महत्त्वाचा असून समिती याबाबत शिफारस करीत आहे. प्रकल्पांच्या संदर्भातील डिले कमी करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील या संदर्भात संबंधितांना पत्र पाठविले आहे.

२.१९३. संपूर्ण देशात पर्यावरणाच्या संदर्भातील नियम एकच आहे. केंद्र शासनाने या संदर्भात किती समित्या गठित कराव्यात, असे काही सांगितले आहे काय याबाबत सचिवांनी खुलासा केला की, केंद्र शासनाने या संदर्भात फक्त २ समित्या गठित करण्यासाठी परवानगी दिली होती. आता तिसरी समिती गठित झाली आहे. अजून दोन समित्या गठित करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. समिती विभागनिहाय असली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवांनी खुलासा केला की, सुरूवातीला संपूर्ण राज्यासाठी एक समिती होती. आता एमएमआरडीए क्षेत्रासाठी स्वतंत्र समिती केली आहे. एमएमआरडीए क्षेत्रातील उद्योग प्रकल्पांसाठी १ समिती, मुंबईतील बांधकामांच्या संदर्भात १ समिती व मुंबई बाहेरील बांधकामांच्या संदर्भात १ समिती अशा समित्या होणार आहेत. समितीमध्ये संमंत्रक नियुक्त करण्यासंदर्भात पर्यावरण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, रेप्युटेड ॲकॅडेमी, इन्स्टिट्यूट यांच्याकडून एक्सपर्ट मागवतो. आर्किटेक्चर, सॉलिड बेस, लॅण्ड स्केपिंग अशा प्रत्येक फिल्डच्या एक्सपर्टसना आमंत्रित करण्यात येते.

२.१९४. पर्यावरण विभागाच्या खुलाशानुसार ६०० प्रकल्प प्रलंबित आहेत. ते केव्हा पूर्ण होतील अशी विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, एका वर्षाचे टाईमटेबल तयार केले आहे. दोन्ही समित्यांनी जास्तीत जास्त बैठका घ्यायच्या आहेत आणि त्याप्रमाणे एक वर्षात म्हणजे मार्च, २०१४ पर्यंत एक महिन्याची प्रलंबितता कमी करता येऊ शकेल.

२.१९५. अडीच लाख चौ.फू. बांधकामाला परवानगी देण्यासाठी २ वर्षे लागतात. सीसी मिळण्याच्या अगोदरच विचारणा केली पाहिजे आपण यासंदर्भात मानीव परवानगी दिली पाहिजे. त्यामुळे प्रकल्प रखडणार नाहीत. आपणास तसे करता येईल का असे समितीने विचारले असता सचिवांनी समितीस असे सांगितले की, कायद्यामध्ये अशी तरतूद नाही. परंतु, उच्च न्यायालयाकडून अशा ३ प्रकरणांमध्ये परवानगी देण्यात आली आहे.

२.१९६. सदर प्रकल्प एसआरएचा होता. तेथील लोक ३ वर्षांपासून संक्रमण शिबिरात राहत होते. त्यामुळे उच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या संदर्भात परवानगी दिली असून म्हाडाला देखील अशा प्रकारे परवानगी दिली आहे याबाबत उच्च न्यायालयाने ही बाब सामाजिक असल्याचे सांगितले लोक कित्येक वर्षे संक्रमण शिबिरात राहत आहेत. त्यामुळे रिहॅबसाठी त्यांना परवानगी देण्यात आली. समितीने अशी विचारणा केली की, शैक्षणिक संस्थांना परवानगी का देत नाही ? ती देखील सामाजिक बाब आहे त्यावर सचिवांनी खुलासा केला की, एसआरए, रिडेव्हलपमेंट, जूने प्रकल्प यांना प्रायॉरिटी दिली जाते आणि त्यानंतर बाकीच्या प्रकल्पांचा विचार केला जातो.

२.१९७. समितीचे सदस्य सचिव आहेत. समितीच्या ४ दिवस बैठका होतात. बाकीच्या वेळी ते काय काम करतात ? कोणाला यासंदर्भात विशेषाधिकार आहे का यावर सचिवांनी खुलासा केला की, सदस्य सचिव हे पर्यावरण विभागाचे उप सचिव असतात. ते समितीचे काम करतात आणि त्यानंतर नॉर्मल उप सचिवाचे काम करतात. एसआरए, रिडेव्हलपमेंट, जूने प्रकल्प व ग्रीन बिल्डिंग यांना अगोदर परवानगी दिली जाते. परवानगीच्या संदर्भात त्यांना अग्रक्रम दिली जाते. कारण विशेषाधिकार माननीय मंत्री महोदयांना असल्याचे या सर्व गोष्टी माननीय मंत्री महोदयांच्या कार्यसूचीमध्ये दाखल करण्यात येतात.

२.१९८. समित्यांचे चेअरमनबाबत माहिती देताना सचिवांनी असे सांगितले की, त्यांचे चेअरमन हे सर्व बाहेरचे लोक आहेत. एका समितीचे चेअरमन श्री. बुद्धीराजा आहेत, जे पूर्वी प्रशासनामध्ये अतिरिक्त मुख्य सचिव होते आणि दुसऱ्या समितीचे चेअरमन हे डॉ. देवता आहेत, जे नेरीचे डायरेक्टर आहेत. या सर्व मुद्यांच्या संदर्भातील माहिती लेखी द्यावी. या सर्व गोष्टी गांभीर्याने घेऊन या संदर्भात पर्यावरण विभागाने कार्यवाही करावी असे मत समितीने व्यक्त केले.

२.१९९. जुन्या सरकारी इमारतींचे बांधकाम जवळपास २ लाख २० हजार चौ.फू आहे. त्या ठिकाणी एसटीपी बसविण्याची गरज आहे. या संदर्भात कायद्यात तरतूद आहे का असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, जुन्या इमारती असतील तर त्यांना अशी गरज नाही. म्हणजे सन २००७ च्या अगोदरच्या इमारतींना पर्यावरण विभागाची मान्यता घेण्याची गरज नाही. समितीने अशीही विचारणा केली की, राज्यात किती महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये एसटीपी बसविण्यात आले आहेत या संदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी. ज्या महानगरपालिकांनी एसटीपी बसविले नसतील, त्यांना केंद्र शासनाने अनुदान देऊ नये. बसविण्यात आलेल्या एसटीपींपैकी किती कार्यान्वित झाले आहेत, त्या संदर्भात अहवाल तयार केला आहे का, त्या संदर्भात आपण नगरविकास विभागाला कळविले आहे का, याबाबत संबंधित नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडून स्पेसिफिक माहिती समितीला देण्यात यावी.

२.२००. एसटीपी बसविणे हा खूप मोठा प्रश्न आहे. या संदर्भात पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांवर यांनी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तत्संदर्भात केस सुरू आहे. पाण्याचे रिसायकलिंग करून पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त कारणांसाठी ते वापरता येईल का, हे पाहिले पाहिजे. बऱ्याच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रायॉरिटी नसल्यामुळे एसटीपी बंद स्थितीत आहेत.

२.२०१. शहरामध्ये इतर सर्व प्रकल्प पूर्ण होतात परंतु एसटीपी पूर्ण होत नाहीत. या संदर्भात पुण्यातील एक उदाहरण सांगण्यात आले की पाण्याचे रिसायकल करून ते साठविण्यासाठी टँक बांधला आहे. परंतु, फक्त काही मीटर पाईपलाईन टाकणे शिल्लक राहिल्यामुळे ते काम रखडले आहे. एसटीपी संदर्भात शासननिर्णय /नोटीसा निघूनही काही फरक पडलेला नाही. फौजदारी गुन्हे देखील दाखल केले आहेत. आपल्याकडील पिण्याच्या पाण्याचे दुर्भीक्ष लक्षात घेऊन पाण्याचे रिसायकलिंग करून पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर विविध प्रकल्पांसाठी हे पाणी वापरता येऊ शकते. पिण्याचे पाणी हे नैसर्गिकच लागते. परंतु, रिसायकल केलेले पाणी बागांना देण्यासाठी, गाड्या धुण्यासाठी वापरता येऊ शकते. परंतु, या संदर्भात आपल्या देशात कडक कायदा नाही. कोल्हापूर, पुणे, इचलकरंजी या ठिकाणी या संदर्भात संबंधित सर्वांवर गुन्हे दाखल झाले आहेत. डेंग्यूने एक आरडीसी मरण पावला आहे. दूषित पाण्यामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत आहे.

२.२०२. पुण्यात कोरेगाव पार्क येथे रजनिश ओशोंच्या आश्रमशात अशा प्रकारे पाणी रिसायकल करण्याचा प्लँट आहे. तेथे रिसायकल केलेले पाणी गार्डनिंगसाठी वापरले जाते. तेथे नाला बंडिंग देखील केले आहे. नाल्यातील पाणी प्लँटमध्ये रिसायकल करून ते पुन्हा गार्डनिंग किंवा इतर गोष्टींसाठी वापरले जाते. याला फायटोरिटी ट्रिटमेंट म्हणतात. ४-५ नगरपालिका असा प्रयोग करीत आहेत यावर समितीने असे मत व्यक्त केले की, रजनिश ओशो यांचे खाजगी आश्रम हे करू शकते तर मग शासन का करू शकत नाही कारण असे प्रयोग पूर्वी केले आहेत. परंतु, ते यशस्वी झालेले नाहीत. मोठ्या प्रमाणात असे करणे शक्य नाही. लहान प्रमाणात केले जाऊ शकते.

अभिप्राय व शिफारशी

३.१. पर्यावरणीय संरक्षणाच्या निगमांच्या जबाबदाऱ्या (C.R.E.P) या सनदीमधील तरतुदींचे पालन सहकारी साखर कारखान्याकडून करून घेण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करीत असते. यासंदर्भात मार्च, २००३ मध्ये स्वाक्षरीत झालेल्या सनदीनुसार मळीवर आधारित आसवन्यांची पर्यावरणीय मानके आणि प्रदूषकांचे विसर्जन वातावरणात शून्यावर आणण्यासाठी डिसेंबर, २००० पर्यंत आणि त्यानंतर डिसेंबर, २००७ पर्यंत वाढविलेल्या मुदतीत कालबद्ध पद्धतीने साध्य करावयाची होती. याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक निर्देशामध्ये (Guidelines) प्रेसमडच्या मदतीने स्पेंट वॉशचे कंपोस्टमध्ये रुपांतर कॉंक्रीटच्या अभेद्य सपाटीवर करणे, स्पेंट वॉश स्टोअर करण्यासाठी कॉंक्रिटचे लगून तयार करणे आणि साखर कारखान्यांकडून बँक गॅरंटी घेणे ह्या बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. सदरहू तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या साखर कारखान्याची बँक गँरटी जप्त करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना देण्यात आले आहेत.

३.२. डॉ.व्ही.व्ही पाटील, सहकारी साखर कारखाना, नगर, जय भवानी सहकारी साखर कारखाना, बीड, निफाड सहकारी साखर कारखाना, नाशिक, राजाराम बापू सहकारी साखर कारखाना, सांगली, समर्थ सहकारी साखर कारखाना, जालना, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर, बैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, बीड या सात सहकारी साखर कारखान्यांच्या आसवान्यांमधून विसर्जित करण्यात येत असलेले स्पेंट वॉश अभेद्य सपाटीवर न करता थेट जमिनीवर सोडून कंपोस्ट करीत होते असे अभिप्राय महालेखापालांनी व्यक्त केले आहेत.

३.३. समितीसमोरील साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी नमूद केले की, या साखर कारखान्यांची दोन लाख रुपये बँक गॅरंटी ३१ डिसेंबर, २०१२ पर्यंत असून जयभवानी साखर कारखान्याचे डिसेंबर, २०१४ पर्यंत संमतीपत्र आहे. बँक गॅरंटी घेण्यामागे उद्देश नदीमध्ये स्पेंट वॉश मिळाल्याची तक्रार प्राप्त झाल्यास तसेच प्रदूषणावर आळा बसावा याकरिता आवश्यक असलेली उपकरणे व साधन सामुग्री (Devices and equipments) यामध्ये कमतरता आढळल्यास बँक गॅरंटी जप्त करण्यात येते.

३.४. यासंदर्भात समितीने निदर्शनास आणले की, प्रदूषणामुळे सर्वसामान्य नागरिकांना होत असलेल्या त्रासासंदर्भात मोठया प्रमाणात आंदोलने झाली आहेत त्यामुळे संबंधित सहकारी साखर कारखान्यांची बँक गॅरंटी जप्त करण्याव्यतिरिक्त वातावरण प्रदूषण विरहित कसे राहिल

याची काळजी घेणे आवश्यक आहे. संबंधित साखर कारखान्याची बँक गॅरंटी जप्त करण्याशिवाय कारखाना बंद करण्यासंदर्भात कारवाई केली पाहिजे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले. **केवळ उपकरणे व साधन सामुग्री (Devices and equipments) यांची कमतरता आढळल्यास बँक गॅरंटी जप्त करणे हे उचित नसून प्रदूषणाकरिता ज्या काही इतर बाबी कारणीभूत ठरतील अशा सर्व समावेशक बाबींकरिता बँक गॅरंटी घ्यावी, बँक गॅरंटीची सध्याची दोन लाख रुपये ही रक्कम अत्यल्प असून सहकारी साखर कारखान्यांकडून जास्तीत जास्त बँक गॅरंटी घेण्यात यावी. बँक गॅरंटीची रक्कम वाढविण्याबाबत शासनाने आणि प्रदूषण नियंत्रक मंडळाने एकत्रित निर्णय लवकरात लवकर घ्यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

३.५. साखर कारखान्याचे प्रदूषण रोखण्यासंदर्भात न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिला आहे. यामध्ये मे.वेल्होर सिटीझन वेलफेअर फोरम विरुद्ध भारत सरकार आणि इतर, याचिका क्र. ९१४/१९९१ यामधील निदेशानुसार प्रदूषणास जबाबदार साखर कारखान्यांकडून उचित नुकसान- भरपाई घेण्यात यावी तसेच प्रदूषण रोखण्याकरिता नियमानुसार आवश्यक असलेल्या साधन सामग्रीसह इतर आवश्यक बाबींची पुर्तता करेपर्यंत कारखान्याचा परवाना स्थगित ठेवण्यात यावा असा निर्णय दिलेला आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उपरोक्त नमूद सातही साखर कारखान्यांकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांची (Guidelines) पूर्तता जोपर्यंत केली जात नाही तोपर्यंत त्यांचे परवाने स्थगित ठेवण्यात यावेत अशीही समितीची शिफारस आहे.

३.६. त्याचबरोबर अटी व शर्ती याची पूर्तता न केलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादनावरही बंदी आणावी व ज्या सहकारी साखर कारखान्यांकडे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा नसेल तसेच त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन केले असेल तर त्यांच्याकडून दिलेले अनुदानही परत घेण्यात यावे, तसेच प्रदूषणाचे शुन्य निकसन (Zero Discharge) करण्याचे निर्देश सी.आर.ई.पी. या मार्गदर्शक तत्त्वानुसार सर्व साखर कारखान्यांकरिता सक्तीचे करण्यात यावे आहे अशी समितीची शिफारस आहे.

३.७. नगरपरिषदांनी मूलभूत पर्यावरणाचे जतन व संरक्षण करण्याकरिता नगरपरिषदांनी मूलभूत पर्यावरण यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. यामध्ये सीवेज ट्रिटमेंट प्लँट उभारणे यासारख्या बाबी अंतर्भूत आहेत. नगरपरिषदांकडून यासंदर्भात उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळामार्फत कारवाई करण्यासंदर्भात कायदयामध्ये ठोस तरतुदी नाहीत. **राज्यशासनाने नगरपरिषदांना अनुदान देताना पर्यावरण राखण्यासंदर्भात संबंधित नगरपरिषदेने मूलभूत पर्यावरण यंत्रणा प्रस्थापित केली किंवा नाही ही बाब प्रामुख्याने विचारात घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच शहरामध्ये मोठया प्रमाणात होणाऱ्या नागरीकरणामुळे सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांटकरिता खास बाब म्हणून जर महानगरपालिकेला जागा उपलब्ध करून दिली तर प्लांट कार्यान्वित करणे सोयीचे होईल व त्या भागामध्ये कारखान्यांपासून होणारे प्रदूषणही कमी होईल असे मत समितीने व्यक्त केले यासंदर्भात शासनाच्या संबंधित विभागाने महानगरपालिकेला आवश्यकतेप्रमाणे सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांटकरिता खास बाब म्हणून जमीन उपलब्ध करून देण्यासंदर्भात पर्यावरण विभागाच्या संमतीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८. स्पेंटवॉशच्या १००% वापराचे उद्दीष्ट साध्य करणे आणि लाईड लगून मध्ये साठवलेले स्पेंट वॉश पावसाळयात नियंत्रित पद्धतीने सोडणे, नवीन आसवण्या व जुन्या आसवण्यांचे आधुनिकीकरण करताना शून्य निकसन करावे याकरिता साखर आयुक्तांनी यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी समिती नेमली त्यानुसार समितीने एकूण ३९ प्रकल्पाच्या बाबतीत छाननी करून शिफारशी केल्या. समितीच्या शिफारशीनुसार सदरहू प्रकल्पांना राज्य शासनामार्फत १०१ कोटी ७० लाख ५३ हजार रुपयांची मदत करण्यात आली. यानुषंगाने समितीने सदरहू कारखाने प्रदूषणरहीत आहेत काय अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी नमूद केले की, महाराष्ट्रात एकूण ८७ डिस्टीलरीज आहेत. यापैकी ७७ डिस्टीलरीज या साधनसामग्रीच्या बाबतीत परिपूर्ण आहेत. ५ पार्शली कम्प्लाईड आहेत. ५ नॉन कम्प्लाईड आहेत. अशा डिस्टीलरीज कडून बँक गॅरंटी घेऊन त्यांना मार्गदर्शक निर्देशांची (Guidelines) पूर्तता करण्यासंदर्भात सांगण्यात आले आहे. वसंतदादा सहकारी साखर कारखाना, दौलत सहकारी साखर कारखाना, भोगावती सहकारी साखर कारखाना यांनी विभागाने सुचविलेल्या निर्देशाचे पालन केले नसल्याचेही समितीच्या निदर्शनास आणले. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा संबंधित साखर कारखान्यांमध्ये उपलब्ध आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरिता, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे साखर कारख्यान्यांची पाहणी करण्याकरिता काय यंत्रणा आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यामध्ये एकूण १२ रिजनल ऑफीसर आहेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये उपप्रादेशिक अधिकारी आहेत आणि त्यांच्या नियंत्रणात २०० फिल्ड अधिकारी आहेत. तांत्रिक स्वरूपाचे ४०० कर्मचारी आहेत. सद्यस्थितीमध्ये विभागाकडे कर्मचारी वर्ग अतिशय अपूरा असून आणखी नव्याने ५७० पदांच्या भरतीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. आजारी व तोटयात चाललेल्या कारखान्यांना प्रदूषण नियंत्रणासंदर्भात यंत्रणा उभी करण्याकरिता शासनामार्फत भरघोस मदत करण्यात आली असली तरीही त्यापैकी तीन कारखान्यांनी अद्यापही सूचनांचे पालन केले नाही. **वसंतदादा सहकारी साखर कारखाना, दौलत सहकारी साखर कारखाना, भोगावती सहकारी साखर कारखाना यांना झिरो डिसचार्ज समितीच्या शिफारशीनुसार देण्यात आलेले अनुदान त्वरित परत घेण्यात यावे तसेच अटींचे उल्लंघन केल्यासंदर्भात आर्थिक दंड सुद्धा वसूल करण्यात यावा. तसेच पर्यावरण पुरक उपकरणे व साधन सामुग्रीने पार्शली कम्प्लाईड असलेल्या ५ डिस्टीलरीज तसेच ५ नॉन कम्प्लाईड डिस्टीलरीज यांची बँक गॅरंटी त्वरीत जप्त करण्यात यावी तसेच सदरहू डिस्टीलरीज पर्यावरण पुरक साधन सामग्रीने**

परिपूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांचा परवाना स्थगित ठेवण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत द्यावी अशीही समितीची शिफारस आहे.

३.९. साखर कारखाने हे बहुदा शेतीसमृद्ध परिसरात असतात. बहुतांश साखर कारखाने हे सप्टेंबर ते मार्च या कालावधीत चालू असतात व त्यावेळेस शेतीसाठी पाण्याची भरपूर मागणी असते. साखर कारखान्यात निर्माण होणारे सांडपाणी नदीत सोडण्याची परवानगी दिली जात नसल्यामुळे कारखान्यांचे प्रक्रिया केलेले सांडपाणी हे कारखान्याच्या आजूबाजूच्या परिसरात शेतीसाठी वापरले जाते. काही वेळेस कारखान्यांनी प्रक्रियायुक्त सांडपाण्याचे व्यवस्थापन योग्य न करता सदर पाणी शेतामध्ये सोडले जाते व त्या पाण्याचा निचरा होऊन नदीत मिसळण्याची शक्यता असते. तसेच प्रक्रिया न केलेले सांडपाणी काही कारखाने परवानगी नसतानाही नदीत सोडून देतात. प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदीत सोडल्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. प्रदूषित पाणी पिण्यास वापरले जाणे व शेतीसाठी वापरले जाणे हे आरोग्यास घातक आहे. तसेच यामुळे निसर्गाचा समतोल बिघडतो. यासाठी साखर कारखान्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वारंवार लेखी सूचना देण्यात येतात. परंतु त्याकडे काही साखर कारखाने दुर्लक्ष करून नियमांचे उल्लंघन करीत असतात. त्यामुळे अशा साखर कारखान्यांविरुद्ध कडक कारवाई होणे आवश्यक आहे. **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ज्या साखर कारखान्यांनी संबंधित अधिनियम/नियम यामधील तरतुदींचे उल्लंघन केले असेल व नमूद तरतुदी अंतर्गत सूचना देऊनही त्यांचे पालन होत नसल्याने संबंधित अधिनियम/नियमात सुधारणा करणे आवश्यक आहे. कठोर तरतुदींचा अंर्तभाव अधिनियम/नियमात करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमानुसार संबंधित साखर कारखान्याविरुद्ध कारवाई केली नसल्यास त्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध सुद्धा कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

३.१०. राज्यात वाढत्या शहरीकरणामुळे कचरा व सांडपाणी यामुळे प्रदूषण वाढत आहे. तसेच औद्योगिकीकरण व साखर कारखाने यामधून सोडण्यात येणारे प्रदूषित पाणी यामुळेही प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी शासनाकडे असलेली अपुरी यंत्रणा व प्रदूषणासंबंधी प्रलंबित असलेले दावे विचारात घेता **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील कर्मचाऱ्यांची संख्या तातडीने वाढविण्याची गरज आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाकडे ५७० पदे भरण्यासंदर्भात पाठविलेल्या प्रस्ताव प्रलंबित आहे. सदर प्रस्तावास शासनाने तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात यावी. त्या अनुषंगाने पदे भरण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत उपलब्ध करून द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.११. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एकूण ८ प्रयोगशाळांपैकी एक केंद्रिय प्रयोगशाळा नवी मुंबई मध्ये महापे येथे असून स्थानिक पातळीवरील ७ प्रयोगशाळा पुणे, नागपूर, औरंगाबाद, ठाणे, चिपळूण, नाशिक व चंद्रपूर येथे आहे. चंद्रपूर व चिपळूण येथील प्रयोगशाळा नव्याने सुरू करण्यात आल्या असून त्याठिकाणी प्रयोगशाळा चालविण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाने कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर तातडीने निर्णय घेण्यात यावा. चंद्रपूर व नागपूर येथे असलेल्या प्रयोगशाळा या पूर्व विदर्भात आहे. पश्चिम विदर्भामध्ये यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, अमरावती, अकोला हे जिल्हे येत असून या ठिकाणी एमआयडीसीचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्या ठिकाणी नेहमी प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतात. परंतु तेथे एकही प्रयोगशाळा नाही. त्यामुळे प्रदूषणासंबंधी कोणतीही समस्या उद्‌भवल्यास त्यासाठी पश्चिम विदर्भातील लोकांना नागपूरला जावे लागते. पश्चिम विदर्भातील लोकांच्या दृष्टीने सोयीला असलेला अमरावती जिल्हा हा औद्योगिक विभाग असल्यामुळे तेथे नविन प्रयोगशाळा सुरू करण्यासंदर्भात प्रस्ताव लवकरात लवकर शासनास सादर करण्यात यावा व याबाबत केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१२. पुणे महानगरपालिकेने प्रदूषण नियंत्रणाशी निगडीत ७९७ कोटी रुपयाचा प्रोजेक्ट केंद्र शासनास सादर केल्यानुसार केंद्र शासनाने तद्‌संबंधित अनुदान मंजूर केले परंतु पुणे महानगरपालिकेने प्रोजेक्ट सुरू न केल्यामुळे केंद्र शासनाचे अनुदान परत गेले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. केंद्र शासनाच्या अनुदानाचा विहित मुदतीत वापर करता येईल. याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक असून कोणत्याही महानगरपालिकेला केंद्र शासनाने कोणतेही अनुदान मंजूर झाल्यानंतर त्या अनुदानाचा योग्य वापर विहित वेळेत होण्यासंदर्भात शासनाने निर्देश द्‌यावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१३. प्रदूषण नियंत्रणशी निगडीत प्राजेक्टला केंद्र शासनामार्फत ३०-७० याप्रमाणात वित्तिय सहाय्य दिले जाणार आहे. सदरहू प्रकल्प पूर्णत्त्वास आल्यास प्रदूषणाचा प्रश्न आटोक्यात आणला जाऊ शकतो. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, इचलकरंजी महानगरपालिका, कोल्हापूर महानगरपालिका, यांनी सुद्धा प्रस्ताव सादर केलेले आहेत. **सदरहू प्रस्ताव मंजूर करण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीस शिफारस आहे.**

३.१४. राज्यामध्ये एकूण नोंदणीकृत सहकारी साखर कारखान्याची संख्या २०२ आहे. सद्या नवीन कारखान्यांची नोंदणी शासनाने बंद केली आहे. २०२ सहकारी साखर कारखान्यांपैकी अवसायानात गेलेल्या कारखान्यांची संख्या २२ असून उभारणी अंतर्गत असलेले कारखाने ९ आहेत. या ९ कारखान्यांपैकी चालू हंगामामध्ये गाळप करण्याच्या अपेक्षा असलेले ५ कारखाने असून उर्वरित ४ कारखाने एका वर्षांत कार्यरत होणार आहेत. उभारणीपूर्ण झालेल्या कारखान्यांची संख्या १६८ आहे. साखर कारखान्यांना राज्य शासनामार्फत निश्चित केलेल्या प्रमाणकाप्रमाणे १:३ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. मराठवाडा परिसरातील कारखान्यांना १:५ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते. तसेच आदिवासी क्षेत्रातील कारखान्यांना आणि महिला सहकारी साखर कारखान्यांना १:९ या प्रमाणात भाग भांडवल दिले जाते.

३.१५. एन.सी.डी.सी मार्फत कारखान्यांना दोन प्रकारे कर्जे दिली जातात त्यामध्ये भाग भांडवल आणि कारखाने उभारण्यासाठी प्रिंसिपल लोन दिले जाते. साखर कारखान्यांना शासनामार्फत वर्षानुवर्षे आर्थिक मदत दिली जात असताना काही कारखान्यांची उभारणी अद्यापही अपूर्ण आहे. काही कारखाने मोडीत निघाले तर काही कारखाने विकले गेले अशी गंभीर परिस्थिती आहे. कारखान्यांनी कर्जाची परतफेड न केल्यास सिक्युरिटायझेशन ॲक्ट मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येऊन लिलावाद्वारे मिळणाऱ्या रक्कमेतून कर्जाची परतफेड केली जाते. परंतु कारखान्यांचे चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन यांच्यावर कारवाई झाल्याचे निदर्शनास येत नाही. बुडीत कर्जे व संशयित कर्जे यामध्ये शासनाचे ११८ कोटी रुपये अडकले आहेत. सदरहू रक्कम वसूल करण्यासंदर्भात अद्यापपावेतो कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. राज्यामध्ये एकंदरीत आठ कारखान्यांची विक्री राज्यशासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे. अहमदनगर येथील डी.सी.सी.बँकेने काही कारखान्यांची विक्री केली आहे. एम.एस.सी. बँकेने १२ कारखान्यांची विक्री केली आहे. चार कारखान्यांच्या विक्रीबाबत निविदा काढल्या आहेत. कोरेगाव येथील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याची ६२ कोटी ७५ लाख रुपयांना विक्री करण्यात आली, नरसिंह सहकारी साखर कारखान्याची ४० कोटी २५ लाख रुपयांना विक्री करण्यात आली. सिक्युरिटायझेशन ॲक्टप्रमाणे कारखान्याची विक्री केल्यानंतर मिळणारी रक्कम प्रथम बँक कर्जाची परत फेड त्यानंतर कर्मचाऱ्याचे देणे व त्यानंतर राज्य शासनाचे देणे यामध्ये उपयोगात आणली जाते परंतु सहकारी साखर कारखाने गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनीवर तसेच त्यांच्या शेअर्सवर उभारली जात असताना त्यांच्या हिताचा विचार केला जात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जाणीवपूर्वक सहकारी साखर कारखान्यांना बुडीत काढणाऱ्यांनीच ते विकत घेणे याबाबी अक्षरशः घडत असल्याचीही उदाहरणे आहेत. **सहकारी साखर कारखान्यांच्या लिलावाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेतून प्रथमतः शेतकऱ्यांच्या शेअर्सच्या रकमेची व्याजासह परतफेड करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा तसेच ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित केली असेल किंवा कारखान्यांनी विकत घेतलेल्या असेल त्या शेतकऱ्यांना त्यांची जमीन बाजार मूल्याप्रमाणे परत करावी व संबंधित कारखान्याच्या संचालकांना तसेच कार्यकारी मंडळातील कोणत्याही पदाधिकाऱ्यांना / सदस्यांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना कारखान्याच्या लिलावामध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध घालण्यात यावा. तसेच कारखान्यांचे संचालक तसेच संचालक मंडळातील इतर जबाबदार सदस्यांनाही व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येऊन गरज भासल्यास त्यांच्या चल, अचल संपत्तीचाही लिलाव करून त्यामधून असलेल्या देणीची परतफेड करण्यात यावी व उचित प्रकरणी त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.१६. सहकारी साखर कारखाने जाणीवपूर्वक बुडीत काढून कारखान्याची जमीन विकासकामार्फत विकसित करून त्यामधून करोडो रुपयांचा फायदा करून घेतला जातो व ज्यांच्या जमिनी कारखान्याकरिता संपादित करण्यात आल्या होत्या त्या शेतकऱ्यांना त्यामधून काही लाभ होत नाही. **शेतकरी सहकारी साखर कारखाने उभारण्याकरिता संपादित केलेली शेतीची जमीन कारखाना चालू असताना किंवा बंद पडल्यानंतर प्रचलित अधिनियमातील तरतुदीनुसार सहजासहजी बिगर शेती (N.A) करण्यात येऊ नये किंवा अपवादात्मक परिस्थितीत ती जमीन बिगर शेतीमध्ये रुपांतरीत करावयाची झाल्यास शेअर होल्डर्स शेतकऱ्यांचे हित जोपासले जाण्यासंदर्भात ठोस निर्देशक तत्त्वे/अटी निश्चित करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

३.१७. ज्या सहकारी साखर कारखान्यांनी शासनाकडून कर्जे घेतलेली आहेत किंवा ज्या कारखान्यांनी घेतलेल्या कर्जाप्रकरणी शासन हमीदार आहे त्या सर्व कारखान्यांचे भाग भांडवल, शेअर्स कॅपिटल, कर्ज, गाळप क्षमता याची तपशिलवार माहिती देण्यासंदर्भात समितीस आश्वासित करूनही अद्याप माहिती समितीस अप्राप्त आहे. **सदरहू माहिती समितीस तीन महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.१८. निफाड सहकारी साखर कारखान्याच्या आणि बँकेच्या संगनमताने १० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर सहकार आयुक्त कार्यालयाकडून लेखापरीक्षकाची नियुक्ती करून चौकशी करण्यात आली आणि चौकशीअंती निफाड सहकारी साखर कारखान्याचे ११ संचालक, साखर कारखान्याचे १ व्यवस्थापकीय संचालक, बँकेचे २ अधिकारी आणि १ शासकीय लेखापरीक्षक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ज्यावेळी हे निदर्शनास आले त्यावेळी निवडणुका होऊन नवीन संचालक मंडळ नियुक्त झाले होते. परंतु, नवीन संचालक मंडळात जुन्या संचालक मंडळातील काही पदाधिकारी निवडून आलेले आहेत किंवा नाहीत याबाबतची माहिती विभागीय सचिवांकडे उपलब्ध नव्हती पण कलम ८३ अन्वये चौकशी सुरू होती. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात दाखल झाले. उच्च न्यायालयाने या प्रकरणात स्थगितीचे आदेश दिले होते. ती स्थगिती अडीच वर्षे होती. आता ती स्थगिती उठविण्यात आलेली आहे. आता दोन-तीन महिन्यात याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३.१९. सन २००६ मधील हे प्रकरण आहे. उच्च न्यायालयाने स्थगिती उठविल्याची तारीख तसेच ऑडीटरने काय कार्यवाही केली याबाबत विभागीय सचिवांकडे काहीच माहिती उपलब्ध नसल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सदरहू प्रकरणात विभागाकडून दिरंगाई झाली असल्याने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व समितीने उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती लेखी स्वरुपात ३ महिन्यात समितीस सादर करावी. अशी समितीची शिफारस आहे.

३.२०. सन २००६-०७ मध्ये संत तुकाराम साखर कारखाना मर्यादित पुणे यांच्याकडे रु. ११४१.९१ लाख थकीत असून न्यायाधिकरणाने त्यांना सहामाही २० हप्त्यात परतफेड करण्यास परवानगी देऊन अद्याप ३ हप्ते त्यांनी अदा केले आहेत. सद्यःस्थितीत सदर साखर कारखान्याविरुद्ध वसूलीसाठी कोणती कारवाई करण्यात येत आहे तसेच निफाड सहकारी साखर कारखाना थकहमीवर बँक ऑफ बडोदा यांनी उसतोडणी वाहतूक ठेकेदारांना रु. ४४३.०० लाख एवढे कर्ज मंजूर केले आहे. कारखान्याने कर्जाची रक्कम ठेकेदारांकडून संपूर्णपणे वसूल केली आहे. परंतु कारखान्याने एकही हप्ता बँकेला भरलेला नाही. कर्जाची रक्कम बँकेला न भरण्याची कारणे काय आहेत. याबाबतची माहिती समितीला तात्काळ देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२१. दोन लाख चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेली इमारत बांधायची असेल तर पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्या परवानगीकरिता दोन ते अडीच वर्षांचा कालावधी लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. मध्यंतरी जमिनीच्या किंमती मोठया प्रमाणात वाढल्यामुळे प्रकल्पाची किंमत सुद्धा भरमसाठ वाढते. यासंदर्भात विभागीय सचिवांनी नमूद केले की, सन २००८ मध्ये स्टेट एक्सपर्ट अप्रायझल कमिटीची स्थापना करण्यात आली असून समितीला मंजुरी मिळेपर्यंत बराच बॅकलॉग शिल्लक राहिला. साधारणपणे एका महिन्यात ४० ते ५० नवीन प्रोजेक्ट मंजुरीकरता येतात. अशा प्रकारे त्यावेळी जवळ जवळ ३५० प्रकरणे प्रलंबित राहिली होती. सी.ई.ए.सी.च्या शिफारशी नंतर अंतिम मंजुरीकरिता प्रकरण दुसऱ्या कमिटीकडे पाठविण्यात येते. बरेच प्रयत्न करून प्रलंबित प्रकरणाची संख्या शंभरवर आणली होती. यानंतर पहिल्या कमिटीची तीन वर्षांची मुदत संपली, दुसऱ्या कमिटीची नोटीफिकेशन काढण्याकरिता केंद्र शासनाला ६ महिन्यात विलंब झाला त्यामुळे पुन्हा प्रलंबित प्रकरणाची संख्या बरीच वाढली असून ती आता ५०० झाली आहे. पर्यावरण विभागाने तज्ञ व्यक्तींच्या समितीची बैठक महिन्यातून दहा दिवस घेऊन प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्याची सूचना केली. समितीमधील तज्ञांना मासिक वेतन न देता प्रत्येक बैठकीकरिता १५०० रुपये इतके मानधन देण्यात येत असल्याचे विभागीय सचिवांनी निदर्शनास आणले. प्रलंबित प्रकरणाची संख्या बघता राज्य शासनाने सध्या अस्तित्त्वात असलेल्या तीन समित्या व अधिक दोन समित्या स्थापित करून एकूण पाच समित्या नियुक्त केल्या जाणार असल्याची माहिती समितीस दिली.

३.२२. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने व्हावा याकरिता पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित प्रोजेक्टला व्यक्तीसः भेट देऊन पर्यावरण संबंधित बाबींची तपासणी करावी व त्या अनुषंगाने त्यांचे अभिप्राय नोंदवावेत असे मत समितीने व्यक्त केले. तसेच बांधकामास परवानगी देण्यासंदर्भातील विषय तसेच सांडपाणी, घनकचरा इ. बाबी नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडीत आहेत. सबब, बांधकामास परवानगी देण्याकरिता पर्यावरण विभागाच्या भुमिकेची आवश्यकता नसल्याचे मत समितीने व्यक्त केले तसेच बांधकामास सुरूवातीस तात्पुरती परवानगी देण्यात यावी असे समितीने विदित केले असता तशी कायद्यात तरतूद नसल्याचे परंतु उच्च न्यायालयाकडून अशा तीन प्रकरणामध्ये परवानगी देण्यात आली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

३.२३. दोन लाख चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेली इमारत बांधावयाची असेल तर पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे. परवानगीसाठी अडीच वर्षे वाट पहावी लागते. तोपर्यंत जमिनीची किंमत मोठया प्रमाणात वाढल्यामुळे त्यांच्या प्रकल्पाची किंमत देखील भरमसाठ वाढते.

३.२४. पर्यावरण विभागाने ६० दिवसात व कमिटीने ४५ दिवसात निर्णय घ्यावा, अशा प्रकारे नियम असूनही विहित मुदतीमध्ये परवानगी दिली जात नाही. तसेच बरेचदा स्थानिक संस्था किंवा नगरपालिका ज्या परवानग्या देतात, त्याच परवानग्या पुन्हा पर्यावरण विभागाकडून दिल्या जातात. यामुळे एकच काम दोनदा केले जाते व त्याकरिता खूप वेळ वाया जातो. यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या ६२० प्रकरणे प्रलंबित असून ही प्रकरणे १८ महिन्यांपूर्वीची आहेत. सध्या दोन कमिट्या अस्तित्त्वात असून प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्याकरिता नवीन तिसरी कमिटी तयार केली आहे. तसेच चौथी कमिटी तयार करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. **बांधकामासंदर्भात पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्याबाबतची कार्यवाही कोण्यात्याही परिस्थितीत तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होईल या दृष्टीने सक्षम यंत्रणा निर्माण करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.२५. राज्यातील महत्त्वाच्या शहरामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात बांधकाम होत आहेत. वेळेत परवानगी न दिल्यामुळे अनेक लोक बेकायदेशीरपणे बांधकामास सुरूवात करतात. यामुळे परिस्थिती आणखी बिकट होते. या संदर्भात केंद्र शासनातील अधिकाऱ्यांना भेटावे लागेल. समितीमधील तज्ञ व्यक्तींना एका बैठकीकरिता १५०० रुपये इतके तुटपुंजे मानधन दिले जाते. यामुळे ते अधिक वेळ काम करण्यास उत्सुक नसतात त्यामध्ये वाढ करण्यात यावी.

३.२६. सध्या अनेक प्रोजेक्टला पर्यावरण विभागाची मंजुरी मिळण्यास २ ते ३ वर्षे विलंब होतो. परवानगी देण्याकरिता प्रदूषण मंडळ व नगर विकास विभाग यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी त्याकरिता राज्य शासनाने केंद्रशासनाकडे अधिक दोन राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समित्या (SEAC) गठित करावयाच्यासंदर्भांत केलेल्या प्रस्तावाबाबत सद्यःस्थितीची सविस्तर माहिती समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२७. जुन्या सरकारी इमारतींचे बांधकाम जवळपास २ लाख २० हजार चौ.फू असल्यास त्या ठिकाणी सिवरेज ट्रिटमेंट प्लांट (STP) बसविण्याची गरज नाही. म्हणजे सन २००७ च्या अगोदरच्या इमारतींना पर्यावरण विभागाची मान्यता घेण्याची गरज नाही. समितीने अशीही विचारणा केली की, राज्यात किती महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये सिवेज ट्रिटमेंट प्लांट (एसटीपी) बसविण्यात आले आहेत या संदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी. वाढत्या नागरीकरणामुळे प्रदूषण होते. त्याबाबत उपाययोजना करण्याकरिता केंद्र शासनाकडून अनुदान मिळते त्यामधील किती महानगरपालिका व नगरपालिका यांनी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बसविले आहेत याची माहिती समितीला देण्यात यावी व ज्या महानगरपालिकांनी सिवेज ट्रिटमेंट प्लांट (एसटीपी) बसविले नसतील, त्यांना केंद्र शासनाचे अनुदान देऊ नये. बसविण्यात आलेल्या एसटीपींपैकी किती कार्यान्वित झाले आहेत, तसेच सिवेज ट्रिटमेंट प्लांट कार्यान्वित आहे किंवा नाही यासाठी स्वतंत्र मीटर बसविण्यात यावे. याबाबत संबंधित नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडून विनिर्दिष्ट माहिती प्राप्त करून समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

परिशिष्ट-९ परिशिष्ट ९

(आकडे लाखात)

सहकारी साखर कारखान्याचे नाव	... व बुडीत कर्ज निधी			शेरा
	दि. 31-3-2007 अखेर	दि. 31-3-2011 अखेर	वाढ / घट	
सिध्देश्वर, कुमठे - सोलापूर	16.29	41.29	25.00	पुर्ण
राजारामबापू - सांगली	55.55	80.51	24.96	पुर्ण
वसंतदादा शेतकरी - सांगली	25.45	25.45	0.00	पुर्ण
श्रीराम - फलटन	3.75	3.75	0.00	भागीदारीतत्त्वावर
संत तुकाराम - पुणे	22.75	0.00	- 22.75	निर्लेखनामुळे
प. डॉ.वि. वि. पाटील - अहमदनगर	2.13	2.13	0.00	
कृष्णा - सातारा	18.36	18.36	0.00	
दौलत - कोल्हापूर	0.00	0.00	0.00	
नीरा भिमा - पुणे	0.00	5.00	5.00	
पांडूरंग - सोलापूर	33.23	598.45	565.22	
कुकडी - अहमदनगर	0.00	228.59	228.59	
इंदिरा गांधी महिला - कोल्हापूर	0.00	461.19	461.19	भाडेतत्त्वावर
रेणा - लातूर	0.00	0.00	0.00	
वैद्यनाथ - बीड	68.97	68.97	00.00	
डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अहमदनगर	18.38	68.38	50.00	
समर्थ - जालना	26.02	26.02	0.00	
जयभवानी - बीड	0.00	0.00	0.00	तरतुद नाही.
भाऊराव चव्हाण - नांदेड	0.00	0.00	0.00	
निफाड - नाशिक	0.84	0.84	0.00	
आदिवासी - नवापूर	0.00	95.46	95.46	
वसंत - यवतमाळ	0.00	0.00	0.00	
शिवशक्ती आदिवासी - बुलढाणा	0.00	0.00	0.00	अवसायनात, बंद
एकूण	291.72	1724.39	1455.42	

परिशिष्ट - २

चॅप्टर २ परिच्छेद क्र. २.२.१ चे सहपत्र क्र. १

(रक्कम कोटीत)

अ.क्र.	देणेचा तपशील	दिनांक ३१/०३/२००६ अखेर देणे बाकी	पैकी दिनांक ३१/०३/२०१२ अखेर शिल्लक देणे बाकी
१	२	३	४
१	शासकीय देणी	११६.९५	६७.९६
२	शासकीय कर्जे	२१३.९०	८४.०६
३	एन.सी.डी.सी. कर्ज	६.९८	६.९८
४	सभासदाची ऊसाची देय बिले	२७७.२०	२.९७
५	इतर देणी (धनको / पुरवठादार)	४९७.९६	४९.५५
६	तारणी / विनातारणी कर्जे	१४१६.४०	१६७.१८
७	एस.डी.एफ. कर्ज (साखर विकास निधी)	६२.९७	४२.१८
८	ऊसाचे बिलातून वसुल केलेली परंतु वित्तीय संस्थाना संवितरित न केलेली देणी	६६.२९	०.७८
	एकुण	२६५८.६५	४२१.६६

परिशिष्ट - ३

चॅप्टर - २ , परिच्छेद क्र. २.२.१ चे सहपत्र.क्र.२ दिनांक ३१-३-२०१२ अखेरची देणे बाकी (रु.लाखात)

अ क्र.	ससाकाचे नाव	शासकीय देणी	शासकीय कर्ज	एन.सी.डी.सी कर्ज	सभासदांची ऊसाची देय बीले	इतर देणी (धनको / पुरवठादार)	तारणी / विनातारणी कर्जे	साखर विकास निधी (SDF) कर्जे	ऊसाचे बीलातुन वसुल केलेली परंतु वित्तीय संस्थांना संवितरीत न केलेली देणी
	२	३	४	५	६	७	८	९	१०
	संत तुकाराम	११८०.४८	१९५.४६	०.००	०.००	०.००	६६१.०५	०.००	१०.५७
	निरा भिमा	०.००	२८५.५७	०.००	०.००	०.००	१३५.०१	४२.३२	०.००
	सिद्धेश्वर सोलापूर	४९२.४८	५७६.३८	०.००	०.००	०.००	०.३९	७५८.६८	०.००
	कृष्णा सातारा	०.००	७३१.९५	०.००	०.००	०.००	४५०.००	०.००	०.००
	पांडुरंग सोलापूर	०.००	३४७.७५	१२२.१५	०.००	०.००	०.००	३८९.१७	०.००
	श्रीराम फलटण	२०३.७८	२७३.४४	०.००	०.००	२४४.४५	१५८६.५०	०.००	०.००
	रेणा लातूर	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
	भाऊराव चव्हाण नांदेड	३६०.२९	५९१.५७	०.००	०.००	०.००	२२४.९६	०.००	०.००
	डॉ. आंबेडकर उस्मानाबाद	४.३८	२४८.०३	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
	कुकडी नगर	१२६.७८	१०५.५७	०.००	०.००	०.००	११५२.०१	०.००	०.००
	निफाड नाशिक	१६६.०८	४७५.६९	०.००	०.००	२८६.११	१९४५.८०	०.००	०.००
	डॉ. शं.को. पाटील केज	२३८.०६	०.००	०.००	०.००	४१४.५३	१४७६.९१	०.००	०.००
	वैद्यनाथ बीड	०.००	११७३.००	०.००	०.००	०.००	०.००	३२.००	०.००
	समर्थ जालना	०.००	३३१.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
	जयभवानी बीड	०.००	३४७.००	०.००	०.००	०.००	०.००	२६.००	०.००
	आदिवासी नवापूर	४६.७०	१७०.६५	०.००	०.००	०.००	६६१.५४	०.००	०.००
	वसंत पुसद	६८१.८६	६०४.६३	०.००	०.००	१४४७.०५	२६०.७४	४२०.००	०.००
	शिवशक्ती बुलढाणा	१०२०.००	१८७.००	०.००	०.०१	११६७.००	०.००	०.००	०.००
	राजारामबापू पाटील	०.००	२३६.५३	०.००	१२.२२	०.००	०.००	१३८४.७३	०.००
	वसंतदादा सांगली	३२.५४	८७६.२०	०.००	६.३८	३३०.४१	३१५७.००	०.००	२३.११
	[illegible]	३०४.२७	५८१.७६	५७६.००	२७८.००	४३७.८६	६९५.०७	११६४.६७	४४.५३
	इंदिरा गांधी	१९३०.०२	५१.४५	०.००	०.००	६२७.१०	४३०२.७१	०.००	०.००
	एकूण रु.लाखात	६७९५.७२	८४०५.८३	६९८.१५	२९६.६१	४९५४.५१	१६७१७.६९	४२१७.५७	७८.२१
	एकूण रु.कोटीत	६७.९६	८४.०६	६.९८	२.९७	४९.५५	१६७.१८	४२.१८	०.७८

परिशिष्ट क्र. ४

परिशिष्ट IV

(संदर्भ : 4.4; पृष्ट 29)

अपूर्ण स.सा.कारखाने दर्शविणारे विवरणपत्र

स.सा.का. चे नांव	नोंदणीचा दिनांक	शासनाची गुंतवणूक	स.सा.का. चे भाग भांडवल	केलेला खर्च	बांधकामाच्या प्रगतीचा आणि यंत्रसामग्री विकत घेण्याचा
		(रुपये कोटित)			
घृष्णेश्वर, औरंगाबाद	16.05.1994	13.33	2.10	13.33	रु 3 कोटीचा अग्रिम 1995-96 ला प्रदान केला
जामनेर, जळगांव	13.01.1992	9.89	2.57	15.93	रु 7.17 कोटीचा यंत्रसामग्री अग्रीम आणि रु 5.25 कोटीचे बांधकाम 1997-98 पर्यंत झाले
सह्याद्री, कोल्हापूर	25.04.1994	12.00	0.84	4.37	प्रगती नाही. जुलै 1997 आणि एप्रिल 2003 मध्ये रु 2.74 कोटीचा अग्रिम दिला
शरद, औरंगाबाद	04.04.2000	6.28	1.60	1.86	जुनी यंत्रसामग्रीचे वाटप झाले आणि एप्रिल आणि जून 2002 अग्रिम दिले परंतु उभारणी केली नाही
सागर, जालना	01.06.2001	8.48	3.45	12.21	जुलै 2005 मध्ये यंत्रसामग्रीचे वाटप झाले आणि उभारणीचे काम प्रगतीपथावर
शिवशक्ति, उस्मानाबाद	28.06.2001	3.74	1.83	1.64	ऑगस्ट 2004 मध्ये अग्रिम दिला, प्रगती नाही
कुरमादास, सोलापूर	04.04.2000	3.74	2.84	2.24	एप्रिल 2001 मध्ये अग्रिम दिला प्रगती नाही
शेतकरी, सांगली	14.11.1994	10.21	2.15	15.01	रु 9.31 कोटीची जुनी यंत्रसामग्री 1994 मध्ये विकत घेतली. जानेवारी 2008 पर्यंत उभारली नव्हती
बाणगंगा, ऊस्मानाबाद	31.10.2000	9.33	3.21	6.08	मे 2002 पर्यंत रु 6 कोटीचे नागरी बांधकाम केले
छत्रपती, बीड	05.05.2000	3.26	1.85	1.69	एप्रिल 2002 पर्यंत रु 5.38 कोटीचे नागरी बांधकाम केले
टोकाई, हिंगाळी	03.03.1997	2.97	1.92	6.89	एप्रिल 2002 पर्यंत रु 4 कोटीचे नागरी बांधकाम केले
भाऊसाहेब बिराजदार, ऊस्मानाबाद	23.03.2001	9.33	1.87	5.46	मार्च 2006 आंशिक नागरी बांधकाम केले
एकूण		**92.56**	**26.23**	**86.71**	

परिशिष्ट क्र. ५

परिशिष्ट IX

(संदर्भ : 5.1; पृष्ट 51)

परिसमापनांत विलंब झाल्यामुळे यंत्रसामग्री निष्फळ राहीली ते दर्शविणारे विवरणपत्र

अ. क्र.	स.सा.का.चे नांव	परिसमापनाचे आदेश जारी केलेले	आदेश पारीत करण्या आधी बंद असलेला कालावधी	निष्फळ यंत्रसामग्रीची किंमत (रुपये लाखांत)	शासमाची देणी वसूल झाली नाहीत (रुपये लाखांत)	वसूल न केलेली इतर देणी	परिसमापनाच्या विलंबाची कारणे	परिसमापनाचे प्रगती अहवाल सादर केले पर्यंत	स.सा.का. चे लेखे पर्यंत सादर केले	लेख्यांचे लेखापरीक्षण पर्यंत केले
1	परशुराम	07.06.1995	3 वर्ष (1992 पासून)	421.70	33.12	476.53	बाब न्यायप्रविष्ट आहे	फेब्रुवरी 2007	2004-2005	2004-2005
2	सासवड माळी	12.02.1987	1 वर्ष (1980-1981)	यंत्र सामग्री नाही	निरंक	निरंक	केंद्र सरकार बरोबर दाव्यांना निकालांत काढले नाहीत.	2005-06 पर्यंत	31-12-2004	31-12-2004
3	गिरणा	06.06.1997	1 वर्ष (1996-1997)	814.00	915.25	1237.36	स.सा.का.ची मालमत्ता ऋण वसुली न्यायाधिकरणाने जप्ती आणली आहे	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	2005-2006
4	संजय	01.04.1998	7 वर्ष (1992 पासून)	विल्हेवाट केले	1631.60	2684.77	यंत्र सामग्री विकण्यास आणि इतर मालमत्ता विक्रीस विलंब	प्राप्त झाले नाहींत	2001-2002	2001-2002
5	कोंडेश्वर	14.03.2002	1 वर्ष (2001-2002)	1787.00	1589.65	6041.15	यंत्र सामग्रीची विल्हेवाट न लागणे आणि भाडेपट्टयावर स.सा.का.घेण्यांत तयार नाहींत	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	1998-1999
6	विनायक	02.05.2002	1 वर्ष (2001-2002)	615.86	598.08	3514.50	मालमत्तांची विल्हेवाट न होणे आणि MSC बँक मुंबई ने रिट अर्ज दाखल केला	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	2002-2003
7	जिजामाता	02.05.2002	बंद 1996-1998 2001-02 पासून बंद	644.00	426.33	1530.36	माल मत्ता विकली गेली नाही	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	2001-2002
8	तासगांव	17.01.2006	4 वर्ष (2002-2003 पासून)	भाडेपट्टयावर	1938.78	10899.00	विनिर्दिष्ट उत्तर नाही. परिसमापनांतीले विलंब आयुक्ताने मान्य केला	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	2001-2002
9	शंकर	23.03.2006	3 वर्ष (2003-2004 पासून)	मूल्यांकन नाही	1027.83	8564.19	स.सा.का.ची मालमत्ता सिक्यरिटेशन कायद्या अंतर्गत बँकेने ताब्यांत घेतली	प्राप्त झाले नाहींत	प्राप्त झाले नाहींत	2004-2005
				4282.56	**8160.64**	**34947.86**				

परिशिष्ट क्र. ६

परिशिष्ट-ब

आसवण्यांच्याबाबतीत म. प्र. नि. मंडळाने प्रदूषणाची शुन्य निकसन पातळीची पूर्तता होण्याबाबत खालीलप्रमाणे धोरण ठरविलेले आहे.

अनु. क्र.	संमतीपत्र	निर्देशित केलेली बॅन्केची हमी
१.	उद्योग उभारण्यासाठीचे संमतीपत्र	रू. २ लाख संमतीपत्रातील अटींच्या पूर्ततेबाबत
२.	उद्योग सुरू करण्याचे संमतीपत्र	अ. उद्योग उभारण्याच्या बाबतीत संमतीपत्रातील अटींची पूर्तता करणे . ब. पूर्तता केलेल्या अटींची कायम पालन करण्याबाबत रू. २ लाखाची बॅन्क हमी व पूर्तता झाल्यास रु.२ / लाख उद्योग उभारण्याच्या वेळचे परत करणे.
३.	संमतीपत्र नुतनीकरण	अ. प्रथम कारखाना सुरू करण्याच्या संमतीपत्रातील अटींची पूर्तता पाहणे. ब. पूर्तता केली असल्यास अटींची कायम पालन करण्याबाबत रू. २ लाखाची बॅन्क हमी क. सतत अटीचीं पूर्तता न केल्यास बँक हमी जप्त करुन दुप्पट घेणे.
३ अ.	सीआरईपी च्या अटींची पूर्तता न केलेल्या आसवण्याच्या संमतीपत्र नुतनीकरण.	अ. ३० दशलक्ष लिटर पर्यंत सहा महिन्यांमध्ये सीआरईपीची पूर्तता करणे यासाठी रू. २ लाखाची बॅन्केची हमी. ब. ३१ ते ४५ दशलक्ष लिटर पर्यंत सहा महिन्यांमध्ये सीआरईपीची पूर्तता करणे यासाठी रू. ३ लाखाची बॅन्केची हमी. क. ब. ४५ दशलक्ष लिटर पेक्षा जास्त सहा महिन्यांमध्ये सीआरईपीची पूर्तता करणे यासाठी रू. ५ लाखाची बॅन्केची हमी.
४.	भागभांडवल गुतवणुकींत वाढ परंतू स्त्रोत प्रदूषणामध्ये वाढ न होणाऱ्या कारखान्यांचे संमतीपत्र.	पूर्वी देण्यात आलेल्या संमतीपत्रातील अटींची पूर्तता झाली असल्यास वाढलेल्या भागभांडवल गुतवणुकीवर संमतीपत्र शुल्क घेऊन रू. २ लाखाच्या बॅन्केच्या हमीसह संमतीपत्र नुतनीकरण करणे.
५.	प्रकल्पाचे विस्तारीकरण ज्यामुळे प्रदूषण करणाऱ्या घटकांची वाढ अशा आसवण्यांना उद्योग उभारण्यासाठीचे संमतीपत्र.	अस्तित्वात असलेल्या आसवणीने संमतीपत्रातील अटींची पूर्तता केलेली असल्यास रू. २ लाखाची बॅन्केची हमी घेऊन उद्योग उभारण्यासाठीच्या अटींची पूर्तता होण्याबाबत.
६.	प्रकल्पाचे विस्तारीकरण ज्यामुळे प्रदूषण करणाऱ्या घटकांची वाढ व अस्तित्वात असलेल्या आसवणी सोबत एकत्रिकरण करून संमतीपत्र देणे.	अ. उद्योग उभारण्यासाठीच्या संमतीपत्रातील अटींची पूर्तता झाली असल्यास कायम पालन करण्याबाबत रू. २ लाखाची बॅन्क हमी. ब. सतत अटीचीं पूर्तता न केल्यास बँक हमी जप्त करुन दुप्पट घेणे.

परिशिष्ट क्र. ७

…ळाच्या आस्थापनेवरील सध्या रिक्त असलेली पदे दिनांक ३०/०९/२०१२

अ.क	पदनाम	वेतन बँड	ग्रेड पे	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	२	३	४	५	६	७
१	अध्यक्ष			१	१	०
२	सदस्य सचिव	(पीबी-४) ३७४००-६७०००	१००००	१	१	०
३	जल प्रदूषण निवारण अभियंता	१५६००-३९१००	७६००	१	०	१
४	हवा प्रदूषण निवारण अभियंता	१५६००-३९१००	७६००	१	१	०
५	प्रधान वैज्ञानिक अधिकारी	१५६००-३९१००	७६००	१	१	०
६	मुख्य लेखा अधिकारी	१५६००-३९१००	७६००	१	१	०
७	तांत्रिक सहायक सचिव	१५६००-३९१००	७६००	१	१	०
८	वरिष्ठ विधी अधिकारी	१५६००-३९१००	७६००	२	१	१
९	कार्यकारी अभियंता	१५६००-३९१००	६६००	१	१	०
१०	वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी	१५६००-३९१००	६६००	१	१	०
११	सामुग्री अधिकारी	१५६००-३९१००	६६००	१	०	१
१२	प्रादेशिक अधिकारी	१५६००-३९१००	६६००	१४	११	३
१३	विधी अधिकारी	१५६००-३९१००	६६००	२	१	१
१४	वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी	१५६००-३९१००	६६००	३	१	२
१५	उप-प्रादेशिक अधिकारी	१५६००-३९१००	५४००	५७	४२	१५
१६	सांख्यिकी अधिकारी	९३००-३४८००	५०००	१	१	०
१७	खाजगी सचिव	९३००-३४८००	५०००	२	१	१
१८	प्रशासकीय अधिकारी	९३००-३४८००	५०००	१	०	१
१९	सहायक सचिव	९३००-३४८००	५०००	१	०	१
२०	वैज्ञानिक अधिकारी	९३००-३४८००	५०००	९	६	३
२१	लेखा अधिकारी	९३००-३४८००	५०००	२	२	०
२२	कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी	९३००-३४८००	४४००	२६	२३	३
२३	सहायक लेखा अधिकारी	९३००-३४८००	४४००	११	११	०
२४	सहायक विधी अधिकारी	९३००-३४८००	४४००	३	२	१
२५	उप-अभियंता	९३००-३४८००	४४००	१	०	१
२६	वरिष्ठ लघुलेखक	९३००-३४८००	४४००	५	५	०
२७	कनिष्ठ लघुलेखक	९३००-३४८००	४३००	२७	२५	२
२८	क्षेत्र अधिकारी	९३००-३४८००	४३००	२०४	१८८	१६
२९	प्रमुख लेखापाल	९३००-३४८००	४३००	२०	१५	५
३०	विधी सहायक	९३००-३४८००	४३००	४	२	२
३१	कनिष्ठ वैज्ञानिक सहायक	९३००-३४८००	४२००	४०	३९	१
३२	प्रथम लिपिक	९३००-३४८००	४२००	१७	१६	१

३३	सांख्यिकी सहायक	९३००-३४८००	४२००	१	१	०
३४	आरेखक	५२००-२०२००	२८००	१	०	१
३५	क्षेत्र निरीक्षक(८+३४)	५२००-२०२००	२८००	४२	२१	२१
३६	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	५०	४५	५
३७	सहायक आरेखक	५२००-२०२००	२४००	२	०	२
३८	अनुरेखक	५२००-२०२००	२०००	६	४	२
३९	प्रयोगशाळा सहायक	५२००-२०२००	२०००	७	६	१
४०	कनिष्ठ लिपिक/टंकलेखक	५२००-२०२००	१९००	६४	५८	६
४१	वाहनचालक	५२००-२०२००	१९००	७४	६७	७
४२	वीजतंत्री	५२००-२०२००	२४००	२	१	१
४३	उपकरण जोडारी	५२००-२०२००	१९००	१	१	०
४४	दफ्तरी	५२००-२०२००	१९००	१४	९	५
४५	नाईक	४४४०-७४४०	१६००	२	०	२
४६	चक्रमुद्रणयंत्रणचालक	४४४०-७४४०	१६००	१	०	१
४७	शिपाई	४४४०-७४४०	१३००	८८	६८	२०
४८	चौकीदार	४४४०-७४४०	१३००	२०	१८	२
४९	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	३	३	०
			एकूण	८४०	७०२	१३८

परिशिष्ट क्र. ८

महाड औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणकारी कारखान्यांबाबतची कार्यवाहीची माहिती

महाड औद्योगिक वसाहत ही सन १९८२ मध्ये सावित्री नदी किनारी स्थापन झाली असुन महाड औद्योगिक वसाहतीमधून निर्माण होणा-या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची स्थापना २००३ मध्ये केलेली असुन सदर प्रकल्पा मधुन बाहेर पडणारे प्रक्रियायुक्त सांडपाणी म.औ.वि महामंडळाच्या बंद पाईपलाईनद्वारे २३ किमी अंतरावर असलेल्या सावित्री नदीच्या पात्रामध्ये ओवळे येथे सोडण्यात येते. हे ठिकाण सांडपाण्याच्या विल्हेवाटीसाठी राष्ट्रीय समुद्र

विज्ञान संस्थेने (NIO) ठरवून दिलेले नाही. राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने (NIO) अनुमोदन केल्या नुसार एम.आय.डी.सी तर्फे सांडपाण्याची विल्हेवाट "आंबेत" येथे करणे आवश्यक आहे.

सदर प्रक्रियायुक्त औद्योगिक सांडपाण्यामुळे होणा-या प्रदूषणाच्या अनुषंगाने प्रदूषणास कारणीभूत ठरवुन सन २०१२ मध्ये एकूण ०९ उद्योगावर बंदची कारवाई केलेली होती त्यातील ०१ उद्योग मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने मागिल ०१ वर्षापासून बंद आहे. तसेच पुर्नप्रक्रिया करीत असलेल्या सी.ई.टी.पी व्यवस्थापनावरही कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित आदेश देवुन सदर प्रकल्पाची १२.५ लाखाची बँक हमीही जप्त केली आहे. तसेच तद्नंतर प्रदुषणास कारणीभुत ठरवुन महाड एम.आय.डी.सी मधील मे.सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लि., मे.अॅस्टेक लाईफ सायन्सेस लि. व मे. वसुधरा रसायन लि. या कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित आदेश व अंतरीम आदेश देवून त्याची बँक हमी ही जप्त केलेली आहे. तद्नंतर सध्या सदर सी.ई.टी.पी. योग्य पदधतीने कार्यरत असून बाहेर पडणा-या प्रक्रियायुक्त औद्योगिक सांडपाण्याचा सी.ओ.डी. हो संमत्ती पत्रातील अटीनुसार आणण्याचा प्रयत्न करीत आहे. (माहे मार्च २०१३ चा सी.ओ.डी-२७२ मि.ग्रॅ/लि.)

पु.कि. मिराशे
१०/५/१३

(पु. कि. मिराशे)
सहायक सचिव (तांत्रिक)

परिशिष्ट क्र. ९

लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणकारी कारखान्याबाबतची कार्यवाहीची माहिती

लोटे परशुराम , ता. खेड, जि. रत्नागिरी येथील औद्योगिक वसाहतीत मुख्यतः रासायनिक उद्योग कार्यरत असून सदयस्थितीत १०६ रासायनिक उदयोग असून त्यापैकी ५६ उदयोग हे जलप्रदुषणकारी आहेत. सदरील उदयोग पूर्ण क्षमतेने चालू असल्यास त्यातुन ४.५ MLD औदयोगिक सांडपाणी निर्माण होते. औदयोगिक सांडपाणी प्रक्रियेसाठी मोठया व मध्यम उदयोगांकडे प्रथम, व्दितीय व काही उदयोगाकडे तृतीय स्वरूपापर्यंत सांडपाणी प्रक्रिया आहे, लहान उदयोगाकडे प्रथम स्वरूपाची प्रक्रिया आहे. त्यानंतर प्रक्रिया केलेले सांडपाणी काही उद्योग हे पुर्नवापर करतात. प्रक्रिया केलेले सांडपाणी पुर्नप्रकिया व विल्हेवाटीसाठी सामुहिक सांडपाणी संयंत्रणेमध्ये एकत्रित केले जाते. प्रक्रिया केलेले सांडपाणी दाभोळ खाडीत करंबवणे येथे सुमारे ७.४८कि.मी. लांबीची वाहीनीव्दारे सोडले जाते. करंबवणे खाडीतील सांडपाण्याचे उत्सर्जित करण्याचे ठिकाण राष्ट्रिय सामुद्री विज्ञान संस्था यांनी मंजूर करून दिलेले आहे. कुठल्याही उदयोगाला प्रक्रिया केलेले सांडपाणी जमिनीवर सोडण्याची परवानगी दिलेली नाही. लोटे औदयोगिक वसाहतीत एकूण ६१ घातक घनकचरा निर्माण होणारे उदयोग आहेत. त्यातून तयार होणारा घनकचरा पुर्नप्रक्रिया व विल्हेवाटीसाठी तळोजा येथील सामुहीक प्रक्रिया व विल्हेवाट संयंत्रणा येथे पाठविला जातो.

लोटे औदयोगिक वसाहतीतील उदयोगांना अचानकपणे भेट देवून हवा प्रदूषण संयंत्रणा व जल प्रदूषण संयंत्रणेची भेट देवून पाहणी केली जाते व सांडपाणी व उत्सर्जित वायूचे नमुने गोळा करण्यात येतात. विहीत मानांकनापेक्षा जास्त परीमाण असलेल्या दोषी उदयोगांना जल प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंध कायदा १९७४ व हवा प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंधक कायदा १९८१ अन्वये दोषी उदयोगावर वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे. सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षामध्ये एकूण ४ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश तसेच १५ उद्योगांना अंतरीम निर्देश, २ उद्योगांना प्रस्तावित निर्देश व २९ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर उद्योगांनी जल प्रदूषण व हवा प्रदूषण संयंत्रणेत सुधारणा करण्याचा कृती आराखडा मप्रनि मंडळाकडे सादर केला आहे. त्याअनुषंगाने उदयोगांनी यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याचे काम पूर्ण केले असून काही उदयोगांचे काम प्रगती पथावर आहे. तसेच सेपी धरतीवर लोटे औद्योगिक वसाहतीचा प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून ते काम अंतिम टप्प्यात आहे. यामुळे सदयस्थितीमध्ये सामुहीक सांडपाणी संयंत्रणेमधून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्तेमध्ये सुधारणा होत असून मागील वर्षाच्या मानाने COD ३००० Mg./Lit. पासून सरासरी ४०० ते ५०० Mg./Lit. एवढा खाली आलेला आहे.

सदयस्थितीत सामुहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेत सुधारणा करण्याचे आवश्यक असल्याने प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कोल्हापूर यांनी दि. २४/१२/१२, २४/१/२०१३, १६/२/२०१३ व १५/३/२०१३ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानूसार सीईटिपी संयत्रणा अदयावत करणे, तृतीय स्तरीय सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविणे, ऑनलाईन TOC ॲनालायझर, pH फ्लो मीटर बसविणे, ऑनलाईन बायो-ॲसे टेस्ट व सामुहीक सांडपाणी सयंत्रणेची व सलंग्न उदयोगांची गुणवत्ता चाचणी परिक्षण तज्ञ संस्थेकडून करण्याचे व सीईटिपीतील गाळ काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. (सोबत प्रत) सीईटिपी व्यवस्थापनाकडून याबाबत कार्यवाही सुरू आहे.

पु.कि.मिराशे
१०/५/१३

(पु. कि. मिराशे)
सहायक सचिव (तांत्रिक)

परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी १०४७—११ (८५०—७-२०१५)

बुधवार, दिनांक २० जून २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २० जून २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी १-१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.,
(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.,
(५) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.,
(६) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.,
(७) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.,
(८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,
(९) श्री. नाना पटोले, वि.स.स.,
(१०) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.,
(११) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.,
(१२) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.,
(१३) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.,
(१४) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.,
(१५) श्री. विनायक मेटे, वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री. दि. पुं. येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती एम. हिमबिंदु, वरिष्ठ उप महालेखाकार

वित्त विभाग

श्रीकांत देशपांडे, (सचिव ले. व को.)

साक्षीदार :

पर्यावरण विभाग

श्रीमती वल्सा नायर सिंह, सचिव

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

श्री. राजीव मित्तल, सदस्य सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण अहवाल यावर पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ६ सप्टेंबर २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ६ सप्टेंबर २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,
(३) श्री. सुनिल केदार, वि.स.स.,
(४) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.,
(५) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.,
(७) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.,
(८) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.,
(९) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.,
(१०) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,
(११) श्री. नाना पटोले, वि.स.स.,
(१२) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.,
(१३) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.,
(१४) श्री. सुरेश नवले, वि.प.स.,
(१५) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सहसचिव
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. दि. पुं. येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती एम. हिमबिंदु, वरिष्ठ उप महालेखाकार

वित्त विभाग

श्रीकांत देशपांडे, (सचिव ले. व को.)

साक्षीदार :—

सहकार विभाग

श्री. राजगोपाल देवरा, सचिव

श्री. विजय सिंघल, आयुक्त (साखर)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण अहवाल यावर पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २२ जानेवारी २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २२ जानेवारी २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.,
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.,
(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.,
(६) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.,
(७) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.,
(८) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.,
(९) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,
(१०) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.,
(११) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.,
(१२) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.,
(१३) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित :

(१४) श्री. विनायक राऊत, वि.प.स.,
(१५) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सहसचिव
(३) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती जहाँगीर इनामदार, वरिष्ठ उप महालेखाकार

वित्त विभाग

श्रीकांत देशपांडे, (सचिव ले. व को.)

साक्षीदार :—

पर्यावरण विभाग

श्री.राजीव मित्तल, सदस्य सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण अहवाल यावर पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी १-२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,

(३) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.,

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.,

(५) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.,

(६) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.,

(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,

(८) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.,

(९) श्री. विनायक मेटे, वि.प.स.,

(१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सहसचिव

(२) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

वित्त विभाग

साक्षीदार :—

पर्यावरण विभाग

श्रीमती वल्सा नायर सिंह, सचिव

सहकार विभाग

श्री. राजगोपाल देवरा, सचिव

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

श्री. राजीव मित्तल, सदस्य सचिव

श्री. विजय सिंघल, साखर आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण अहवाल यावर पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २३ जून २०१५

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ जून २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता, सुरू होऊन दुपारी २-०० वा. स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.,

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.,

(४) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.,

(५) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स. ,

(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.,

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.,

(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.,

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.,

(१०) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.,

(११) श्री. जयंत पाटील, वि.स.स.,

(१२) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.,

(१३) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव

(२) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

समितीने पहिला प्रारूप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणा सुचविल्या.

मंगळवार, दिनांक २१ जुलै २०१५

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २१ जुलै २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३-०० वाजता, सुरू होऊन दुपारी ४-०० वा. स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.,

(३) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.,

(४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.,

(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.,

(६) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.,

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.,

(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.,

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.,

(१०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

समितीने सुचविलेल्या सुधारणांसह पहिला प्रारूप अहवाल संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई